रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | शुक्रवार । दि. १७ जुलै २०२६ । अंक ४१ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹ | । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## वारकरी अपघातातील मृतांचा आकडा चारवर

**पुणे :** जेजुरी येथे संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात झालेल्या भीषण अपघातातील मृतांचा आकडा वाढून चार झाला आहे. अपघातात गंभीर जखमी झालेल्या शैलजा दिनकर जगताप यांचा पुण्यातील ससून रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. यापूर्वी या अपघातात राजश्री शंकर भोसले, माधवी राजाराम सरवडे आणि नंदा पवार या तीन महिला वारकऱ्यांचा मृत्यू झाला होता. या तिघीही सांगली जिल्ह्यातील होत्या. १३ जुलै रोजी संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात ट्रकच्या धडकेत हा दुर्दैवी अपघात झाला होता.

## विठ्ठल-रुक्मिणीचे व्हीआयपी दर्शन बंद

**पंढरपूर :** आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील व्हीआयपी दर्शन बंद करण्यात आले आहे. सर्वसामान्य वारकऱ्यांना जलद दर्शन मिळावे, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. सोलापूरचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी मंत्री, आमदार, खासदार यांच्यासह कोणालाही नियमबाह्य व्हीआयपी दर्शन दिले जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. केवळ शासकीय प्रोटोकॉलनुसार संबंधित लोकप्रतिनिधी आणि त्यांच्यासोबत जास्तीत जास्त दोन-तीन व्यक्तींनाच प्रवेश दिला जाणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाईचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

## वेधक

### रथयात्रेदरम्यान चेंगराचेंगरी

**नवी दिल्ली :** ओडिशातील पुरी येथे प्रसिद्ध भगवान जगन्नाथ रथयात्रेला गुरुवारी सुरुवात झाली. या यात्रेला भाविकांची गर्दी उसळली होती. यादरम्यान रथयात्रेत चेंगराचेंगरी झाली. यात एका भाविकाचा मृत्यू झाला, तर जवळपास १०० भाविक जखमी झाले आहेत. श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने मृत भाविकाला गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल केले होते. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. जखमींना रुग्णवाहिकेने पुरी जिल्हा रुग्णालय आणि इतर वैद्यकीय केंद्रांमध्ये नेण्यात आले.

### तिसऱ्या भाषेची गरज काय?

**नवी दिल्ली :** सीबीएसईने नववी इयत्तेपासून तीन भाषा धोरण लागू करू नये. ''नववी इयत्तेत शिकणे आधीच कठीण आहे, मग त्यात तिसऱ्या भाषेचा समावेश करण्याची काय गरज आहे?'' अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने केली. यामुळे विद्यार्थ्यांवरील मानसिक ताण वाढू शकतो, असे न्यायालयाने म्हटले. ''भारत सरकारला सांगा की त्यांनी असे करू नये,'' असे न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्न आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठाने म्हटले. तिसरी भाषा पाचवी किंवा सहावी इयत्तेत सुरू करावी, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

### अर्नाळा समुद्रात चौघे बुडाले

**मुंबई :** लाटांच्या जोरदार तडाख्यात विरारच्या अर्नाळा समुद्रकिनाऱ्यावर दहा ते बारा वर्षे वयोगटातील चार अल्पवयीन मुले समुद्रात बुडाली. त्यातील दोघांना वाचवण्यात यश आले असून, दोघे बेपत्ता आहेत. गुरुवारी सकाळी पावणे दहाच्या सुमारास ही घटना घडली. सकाळी चार मुले समुद्राच्या दिशेने जात होती. किनाऱ्यावर गस्त घालणाऱ्या पोलिसांनी त्यांना समुद्रात उतरू नये असे सांगितले. मात्र, गस्त घालणारे पथक तिथून गेल्यानंतर मुले समुद्रात उतरली. मात्र, लाटांच्या जोरदार तडाख्यात चौघेही वाहून गेले.

### मोफत साडी बंद

**मुंबई :** अंत्योदय रेशन कार्ड असणारया कुटुंबाला यापूर्वी वर्षाला एक मोफत साडी मिळत होती. पण, महाराष्ट्र शासनाच्या वस्त्रोद्योग विभागाने कॅप्टिव मार्केट योजनाच बंद करण्याचा निर्णय घेतला. यामुळे यापुढे अंत्योदयचा लाभ घेणाऱ्यांना मोफत साडी मिळणार नाही. यापूर्वी या योजनेंतर्गत पात्र कुटुंबातील महिलांना वर्षातून एकदा सण-उत्सव किंवा होळीच्या काळात रेशन दुकानांमधून प्रत्येकी एक साडी मोफत दिली जात होती. गुरुवारी जाहीर झालेल्या शासन निर्णयातून वस्त्रोद्योग विभागाने ही कबुली दिली आहे.

### अहिरांच्या पदरी बंगल्याऐवजी फ्लॅट!

**मुंबई :** विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांना अखेर बंगल्याऐवजी चर्चगेट येथील शासकीय फ्लॅट दिला आहे. अहिर यांना सुरुवातीला मंत्रालयासमोरील रायगड बंगला मंजूर करण्यात आला होता. मात्र, तो सध्या भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या ताब्यात असल्याने हा निर्णय रद्द करण्यात आला. त्यानंतर पुरंदर बंगला देण्याची चर्चा होती. मात्र, हा बंगला विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांना देण्याचा निर्णय झाल्याने अहिर यांना पुन्हा निराशा पत्करावी लागली.

## पीक विम्याकडे
# शेतकऱ्यांची पाठ

**रायगडात आतापर्यंत केवळ 910 शेतकऱ्यांची नोंदणी**

**31 जुलै अंतिम मुदत**

**एक रुपयात पीक विमा योजना बंद झाल्याचा परिणाम?**




**भात विमा हप्ता : ₹650 प्रति हेक्टर**
**भात संरक्षित रक्कम : ₹65,000**

**नाचणी विमा हप्ता ₹400 प्रति हेक्टर**
**नाचणी संरक्षित रक्कम: ₹40,000**

**पीक विम्याला अल्प प्रतिसाद का?**

- एक रुपयात पीक विमा योजना बंद झाल्याने विम्याचा आर्थिक भार वाढला.
- नुकसानभरपाईच्या निकषांमध्ये बदल झाल्याने अनेक शेतकरी नाराज.
- पूर्वीच्या तुलनेत पीक कापणी प्रयोगाच्या आकडेवारीवरच भरपाई निश्चित केली जात असल्याची तक्रार.
- विमा मंजुरी आणि नुकसानभरपाई मिळण्यास होणारा विलंब.
- किचकट नियम, डिजिटल नोंदणी आणि आवश्यक कागदपत्रांची प्रक्रिया अनेक शेतकऱ्यांसाठी अडथळा ठरत आहे.

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

नैसर्गिक आपत्तीमुळे दरवर्षी मोठे नुकसान सहन करणाऱ्या रायगडमधील शेतकऱ्यांनीयंदामात्रप्रधानमंत्रीपीक विमा योजनेकडेच पाठ फिरवल्याचे चित्र दिसत आहे. जिल्ह्यात सुमारे ८७ हजार हेक्टरवर भाताची लागवड होत असताना, आतापर्यंत अवघ्या ९१० शेतकऱ्यांनी पीक विमा काढला आहे. योजनेची अंतिम मुदत ३१ जुलै असून, केवळ १४ दिवस शिल्लक असताना अत्यल्प प्रतिसादामुळे कृषी विभागासह विमा कंपनीचीही चिंता वाढली आहे.

रायगड जिल्ह्यातील सुमारे ९० टक्के शेती ही पावसावर अवलंबून आहे. भात आणि नाचणी ही खरीपातील प्रमुख पिके असून, दरवर्षी अतिवृष्टी, पूर, अवकाळी पाऊस आणि इतर नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना संरक्षण मिळावे, यासाठी यंदाही प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू करण्यात आली आहे. यंदा या योजनेची अंमलबजावणी इफको-टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनीमार्फत केली जात आहे.

मात्र, योजनेबाबत जनजागृती करूनही शेतकऱ्यांचा प्रतिसाद अत्यंत कमी आहे. ग्रामसभा, शेतभेटी, फलक आणि विविध माध्यमांतून कृषी विभागाकडून जनजागृती केली जात असली तरी अपेक्षित नोंदणी होत नसल्याचे चित्र आहे.

यंदा पीक विम्यासाठी डिजिटल क्रॉप सर्व्हे ॲपवर ई-पीक नोंदणी आणि ॲग्रीस्टॅक ओळख क्रमांक बंधनकारक करण्यात आला आहे. तसेच भातासाठी प्रतिहेक्टर ६५० रुपये, तर नाचणीसाठी ४०० रुपये विमा हप्ता भरावा लागत आहे. नुकसान झाल्यास भातासाठी ६५ हजार रुपये, तर नाचणीसाठी ४० हजार रुपये संरक्षित विमा रक्कम मिळणार आहे.

मात्र, जिल्ह्यातील हजारो पात्र शेतकरी अद्याप या योजनेपासून दूर आहेत. अंतिम मुदतीस अवघे १४ दिवस उरले असताना अल्पावधीत मोठ्या संख्येने नोंदणी होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. कृषी विभागाने अधिकाधिक शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. ३१ जुलै ही अंतिम मुदत असली तरी जिल्हाभरातील शेतकरी या योजनेत प्रतिसाद देताना दिसत नाहीत.

अतिवृष्टी झाल्यावर जेव्हा शेतकरी तक्रार करतो, त्यानंतर सदर विमा कंपनी नुकसान पाहणीसाठी कंत्राटी पद्धतीवर नेमणूक केलेले स्थानिक कर्मचारी यांच्याकडून नुकसान अहवाल मागवतात. मर्जीतील, जवळचे नातेवाईक यांचे नुकसान जास्त दाखवनू त्यांना मोबदला जास्त मिळवून दिला जातो, अशा बहुसंख्य शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत.

## खंडाळे ग्रामपंचायतीतील
# जमीन गैरव्यवहार उघड

- **सरपंच, ग्रामसेवकावर फौजदारी कारवाई करण्याची मागणी**
- **इतिवृत्त फेरफार करून ठराव मंजूर केल्याचा गंभीर आरोप**

**नियमांचे उल्लंघन झाल्याची तक्रार**

सभेमध्ये चर्चेसाठी न आलेला विषय थेट इतिवृत्तात समाविष्ट करून मंजूर करणे हे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम व सभेच्या नियमांचे उल्लंघन असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. सरपंच व ग्रामसेवक यांनी संगनमत करून अधिकाराचा गैरवापर करत इतिवृत्तामध्ये फेरफार करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. याबाबत ग्रामसेवकांना सभेत विचारणा करण्यात आली असता त्यांनी समाधानकारक उत्तर दिले नसल्याचे सदस्यांचे म्हणणे आहे. तसेच संबंधित मालमत्तेची किंमत सुमारे साडेतीन ते चार कोटी रुपये असल्याचा दावा करत, एवढ्या मोठ्या प्रकल्पासंदर्भातील निर्णय नियमबाह्य पद्धतीने घेण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, यापूर्वीदेखील ग्रामपंचायतीच्या नोंदींमध्ये फेरबदल झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, त्यासंदर्भात ग्रामस्थांनी स्वतंत्र तक्रार अर्ज प्रशासनाकडे सादर केल्याचे सांगण्यात आले आहे.

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

खंडाळे ग्रामपंचायतीत कथितरित्या इतिवृत्तामध्ये फेरफार करून नियमबाह्य पद्धतीने ठराव मंजूर करण्यात आल्याचा धक्कादायक आरोप समोर आला असून, या प्रकरणामुळे ग्रामपंचायत प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे. अर्जाच्या तारखेमध्ये खाडाखोड करून सभेत चर्चा अथवा मंजुरीसाठी न आलेला विषय थेट प्रोसीडिंगमध्ये समाविष्ट करण्यात आल्याचा आरोप उपसरपंच व सदस्यांनी केला आहे. या कथित प्रकारामागे सरपंच व ग्रामसेवक यांचे संगनमत असल्याचा दावा करत दोषींवर फौजदारी कारवाईसह पदावरून बडतर्फीची मागणी करण्यात आली आहे. कोट्यवधी रुपयांच्या मालमत्तेशी संबंधित विषयावर झालेल्या या कथित गैरव्यवहारामुळे ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत असून, संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. ३० जून २०२६ रोजी झालेल्या ग्रामपंचायतीच्या मासिक सभेमध्ये ८ मे २०२६ रोजीच्या सभेच्या इतिवृत्ताचे वाचन सुरू असताना विषय क्रमांक ६ व ठराव क्रमांक १८५ संदर्भात गंभीर अनियमितता उघडकीस आल्याचा दावा करण्यात आला आहे. पान २ वर

## कोल्हापूर हादरले

**। कोल्हापूर । प्रतिनिधी ।**

कोल्हापुरातील नवी वाशी नाका परिसरात भाजप कार्यकर्ते सूरज साखरे यांच्यावर अज्ञात दोघांनी गोळीबार केल्याची घटना बुधवारी घडली. या हल्ल्यात ते जखमी झाले असून, त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

प्राथमिक माहितीनुसार, खासगी सावकारकीच्या वादातून हा हल्ला झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून, पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला आहे. दरम्यान, सूरज साखरे यांच्यावर यापूर्वीही काही गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

## अपघातग्रस्त ट्रक चालकाला जीवदान

**। खोपोली । प्रतिनिधी ।**



मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील ढेकू गावाजवळ बुधवारी मध्यरात्री ४० फूट खोल दरीत ट्रक कोसळून चालक रवी राठोड गंभीर जखमी झाला. अंधार, निसरडा उतार आणि दाट झाडी अशा प्रतिकूल परिस्थितीत हेल्प फाऊंडेशनसह विविध यंत्रणांनी तब्बल दोन तास बचाव मोहीम राबवत त्याची सुखरूप सुटका केली.

पुण्याकडून मुंबईकडे दुग्धजन्य पदार्थ घेऊन जाणारा ट्रक किलोमीटर ३६.३०० येथे चालकाचे नियंत्रण सुटल्याने दरीत कोसळला. अपघाताची माहिती मिळताच एमएसआरडीसीची देवदूत यंत्रणा, आयआरबी, महामार्ग वाहतूक पोलीस, खोपोली पोलीस, लोकमान्य हॉस्पिटल, हेल्प फाऊंडेशन आणि अन्य बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली.

गुरुनाथ साठेलकर, सौरभ घरत, निलेश कुदळे, पान २ वर

## कोट्यवधींचा रस्ता सहा महिन्यांत उखडला



**। मुरुड-जंजिरा । प्रतिनिधी ।**

- **खोरा बंदरातील निकृष्ट कामावर संताप**
- **ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणी**

जंजिरा किल्ल्याकडे जाणाऱ्या पर्यटकांसाठी खोरा बंदर येथे कोट्यवधी रुपये खर्चून उभारण्यात आलेली नवीन पर्यटन जेटी तयार झाली असली, तरी तिच्याकडे जाणारा अंतर्गत सिमेंट काँक्रिटचा रस्ता अवघ्या सहा महिन्यांत उखडल्याने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दोन वर्षांपूर्वी निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी असून, संबंधित ठेकेदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

> “खोरा बंदर पार्किंग आणि अंतर्गत रस्त्याच्या दुरुस्तीचे कार्यादेश देण्यात आले आहेत. सध्या पावसाळी काळात वाहतूक सुरू असल्याने काम सुरू करता येत नाही. संबंधित ठेकेदार अगरदांडा येथील काम पूर्ण करताच खोरा बंदरातील दुरुस्तीला सुरुवात होईल. यावेळी दर्जेदार काम होईल, याची आम्ही स्वतः लक्ष ठेवून खात्री करू.”
>
> – प्रवीण पाटील, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई

राजपुरी ग्रामपंचायत हद्दीतील खोरा बंदराच्या मुख्य रस्त्यापासून जेटीपर्यंतचा अंतर्गत सिमेंट काँक्रिट रस्ता आणि पार्किंग परिसर शासनाने कोट्यवधी रुपये खर्चून विकसित केला. मात्र, काम पान २ वर

## सव्वा सहा कोटींची खारबंदिस्ती पहिल्याच पुरात खचली?

- **कोपर दुतर्फा योजनेतील कथित निकृष्ट कामावरून संताप**
- **ठेकेदारांसह अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशीची मागणी**



**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील कोपर दुतर्फा खारबंदिस्ती योजनेसाठी शासनाने खर्च केलेले तब्बल ६ कोटी २५ लाख रुपये पहिल्याच पुराच्या पाण्यात वाहून गेले का? असा संतप्त सवाल आता स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे. कोट्यवधी रुपयांचा खर्च करून उभारण्यात आलेल्या खारबंदिस्तीने पहिल्याच पावसात दम तोडल्याचा आरोप होत असून, कामात मोठ्या प्रमाणात कथित निकृष्ट दर्जा आणि अंदाजपत्रकापासून तडजोड केल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे ठेकेदारांसह कामावर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांची भूमिकाही संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. पान २ वर

**स्थानिकांकडून थेट सवाल...**

- अंदाजपत्रकाप्रमाणे काम झालेच नसेल, तर बिले मंजूर कोणी केली?
- गुणवत्ता तपासणी आणि प्रत्यक्ष मोजमाप झाले होते का?
- पहिल्याच पुरात बांधाची दुरवस्था कशी झाली?
- निकृष्ट कामासाठी जबाबदारांवर गुन्हे दाखल होणार का?
- शासन स्वतंत्र तांत्रिक चौकशी समिती नेमणार का?

**अवघ्या पाचव्या वर्षी अंतराळ जिंकण्याचे स्वप्न | अलिबागच्या आयान पाटीलची जागतिक स्तरावर दखल**

## ग्रह-ताऱ्यांत रमलाय उद्याचा वैज्ञानिक!

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**



खेळण्याच्या वयात अनेक मुले गाड्या, बाहुल्या किंवा कार्टूनमध्ये रमलेली असतात. मात्र, रायगड जिल्ह्यातील अलिबागचा अवघा पाच वर्षांचा आयान नितीन पाटील ग्रह, उपग्रह, ब्लॅक होल, सुपरनोव्हा, रॉकेट आणि उपग्रह निर्मितीच्या स्वप्नात रमला आहे. तीन वर्षांच्या वयापासून सुरू झालेली त्याची अंतराळाविषयीची ओढ आज जागतिक स्तरावरील स्पर्धा, वेबिनार, ऑलिम्पियाड आणि संशोधन उपक्रमांपर्यंत पोहोचली आहे. जिज्ञासा, सर्जनशीलता आणि आई-वडिलांच्या योग्य मार्गदर्शनामुळे अलिबागच्या या चिमुकल्याची भरारी आता अंतराळ विज्ञानाच्या दिशेने सुरू झाली आहे.

**घरच बनले विज्ञानाचे विद्यापीठ**

आयानचे आई-वडील श्रद्धा पाटील आणि नितीन पाटील हे दोघेही माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील अभियंते आहेत. त्यांनी मुलाच्या जिज्ञासेला कधीच मर्यादा घातली नाही. उलट, त्याला आवश्यक पुस्तके, साधने, विज्ञानविषयक साहित्य आणि प्रयोगांची संधी उपलब्ध करून दिली. आयानला होमस्कूलिंगद्वारे त्याच्या गतीने शिक्षण दिले जात आहे. त्यामुळे विषय समजून घेणे, प्रश्न विचारणे आणि प्रत्यक्ष प्रयोग करणे यासाठी त्याला भरपूर वेळ मिळत आहे.

पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या अलिबागमध्ये वाढलेल्या आयानला अवघ्या तीन वर्षांच्या वयातच अंतराळाविषयी प्रचंड आकर्षण निर्माण झाले. ग्रह, तारे, उपग्रह, रॉकेट, आकाशगंगा आणि विश्वातील रहस्ये जाणून घेण्याची त्याची ओढ दिवसेंदिवस वाढत गेली. विशेष म्हणजे, कोणत्याही औपचारिक शिक्षणाशिवाय त्याने स्वतः निरीक्षण, व्हिडिओ, पुस्तके आणि विविध ऑनलाईन माध्यमांच्या साहाय्याने अंतराळाचा अभ्यास सुरू ठेवला. ''पृथ्वीचे गुरुत्वाकर्षण चंद्राला का ओढून घेत नाही?'', ''पृथ्वीचा वेग वाढला तर काय होईल?'' असे प्रश्न तो सातत्याने विचारतो. एवढेच नव्हे तर, त्यांची स्वतःच्या पद्धतीने उत्तरे शोधण्याचाही प्रयत्न करतो.

> “आयानला विज्ञानाची आवड आहे, हे लक्षात आल्यानंतर आम्ही त्याला आवश्यक साधने, पुस्तके आणि शिकण्याच्या संधी उपलब्ध करून दिल्या. त्याने स्वतः च्या जिज्ञासेच्या जोरावर हा प्रवास सुरू केला आहे.त्याची स्वप्ने मोठी आहेत आणि ती पूर्ण करण्यासाठी आम्ही कायम त्याच्या पाठीशी उभे राहू.”
>
> – नितीन पाटील (वडील)

कोडिंगपासून ग्रहांच्या चित्रांपर्यंत विलक्षण आवड

अवघ्या पाचव्या वर्षी आयानला लॅपटॉप सहज हाताळता येतो. पान २ वर

## इस्रोसमोर मोठे संकट!

- **१०० हून अधिक शास्त्रज्ञांचे राजीनामे**
- **‘गगनयान’ मोहिमेवर परिणामाची भीती**

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

चांद्रयान, मंगळयानसारख्या ऐतिहासिक मोहिमांनी जगभर भारताचा झेंडा फडकवणाऱ्या भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) समोर आता अंतर्गत संकट उभे ठाकले आहे. गेल्या काही महिन्यांत १०० हून अधिक शास्त्रज्ञ आणि तांत्रिक तज्ज्ञांनी राजीनामे दिले आहेत. विशेष म्हणजे, यातील अनेक शास्त्रज्ञ भारताच्या महत्त्वाकांक्षी गगनयान मोहिमेशी संबंधित असल्याने केंद्र सरकारने तातडीने हस्तक्षेप करत राजीनाम्यांच्या मंजुरीचे अधिकार थेट अंतराळ विभागाकडे दिले आहेत.

देशाला अंतराळ क्षेत्रात नवी ओळख मिळवून देणाऱ्या इस्रोमध्ये अनुभवी शास्त्रज्ञांच्या वाढत्या निर्गमनामुळे चिंता व्यक्त होत आहे. उपलब्ध माहितीनुसार, आतापर्यंत १०० ते १२० शास्त्रज्ञांनी इस्रोला रामराम ठोकला आहे. यामध्ये युआर राव सॅटेलाइट सेंटरचे सुमारे ८०, तर विक्रम साराभाई स्पेस सेंटरचे किमान २० शास्त्रज्ञ असल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे, या शास्त्रज्ञांपैकी अनेक जण भारताच्या पहिल्या मानवी अंतराळ मोहिमेवर म्हणजेच गगनयान प्रकल्पावर कार्यरत होते. त्यामुळे या मोहिमेच्या वेळापत्रकावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## ...जमीन गैरव्यवहार उघड

उपसरपंच प्रभाकर तुणतुणे, सदस्य सुशील वेळे, बबलु नाईक, हर्षला पाटील, रुचिता भगत, मंदा नाईक, कल्पना ठाकूर, रुपेश पाटील, स्वाती चिंचकर यांनी यासंदर्भात लेखी तक्रार गटविकास अधिकाऱ्यांकडे केली आहे. या सर्वांच्या म्हणण्यानुसार, सदाशिव चंद्रकांत गोवेकर यांच्या अर्जाचे सभेमध्ये वाचन करण्यात आले नव्हते, तसेच तो विषय सदस्यांच्या चर्चेसाठी अथवा मंजुरीसाठीही ठेवण्यात आला नव्हता. तक्रारीनुसार, संबंधित अर्जाची मूळ तारीख ११ मे २०२६ असताना ती खाडाखोड करून ८ मे २०२६ अशी दाखविण्यात आली आणि त्याआधारे विषय मंजूर करण्यात आला. ग्रामपंचायतीच्या नियमानुसार सभेच्या दिवशी प्राप्त झालेले अर्ज पुढील मासिक सभेत मांडणे आवश्यक असतानाही या नियमाचे पालन करण्यात आले नसल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून वादग्रस्त ठराव रद्द करावा, तसेच दोषी आढळणाऱ्या सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी मागणी उपसरपंच व सदस्यांनी प्रशासनाकडे केली आहे. या प्रकरणामुळे खंडाळे ग्रामपंचायत परिसरात मोठी खळबळ उडाली असून, चौकशी अहवालाकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## अपघातग्रस्त ट्रक चालकाला जीवदान

धर्मा पाटील आणि फारूक शेख यांनी रेस्क्यू साहित्य, दोरखंड व स्पाईन बोर्डसह दरीत उतरून बचावकार्य सुरू केले. डोक्याला गंभीर दुखापत झालेल्या रवी राठोड यांच्यावर लोकमान्य हॉस्पिटलच्या वैद्यकीय पथकाने घटनास्थळीच प्राथमिक उपचार करून रक्तस्त्राव नियंत्रणात आणला.

यानंतर स्पाईन बोर्ड, दोरखंड आणि क्रेनच्या सहाय्याने चालकाला सुरक्षितपणे दरीतून वर काढण्यात आले. त्यानंतर त्याला पुढील उपचारासाठी पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या मोहिमेत महामार्ग वाहतूक पोलीस (बोरघाट), खोपोली पोलीस, एमएसआरडीसीची देवदूत यंत्रणा, आयआरबी पेट्रोलिंग टीम, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल, लोकमान्य हॉस्पिटलचे वैद्यकीय कर्मचारी आणि हेल्प फाऊंडेशनच्या सदस्यांनी समन्वयाने काम करत चालकाचा जीव वाचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

## सव्वा सहा कोटींची खारबंदिस्ती पहिल्याच पुरात खचली?

कोपर दुतर्फा खारभूमी (खारबंदिस्ती) योजनेचे काम श्री स्वामी समर्थ, पुणे या ठेकेदाराला देण्यात आले होते. त्यानंतर हे काम सब-ठेकेदारांकडे सोपविण्यात आल्याचा दावा स्थानिकांनी केला आहे. यामध्ये संतोष बुरूडे, बबन, गुलाबचंद आणि नवनाथ यांचा समावेश असल्याचे सांगितले जात आहे. सुमारे चार किलोमीटर लांबीच्या या खारबंदिस्तीसाठी मंजूर अंदाजपत्रकानुसार १२ मीटर रुंदी, ४ मीटर उंची, ३ मीटर माथा, दुतर्फा पिचिंग, एक फूट मुरूमाचा थर आणि तीन उघाड्यांची तरतूद होती. मात्र, प्रत्यक्षात या सर्व निकषांना फाटा देत काम करण्यात आल्याचा आरोप आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, ३९ फूट रुंदीचा असणे अपेक्षित असलेला बांध केवळ १८ ते २० फूट रुंद करण्यात आला. १३ फूट उंचीऐवजी केवळ ७ ते ८ फूट उंची ठेवण्यात आली, तर ९.२५ फूट माथ्याऐवजी अवघा ५ ते ६ फूट माथा करण्यात आला. एक फूट मुरूमाचा थर देणे अपेक्षित असताना, अनेक ठिकाणी तीन-चार इंचांचाही थर नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याशिवाय, चार किलोमीटर परिसरातील तीन उघाड्यांची मापेदेखील अंदाजपत्रकानुसार नसल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे पुराचे पाणी नैसर्गिक प्रवाहाने वाहून न जाता हमरापूर परिसरात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली. नियोजनानुसार काम झाले असते, तर ही परिस्थिती उद्भवली नसती, असा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

या प्रकरणामुळे अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. काम अंदाजपत्रकानुसार झाले नसल्याचा आरोप असताना संबंधित ठेकेदारांची बिले कशी मंजूर झाली? प्रत्यक्ष मोजमाप आणि गुणवत्ता तपासणी झाली होती का? की केवळ कागदोपत्री पूर्तता

### पान १ वरून

दाखवून कोट्यवधी रुपयांचा निधी अदा करण्यात आला? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाला द्यावी लागणार आहेत.

दरम्यान, खारभूमी अभिलेख विभागात नुकत्याच रुजू झालेल्या उपअभियंता नैना सुनकड यांनी कोपर दुतर्फा खारबंदिस्तीची पाहणी केली असून, संबंधित ठेकेदारांना नोटिसा बजावण्यात आल्याची माहिती दिली.

मात्र, स्थानिकांच्या मते, केवळ नोटिसा देऊन हा विषय संपणार नाही. शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीचा अपव्यय झाला असेल, तर संबंधित ठेकेदारांना काळ्या यादीत टाकून कठोर कारवाई करावी. तसेच कामावर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्या भूमिकेची स्वतंत्र चौकशी करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

आता या संपूर्ण प्रकरणात शासनाने स्वतंत्र तांत्रिक समितीमार्फत चौकशी करून प्रत्यक्ष मोजमाप, गुणवत्ता तपासणी आणि आर्थिक व्यवहारांची छाननी करणार का, याकडे संपूर्ण पेण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## कोट्यवधींचा रस्ता सहा महिन्यांत उखडला

पूर्ण झाल्यानंतर अवघ्या काही महिन्यांतच रस्त्याचे कॉंक्रिट उखडू लागले. अनेक ठिकाणी सिमेंटचा भुसा आणि खडी बाहेर आली असून, रस्ता पुन्हा खड्डेमय बनला आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, रस्त्यावरून वाहन गेले की सिमेंटचा भुसा हवेत उडून पादचारी आणि दुचाकीस्वारांच्या डोळ्यात, नाकात व तोंडात जात आहे. आता पावसाळा सुरू झाल्याने या रस्त्यावर पाण्याने भरलेले खड्डे निर्माण झाले असून, अपघाताचा धोका वाढला आहे. याच मार्गावर उभारण्यात आलेले स्पीडब्रेकरही नियमबाह्य असल्याचा आरोप आहे. ते अतिशय उंच आणि अरुंद असल्याने वाहनांना जोरदार धक्के बसत असून, अनेक वाहनांचे नुकसान झाले आहे. वारंवार तक्रारी करूनही स्पीडब्रेकर दुरुस्त करण्यात आले नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. विशेष म्हणजे, पुढील काही महिन्यांत पर्यटन हंगाम सुरू होणार आहे. जंजिरा किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या हजारो पर्यटकांना याच खड्डेमय रस्त्यावरून प्रवास करावा लागणार असल्याने पर्यटनालाही फटका बसण्याची भीती व्यक्त होत आहे. ग्रामस्थांनी या संपूर्ण कामाची उच्चस्तरीय चौकशी करून निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकावे, तसेच संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावरही कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

## ग्रह-ताऱ्यांत रमलाय उद्याचा वैज्ञानिक

कोडिंगच्या प्राथमिक संकल्पना तो समजून घेत आहे. कॉंक्रीट मिक्सर आणि टॉवर होइस्ट यांसारख्या यंत्रणांबाबत त्याने साधे प्रोग्राम तयार केले आहेत. चार वर्षांचा असतानाच त्याने पृथ्वी, मंगळ, गुरु आणि नेपच्यून या ग्रहांची कॅनव्हास चित्रे स्वतःच्या कल्पनेतून रंगवली. गुरु ग्रहावरील प्रसिद्ध ग्रेट रेड स्पॉटदेखील त्याने अचूक दाखवला. प्रदर्शन म्हणजे काय हे समजल्यानंतर त्याने स्वतःच घरात छोटेखानी चित्रप्रदर्शन भरवून आपल्या कलाकृतींचे सादरीकरण केले.

**नवी पृथ्वीची भन्नाट संकल्पना**

आयानने स्वतःच्या कल्पनेतून "नवी पृथ्वी" ही संकल्पना मांडली आहे. दोन सूर्य, पाच चंद्र, कमी गुरुत्वाकर्षण आणि सतत पावसाचे संकेत देणारा हिरवा वादळपट्टा असलेला ग्रह त्याने कल्पिला आहे. त्या ग्रहावर ऑक्सिजन असल्याने जीवन शक्य असल्याचा त्याचा तर्क आहे.

**राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवर दखल**

'शी इन स्पेस'च्या वेबिनारमधून प्रेरणा घेत आयानने वेदर स्टेशन तयार करण्याचा प्रयत्न केला. आर्डुइनो, ब्रेडबोर्ड यांसारख्या साधनांचा अभ्यास सुरू केला. आज तो युरोपियन स्पेस एजन्सी (ईएसए) प्रेरित "नवीन पृथ्वी शोधा" या जागतिक स्पर्धेत सहभागी आहे. इंडियन स्पेस टीमच्या रॉकेट्री अभ्यासक्रमासाठी सर्वात लहान विद्यार्थी म्हणून त्याची निवड झाली आहे. इंडियन नॅशनल एरोस्पेस ऑलिम्पियाडसाठी तो पात्र ठरला असून, भारतातील सर्वात लहान सहभागींपैकी एक आहे. एसडीआरओच्या यंग सायंटिस्ट क्लबच्या निवड प्रक्रियेत तो सहभागी असून, भविष्यात नॅनो उपग्रह आणि लघु हवामान केंद्र उभारण्याचे त्याचे स्वप्न आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचे सोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पिंगळस, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ३८/२ ग | एकूण क्षेत्र ०-३८-०० हे.आर | ०.२५ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०४ दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :-१७/०७/२०२६

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिरजवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड
पिन नं.४०२१०७

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे पाटणी पांडापूर, ता. पेण जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री.दिनेश नारायण म्हात्रे यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक लिलाबाई कृष्णा तांडेल व इतर यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट न./हि.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| पाटणी पांडापुर | १३७/२ | ०.३६.७० पो.ख. ०.००.०० एकूण क्षेत्र ०.३६.७० | ३.७५ |

वरील संपुर्ण क्षेत्रापैकी ०.१८.०० हे. आर. इतके क्षेत्र हे आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ (एकवीस) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकती मध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही/-
ठिकाण : पेण
दि. १७/०७/२०२६

**ॲड. हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
पेण पोलीस स्टेशनजवळ तहसिल ऑफिस
आवारात, कोटआळी पेण मो. नं.९८२२०३०३८९

### अलिबाग को-ऑप. अर्बन बँक लि, अलिबाग
**ता. अलिबाग, जि. रायगड**

जा.क्र.६४/५४७ दिनांक १६ जुलै २०२६

**नोटीस मसुदा**

अलिबाग को.ऑप.अर्बन बँक लि. अलिबाग या सहकारी संस्थेच्या सर्व संचालकांना सूचित करण्यांत येते की, आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळातील इतर मागास प्रवर्ग व सर्वसाधारण या मतदार संघातून या प्रवर्गातील/मतदार संघातील संचालक/संचालकांच्या निवडीकरीता अध्यासी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४ जुलै, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. अलिबाग, केंद्र कार्यालय, चौथा मजला, संचालक मंडळ सभागृह या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यांत आलेले आहे. सर्व संचालकांनी संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यांत येत आहे. सभेत नैमित्तिकपणे रिक्त झालेली पदे निवडीसाठी खालील निवडणूक कार्यक्रमानुसार कामकाज करण्यांत येणार आहे.

**निवडणूक कार्यक्रम**

| अ.क्र. | तपशील | वेळ |
|---|---|---|
| १ | नामनिर्देशनपत्र वाटप व स्विकृती | सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० |
| २ | नामनिर्देशनपत्र छाननी | दुपारी १२.०० ते दुपारी १२.३० |
| ३ | वैध नामनिर्देशनपत्राची यादी प्रसिद्धी | दुपारी १.०० |
| ४ | नामनिर्देशनपत्र माघार | दुपारी १.०० ते दुपारी १.३० |
| ५ | अंतिम उमेदवाराची यादी जाहीर करणे | दुपारी १.३० |
| ६ | मतदान प्रक्रिया | दुपारी २.०० ते दुपारी २.३० |
| ७ | मतमोजणी प्रक्रिया | दुपारी २.३० ते दुपारी ३.०० |
| ८ | निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांबाबत निकाल घोषित करणे | दुपारी ३.०० |

टिप :- निवडणूक कार्यक्रमातील वेळेत फेरबदल करण्याचे अधिकार अध्यासी अधिकारी यांचे राहतील.

सही/- (मा.अध्यासी अधिकारी यांचे मान्यतेने)
सही/- मुख्य कार्यकारी अधिकारी
दिनांक : १६ जुलै २०२६
ठिकाण : अलिबाग

### जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते कि, आम्ही सौ. निना राजन मेहरा, सज्ञान, आणि श्री. राजन प्रेमकिशन मेहरा दोन्ही राहणार : १४२, सायनारा, १७ कफ परेड, कुलाबा, मुंबई, महाराष्ट्र ४०० ००५ (**"मालक"**) यांच्या यात याखाली लिहिलेल्या परिशिष्टामध्ये अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (**"मालमत्ता"**) संबंधातील मालकी अधिकार, हक्क आणि हितसंबंधांची चौकशी करीत आहोत.

कोणत्याही आणि सर्व व्यक्ती/ संस्था तसेच व्यक्तिगत, हिंदू अविभाजित कुटुंब, एखादी बँक किंवा वित्तीय संस्था किंवा नॉन बँकिंग वित्तीय संस्था, व्यक्तींची समिती किंवा व्यक्तिगत निकाय, प्रस्थापित असो किवा नसो, यांना मालकांविरुद्ध आणि/किंवा सदर मालमत्तांच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील विक्री, अदलाबदल, भाडे, भाडेपट्टा, पोट- भाडेपट्टा, अनुज्ञप्ती, अभिहस्तांकन, गहाण (समन्याय किंवा अन्य), वारसा, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, बक्षिस, धारणाधिकार, आकार, परिरक्षा, सुविधाधिकार, न्यास, कब्जा, जप्ती, व्यादेश, प्रलंबित वाद, कुटुंब व्यवस्था/तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, करार/करारनामे, विकासाधिकार, प्रकल्प व्यवस्थापन अधिकार, विकास व्यवस्थापन अधिकार, एफएसआय/टीडीआर वापर/हस्तांतरण, भागिदारी किंवा कोणत्याही स्वरूपाचे अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणताही शेअर, अधिकार, हक्क, दावा, लाभ, मागणी किंवा हितसंबंध इत्यादी असेल तर त्यांनी निम्नस्वाक्षरीकर्त्यांना खालील नमूद केलेल्या पत्त्यावर/ईमेल आयडीवर या जाहीर सुचनेच्या जाहिरातीच्या तारखेपासून **१० (दहा) दिवसांच्या** आत दस्तावेजी पुराव्यासह लेखी स्वरूपामध्ये ज्ञात होण्यासाठी कळविणे आवश्यक आहे. अन्यथा अशा प्रकारचा दावा/मागणी आणि/किंवा दावें/मागण्या/आक्षेप, जर काही असेल तर, त्यांचा अधित्याग आणि/किंवा परित्याग करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल. या जाहीर सूचनेला प्रतिसाद देऊन संबोधित केलेले सर्व दावे/आक्षेप/मागण्या यांना संदर्भ क्र. **G0599** देण्यात यावा.

**परिशिष्ट**

मौजे खानावळे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथील आणि खालील गट क्रमांक असलेल्या जमिनींचे ते सर्व तुकडे आणि भाग, एकूण क्षेत्रफळ ०-३८-९० हेक्टर-आर-स्क्वेअर मीटर:

| गट क्र. | हिस्सा क्र. | ७/१२ उताऱ्यानुसार क्षेत्रफळ |
|---|---|---|
| ६५ | १ | ०-३८-९० |

**आज दिनांक १७ जुलै २०२६**

**सागर कदम**
**भागिदार**
**डीएसके लिगल**
वकील आणि सॉलिसिटर्स
१७०१, वन वर्ल्ड सेंटर, १७वा मजला,
टॉवर २बी, ८४१, सेनापती बापट मार्ग,
एल्फिन्स्टन रोड, मुंबई ४०००१३
ईमेल आयडी:
srs.publicnotice@dsklegal.com

### जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग
**मु. स्नेहसदन श्रीबाग अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड फोन नं. ९१५६७६६०७७**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये

**जाहीर लिलाव नोटीस**

जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था म.अलिबाग या पतसंस्थेतून श्रीमती मंदा पांडुरंग पाटील/ श्री. रामचंद्र नागु म्हात्रे मु.श्रीगणेश हौसिंग सोसायटी चेंढरे ता.अलिबाग जि.रायगड यांचे कर्ज थकीत झाल्यामुळे कर्जदाराकडील येणे असलेल्या थकीत कर्जाची रक्कम वसुलीसाठी त्याचे खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये जाहीर लिलावाने विक्री करणे आवश्यक झाले आहे. त्यानुसार मंगळवार दिनांक १८/०८/२०२६ रोजी सकाळी ठिक १.३० वाजता वसुली अधिकारी हे जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था म.अलिबाग शाखेत हजर राहून खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत जाहिर लिलावाने विक्री करतील.

**जाहिर लिलाव करावयाच्या स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| कर्जदाराचे नाव व मालमत्ता धारकाचे नाव व पत्ता | मालमत्तेचे वर्णन व तपशील | वाजवी मुल्य |
|---|---|---|
| श्रीमती. मंदा पांडुरंग पाटील/ श्री.रामचंद्र नागु म्हात्रे मु. श्रीगणेश हौसिंग सोसायटी चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड | मौजे चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड येथील ग्रामपंचायत चेंढरे हद्दीतील भुमापन क्र.व उपविभाग ९५/०१ क्षेत्र ०-०५-३० हि मिळकत | मा. जिल्हा उपनिबंधक सो,सहकारी संस्था रायगड-अलिबाग यांनी निश्चित केलेली वाजवी किंमत ५३,००,०००/- अक्षरी रूपये त्रेपन्न लाख मात्र |

**लिलावाच्या शर्ती व अटी**

१ जाहिर लिलावाच्या शर्ती व अटी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व लिलावाच्या ठिकाणी पहावयास मिळतील.
२. लिलावामध्ये ज्याला बोली बोलावयाची असेल त्यांनी रू.१,००,०००/- (अक्षरी रूपये एक लाख ) मात्र एवढी रक्कम 'अनामत' म्हणून पतसंस्थेकडे लिलावापुर्वी किमान १ तास अगोदर जमा करणे आवश्यक आहे.
३. लिलाव मंजूर करणे अगर काही कारणाने लिलाव तहकूब करणे, रद्द करणे किंवा पुढे ढकलण्याचे सर्व अधिकार वसुली अधिकारी व पतसंस्थेकडे राहतील.
४. लिलावाच्या तारखेपर्यंत कर्जदार यांनी येणे असलेल्या कर्जाची व्याजासह पुर्ण परतफेड केल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
५. लिलाव करावयाच्या मालमत्तेसंबंधी माहिती अगर कागदपत्रे पतसंस्थेच्या कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यालयात पहावयास मिळतील.
६. अपसेट प्राइज (वाजवी किंमत) पेक्षा कमी किंमतीच्या बोली नोंदल्या जाणार नाहीत अपसेट प्राइज रू. ५३,००,०००/- अक्षरी रूपये त्रेपन्न लाख रूपये इतकी आहे.
७. मालमत्तेच्या हस्तांतरणाची स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन खर्च व इतर थकीत देय संबधित खर्च भागविण्याची जबाबदारी ही यशस्वी खरेदीदार/बोलीदार यांची राहील.

ठिकाण -अलिबाग
दि. १६/०७/२०२६

**श्री. विवेक वि.पाटील**
**वसुली अधिकारी**
**रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थाचाचा महासंघ म. अलिबाग**

### जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था म. अलिबाग
**मु. स्नेहसदन श्रीबाग अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड फोन नं. ९१५६७६६०७७**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये

**जाहीर लिलाव नोटीस**

जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था म.अलिबाग या पतसंस्थेतून श्रीमती. सोनाली पांडुरंग पाटील/श्रीमती रूपाली रामचंद्र पाटील मु.श्रीगणेश हौसिंग सोसायटी चेंढरे ता.अलिबाग जि.रायगड यांचे कर्ज थकीत झाल्यामुळे कर्जदाराकडील येणे असलेल्या थकीत कर्जाची रक्कम वसुलीसाठी त्याचे खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये जाहीर लिलावाने विक्री करणे आवश्यक झाले आहे. त्यानुसार मंगळवार दिनांक १८/०८/२०२६ रोजी सकाळी ठिक १२.३० वाजता वसुली अधिकारी हे जयभवानी नागरी सहकारी पतसंस्था म.अलिबाग शाखेत हजर राहून खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत जाहिर लिलावाने विक्री करतील.

**जाहिर लिलाव करावयाच्या स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| कर्जदाराचे नाव व मालमत्ता धारकाचे नाव व पत्ता | मालमत्तेचे वर्णन व तपशील | वाजवी मुल्य |
|---|---|---|
| श्रीमती. सोनाली पांडुरंग पाटील/ श्रीमती. रूपाली रामचंद्र म्हात्रे मु. श्रीगणेश हौसिंग सोसायटी चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड | मौजे चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड येथील ग्रामपंचायत चेंढरे हद्दीतील भुमापन क्र.व उपविभाग ९५/०१ क्षेत्र ०-०५-३० हि मिळकत | मा. जिल्हा उपनिबंधक सो,सहकारी संस्था रायगड-अलिबाग यांनी निश्चित केलेली वाजवी किंमत ५३,००,०००/- अक्षरी रूपये त्रेपन्न लाख मात्र |

लिलावाच्या शर्ती व अटी

१ जाहिर लिलावाच्या शर्ती व अटी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व लिलावाच्या ठिकाणी पहावयास मिळतील.
२. लिलावामध्ये ज्याला बोली बोलावयाची असेल त्यांनी रू.१,००,०००/- (अक्षरी रूपये एक लाख) मात्र एवढी रक्कम 'अनामत' म्हणून पतसंस्थेकडे लिलावापुर्वी किमान १ तास अगोदर जमा करणे आवश्यक आहे.
३. लिलाव मंजूर करणे अगर काही कारणाने लिलाव तहकूब करणे, रद्द करणे किंवा पुढे ढकलण्याचे सर्व अधिकार वसुली अधिकारी व पतसंस्थेकडे राहतील.
४. लिलावाच्या तारखेपर्यंत कर्जदार यांनी येणे असलेल्या कर्जाची व्याजासह पुर्ण परतफेड केल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
५. लिलाव करावयाच्या मालमत्तेसंबंधी माहिती अगर कागदपत्रे पतसंस्थेच्या कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यालयात पहावयास मिळतील.
६. अपसेट प्राइज (वाजवी किंमत) पेक्षा कमी किंमतीच्या बोली नोंदल्या जाणार नाहीत अपसेट प्राइज रू. ५३,००,०००/- अक्षरी रूपये त्रेपन्न लाख रूपये इतकी आहे.
७. मालमत्तेच्या हस्तांतरणाची स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन खर्च व इतर थकीत देय संबधित खर्च भागविण्याची जबाबदारी ही यशस्वी खरेदीदार/ बोलीदार यांची राहील.

ठिकाण -अलिबाग
दि. १६/०७/२०२६

**श्री. विवेक वि.पाटील**
**वसुली अधिकारी**
**रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थाचाचा महासंघ म. अलिबाग**

### पनवेल महानगरपालिका, पनवेल

जा.क्र. पमपा/सचिव/२०-२६/प्र.क्र.०६/२४३/२६
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १६/०७/२०२६

**पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना पुरवणी कार्यसूची**

प्रति,
मा.श्री./श्रीमती. ..................................................
मा.सदस्य/सदस्या,
पनवेल महानगरपालिका, पनवेल.
महोदय/महोदया,

पनवेल महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा क्र.६, बुधवार दिनांक २२/०७/२०२६ रोजी, सकाळी ११:३० वाजता, महापालिकेच्या 'आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल' येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे.

**सर्वसाधारण सभा क्रमांक ०६, दिनांक २२/०७/२०२६ ची**
**पुरवणी कार्यसूची विषयपत्रिका**

**३. मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज :**
**(मुळ विषयपत्रिकेत अ. क्र. १ ते २६ विषय समाविष्ट आहेत.)**

२७. 'माझी वसुंधरा अभियान ४.०' अंतर्गत प्राप्त प्रथम क्रमांकाच्या बक्षीस रक्कमेंतर्गत प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात येणाऱ्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.
२८. पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल शहरातील अमरधाम स्मशानभूमी (अ.भू.क्र.१०६) येथील नादुरुस्त गॅस दाहिनी बदलून नवीन गॅस दाहिनी बसवणे. (दोन युनिट) या कामास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत..

**(मा. महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये)**

सही/-
**नानासाहेब कामठे**
**महापालिका सचिव पनवेल महानगरपालिका**

महापालिका भवन, पनवेल
दिनांक :- १६/०७/२०२६
सोबत - विषयाचा गोषवारा.

### जाहीर नोटीस
**अलिबाग येथील उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या न्यायालयात**

प्रविण नारायण परब ....अपिलार्थी
विरुद्ध
सुजाता विजय वेलणकर ... उत्तरार्थी

सर्व लोकांस कळविण्यात येते की, सदर नोटीसमध्ये वर्णन केलेल्या खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत अपिलार्थी यांनी या न्यायालयात विलंब माफी अर्ज क्र.८६/२०२५ दाखल केले आहे.

| गावाचे नांव | ग.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे सातिर्जे, ता. अलिबाग | २५८ | ०-१४-०० | ०.२७ |

सदर अपिलाच्या सुनावणीच्या नोटीसा अपिलार्थी व उत्तरार्थी यांना देण्यात आल्या असता, खाली नमूद केलेल्या उत्तरार्थींना नोटीसांची बजावणी झाली नसल्याने अपिलार्थी यांनी स्थानिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याची विनंती केली आहे.

उत्तरार्थीचे नाव :
१. सुजाता विजय वेलणकर,
२. श्री.ऋषिकेश विजय वेलणकर,
क्र.१ व २ रा.चोंढी, ता.अलिबाग,जि.रायगड
३. श्री. समिर मधुकर भट,
रा.अे-१४, भक्ती सुधा को.ऑप.हौ.सोसायटी,
दत्तमंदिर रोड, वाकोला पाईप लाईन, सांताक्रुज, पुर्व, मुंबई ४०००५५
४. राधिका मोहन चितले,
(पुर्वाश्रमीची ज्योती अच्युत गोडबोले)
रा.अे-६०२, कपीला वास्तु, प्रताप टॉकीज समोर, खोपट, ठाणे ४००६०३
५. जान्हवी आशिष वेलणकर,
(पुर्वाश्रमीची जान्हवी अच्युत गोडबोले)
रा. जी-१, हिबीस्कर इस्टीम पार्क अपा.३/६
रोझ गार्डन रोड, जे.पी.नगर, पाचवी गल्ली,
बेंगलोर-५६००७८
६. श्री. सचिन मधुकर भट,
रा.५०३, श्रीकृष्ण रुक्मिणी निवास,
नित्यानंद रोड, सारस्वत बँकेजवळ, पनवेल ४१०३०६
७. आरती मनोहर चितळे,
रा.अ-७, शांतीनिकेतन को.ऑप.हौ.सो.
आनंद सिनेमा जवळ, कोपरी रोड, ठाणे पुर्व, ४००६०३
८. श्री. अच्युत कृष्णाजी गोडबोले,
रा.७, वनश्री बंगला, तपोधाम कॉलनी,
तळेगाव-दाभाडे, पुणे

सदर अपिलाची पुढील सुनावणीची तारीख दि.११/०८/२०२६ रोजी निश्चित करण्यात आली आहे. वरील उत्तरार्थी यांनी सुनावणीकामी स्वतः किंवा प्रतिनिधी यांच्यामार्फत उपरोक्त सुनावणीच्या तारखेस व वेळी या न्यायालयात हजर रहावे. सुनावणी कामी आपण स्वतः किंवा आपल्या प्रतिनिधी मार्फत गैरहजर राहिल्यास कागदपत्रांच्या आधारावर गुणवत्तेवर निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(मुकेश चव्हाण)**
**उपविभागीय अधिकारी अलिबाग**
**उपविभाग अलिबाग**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) काशिनाथ भाऊ घरत २) संतोष रामचंद्र करावकर ३) प्रसाद अरुण रोठे ४) यतीन अरुण रोठे ५) भूषण यशवंत पाटील यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे आशिल यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांनी केलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :-

**-: मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे पाझर, ता. अलिबाग, जि. रायगड**

| अ. क्र. | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे. |
|---|---|---|---|
| १ | २९६ | ०-१४-०० पो.ख. ०-०१-०० एकूण ०-१५-०० | ०.३० |
| २ | २९७ | ०-१५-०० पो.ख. ०-०१-०० एकूण ०-१६-०० | ०.३१ |
| ३ | २९८/३ | ०-३९-०० पो.ख. ०-००-०० एकूण ०-३९-०० | १.९५ |
| ४ | ३१९ | ०-३१-६० पो.ख. ०-०२-८० एकूण ०-३४-४० | ८.८१ |
| ५ | ३२० | ०-०४-५० पो.ख. ०-००-५० एकूण ०-०५-०० | ०.१० |
| ६ | ३२१ | ०-०४-५० पो.ख. ०-००-५० एकूण ०-०५-०० | ०.०९ |
| ७ | ३२२ | ०-०२-६० पो.ख. ०-०१-०० एकूण ०-०३-६० | ०.०४ |
| ८ | ३२३ | ०-०१-५० पो.ख. ०-००-५० एकूण ०-०२-०० | ०.०२ |
| ९ | ३२४ | ०-२१-७० पो.ख.०-०२-८० एकूण ०-२४-५० | ३.१९ |
| १० | ३२५ | ०-२५-५० पो.ख.०-०२-८० एकूण ०-२८-३० | ५.९४ |
| ११ | ३०७/१ | ०-३३-३० पो.ख.०-०९-१० एकूण ०-४२-४० पैकी रस्त्याकरीता ०.०१.५० एवढे क्षेत्र | ५.८० |
| १२ | ३१७ | ०-४०-६० पो.ख. ०-०४-०० एकूण ०-४४-६० पैकी रस्त्याकरीता ०.०२.६० एवढे क्षेत्र | ९.०५ |
| १३ | २९८/१ | ०-१५-९० पो.ख. ०-०८-९० एकूण ०-२४-८० | ०.५३ |
| १४ | ४१८ | ०-२४-६० पो.ख. ०-०१-०० एकूण ०-२५-६० पैकी क्षेत्र ०.१२.५० | ७.२६ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्या संबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १७/०७/२०२६
सही/-
**ॲड. तनुष्का पेडणेकर**
**ता. अलिबाग, जि. रायगड**
**मो.नं. ७०५७८८१६६६**

# नगरपरिषदेत पुन्हा रंगला ९-१२ खेळ




**| चिरनेर | प्रतिनिधी |**

कोकण विभागीय आयुक्तांच्या आदेशाने पुनरिक्षणासाठी उरण नगरपरिषदेने मंगळवारी (दि.१४) सर्वसाधारण सभेचे आयोजन केले होते. परंतु, या सभेत बहुमतात असलेल्या भाजपच्या १२ सदस्यांनी ९ सदस्यीय महाविकास आघाडी विरोधात भूमिका घेत ३८ ठरावांवर नामंजूरीची मोहर उमटवली. त्यामुळे शहराच्या विविध विकास कामांसाठी आयोजित सभा पुन्हा एकदा निरर्थकच ठरली.

उरण नगरपरिषदेने दि.१८ मे रोजी सर्वसाधारण सभा आयोजित केली होती. या सभेत विविध विकास कामांचे ४४ विषय कार्यक्रमपत्रिकेवर ठेवण्यात आले होते. परंतु, सभेचे कामकाज सुरू असतानाच ७ ठरावांनंतर सत्ताधारी महाविकास आघाडी विरोधात भाजपच्या १२ सदस्यांमध्ये वादाची ठिणगी पडली आणि वादविवादाने आणखीनच गंभीर स्वरूपाची स्थिती निर्माण झाली. त्यामुळे नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी विरोधकांतील दोन सदस्यांना सभागृहाबाहेर जाण्याचे फर्मान सोडले होते. मात्र, नगराध्यक्षांच्या आदेशाचे विरोधी सदस्यांनी पालन केले नाही. त्यावेळी सभागृहातील विरोधकांची उपस्थिती डावलून सत्ताधारी महाविकास आघाडीच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी ९ सदस्यांच्या जोरावर विकास कामांचे ४४ ठराव मंजूर केले होते. परंतु, त्याला भाजपच्या सदस्यांनी विरोध करून रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करून दाद मागितली होती. मात्र, याबाबत अधिकार नसल्याचे सांगत जिल्हाधिकाऱ्यांनी कोकण विभागीय आयुक्तांकडे पाठविण्याची सूचना केली होती. त्यानुसार भाजपच्या सदस्यांनी कोकण विभागीय आयुक्तांकडे तक्रार दाखल केली होती, अशी माहिती उरण नगरपरिषद कार्यालयाकडून देण्यात आली. कोकण विभागीय आयुक्तांनी दिलेल्या आदेशानंतर पुनरिक्षणासाठी मंगळवारी (दि.१४) उरण नगरपरिषदेने नगराध्यक्षा भावना घाणेकर यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभा बोलाविण्यात आली होती. मात्र, कोकण विभागीय आयुक्तांच्या आदेशाने बोलाविण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेतही भाजपच्या १२ सदस्यांनी ३८ ठराव बहुमताच्या जोरावर नामंजूर केले. विरोधकांनी विरोधाची परंपरा कायम राखल्याने शहराच्या विविध विकास कामांसाठी आयोजित सर्व साधारणसभा पुन्हा एकदा निरर्थक ठरली.

- **भाजपच्या सदस्यांची ठरावांना नामंजुरी**
- **पुनरिक्षण सर्वसाधारण सभा निरर्थक**

> **विभागीय कोकण आयुक्तांनी महिलांचे विविध प्रश्न व स्वच्छता, आरोग्य, स्वच्छतागृहासारख्या विषय नाकारु नयेत, अशा सूचना केल्या होत्या. मात्र, त्यानंतरही भाजप सदस्यांनी हे विषय नामंजूर केले.**
> **- भावना घाणेकर, नगराध्यक्षा, उरण नगरपरिषद**

## उद्यानातील सुरक्षा रक्षकांची परवड




| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिकेने पालिका क्षेत्रातील विविध उद्याने व सार्वजनिक ठिकाणी सुरक्षा रक्षकांच्या सेवेसाठी आधुनिक सुरक्षा केबिन उभारल्या आहेत. खांदा वसाहत सेक्टर-६ येथील उद्यानातही अशी केबिन बसविण्यात आली आहे. मात्र, या केबिनमध्ये पिण्याच्या पाण्यासह इतर मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने सुरक्षा रक्षकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या केबिनमध्ये बसण्याची तसेच शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असली, तरी शौचालयासाठी पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली नाही. तसेच, ड्रेनेज लाईनचे जोडणीचे कामही अद्याप पूर्ण झालेले नसल्याचे समोर आले आहे. परिणामी, शौचालय असूनही त्याचा उपयोग होत नसल्याने सुरक्षा रक्षकांची गैरसोय होत आहे. विशेष म्हणजे, या सुरक्षा केबिन बसवून वर्षभराहून अधिक कालावधी लोटला असतानाही मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे संबंधित विभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

## शाळांची हस्तांतरण करण्याची मागणी

**पनवेल : रायगड** जिल्हा परिषदेकडून पनवेल पालिकेकडे हस्तांतरित होणाऱ्या प्राथमिक शाळांचे तातडीने हस्तांतरण करण्याची मागणी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी आयुक्तांकडे केली आहे. पालिका हद्दीतील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पालिकेकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सीएसआर फंड आणि इतर निधीच्या माध्यमातून या शाळांची सुधारणा होऊ शकते. त्यामुळे शाळांचे तातडीने हस्तांतरित करण्याची मागणी केली आहे.

## जुन्या वादातून चालकाची हत्या

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल गावाकडील जुन्या जातीय वादाचा आणि मारहाणीचा राग मनात धरुन ट्रक चालकाने आपल्या सहकारी चालकाची डोक्यात हत्याराने वार करुन निघृण हत्या केल्याची घटना तळोजा येथे घडली आहे. चंदन कपिलकुमार पांडे (४५) असे मृत चालकाचे नाव असून, आरोपी रमेशकुमार स्वामीनाथ यादव (४०) याच्या विरोधात तळोजा पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. मृत चंदन आणि आरोपी रमेशकुमार दोघेही मुळचे उत्तर प्रदेशचे असून तळोजा नितळस येथील निशा ट्रान्सपोर्टमध्ये चालक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या गावात दोन्ही कुटुंबात जातीवरुन जुना बाद होता. याच वादातून चंदनने रमेशकुमारला मारहाण केली होती. याचाच बदला घेण्यासाठी रमेशकुमारने पार्किंग क्षेत्रात चंदनच्या डोक्यावर धारदार हत्याराने वार केले आणि तो फरार झाला. गंभीर जखमी चंदनला पनवेल उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. तळोजा पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून, फरार आरोपीच्या शोधासाठी विशेष पथके रवाना केली आहेत.

## सदनिकेतील बेकायदेशीर लॉजिंगवर छापा

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल तालुक्यातील उलवे सेक्टर-२३ मधील उच्चभ्रू इमारतीमधील सदनिकेत शासनाचे नियम धाब्यावर बसवून बेकायदेशीररित्या व्यावसायिक लॉजिग चालविण्यात येत असल्याचे उघडकीस आले आहे. अभिभा स्टे या नावाने बेकायदेशीररित्या सुरु असलेल्या या लॉजिंगवर उलवे पोलिसांनी छापा मारुन ते बंद केले आहे. तसेच, ३ भागीदार व्यावसायिकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

उलवे पोलीस ठाण्याचे पथक रात्रीच्या सुमारास परिसरात गस्त घालत होते. त्यावेळी सेक्टर-२३ मधील ब्रम्हराज एन्क्लेव्ह या इमारतीच्या सहाव्या मजल्यावरील सदनिका क्रमांक ६०१, ६०२, ६०३ आणि ६०४ मध्ये विनापरवाना व्यावसायिक स्तरावर लॉजिंग चालवले जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास या ठिकाणी अचानक छापा टाकला. यावेळी या ४ सदनिकेत कोणतीही वैध परवानगी किंवा परवाना नसताना निवासी संकुलात लॉजिंग सुरु असल्याचे आढळून आले. त्यांनी कोणत्याही शासकीय प्राधिकरणाची किंवा पोलिसांची परवानगी न घेता निवासी सदनिकेचे व्यावसायिक लॉजिंगमध्ये रुपांतर केल्याचे, तसेच शासकीय आदेशांचे उल्लंघन करुन ग्राहकांना बेकायदेशीररित्या वास्तव्यासाठी खोल्या दिल्या जात असल्याचे आढळून आले. त्यामुळे उलवे पोलिसांनी अजय गर्ग (३५), रोनक अग्रवाल (४०) आणि पार्थ नजाज (२१) या तिघा भागीदारांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळे पनवेलमधील अवैध लॉजिंग सुरू करणाऱ्यांच्या धाबे दणाणले आहेत.

## वाहतूक शाखेच्या तत्परतेमुळे मदत



**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर वाहतूक शाखेचे अधिकारी व अंमलदार वाहतूक नियमनासोबतच आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या मदतीसाठीही तत्पर असल्याचे पुन्हा एकदा दिसून आले. त्यातील पहिली घटना नवीन पनवेलमध्ये घडली. नवीन पनवेल सिग्नल येथे कर्तव्य बजावत असताना पोलीस नाईक विश्वनाथ पाटील व पोलीस शिपाई संजय घाडगे यांच्या निदर्शनास एका टेम्पो चालकास अचानक आकडी आल्याची घटना घडली. यावेळी दोन्ही पोलीस कर्मचाऱ्यांनी तात्काळ धाव घेऊन संबंधित चालकावर प्राथमिक उपचार केले. चालक शुद्धीवर आल्यानंतर वाहन मालकाशी संपर्क साधून त्याला पुढील उपचारासाठी रुग्णालयात रवाना करण्यात आले. दुसरी घटना देखील त्याच ठिकाणी कर्तव्यावर असताना एका वाहनाचा स्कुटीला धक्का लागल्याने त्यावरील व्यक्ती खाली पडून जखमी झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलीस नाईक विश्वनाथ पाटील व पोलीस शिपाई संजय घाडगे यांनी तात्काळ जखमीस रिक्षामधून पटवर्धन हॉस्पिटल येथे उपचारासाठी रवाना केले. या दोन्ही घटनांमध्ये वाहतूक पोलिसांनी दाखविलेली तत्परता, मानवतावादी दृष्टिकोन आणि वेळेवर दिलेली मदत यामुळे जखमींना त्वरित उपचार मिळू शकले.

## झोपडपट्टी परिसरात धूर फवारणी सुरू

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

पावसाचे दिवस सुरू झाले असून, पावसाळ्यात विविध आजारांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेषतः मलेरिया, डेंगू, ताप, सर्दी आणि खोकला यांसारखे आजार पावसाचे पाणी साचलेल्या ठिकाणी वाढणाऱ्या डासांमुळे फैलावत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे नागरिकांनी अधिक काळजी घेण्याची गरज निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेकडून पनवेल झोपडपट्टी परिसरात धूर फवारणी मोहीम जोरात सुरू करण्यात आली आहे. साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढू नये आणि साथीच्या आजारांवर नियंत्रण मिळवता यावे, यासाठी पालिकेच्या वतीने विविध ठिकाणी फवारणी करण्यात येत आहे.



## आर्थिक लोभापायी ठेकेदारांची पाठराखण?



**| माथेरान | प्रतिनिधी |**

माथेरानमधील शारलोट तलावातील गाळ काढणे आणि अन्य कामांसाठी जवळपास ५ कोटी रुपयांचा खर्च करण्यात येत आहे. परंतु, त्यातील काही गाळ काढला असला, तरी मुख्य तलावात मोठ्या प्रमाणावर गाळ शिल्लक आहे. तरी देखील संबंधित ठेकेदारांना मोठ्या रकमेची बिले अदा करण्यात आल्याचे बोलले जात आहे. निविदेत नमूद केल्याप्रमाणे तलावातील संपूर्ण गाळ काढणे अनिवार्य असताना देखील गाळ तसाच राहिल्याने पाण्याचा तुटवडा भासत आहे. याबाबत माहितीच्या अधिकारात माहिती मागविली असता, पालिका प्रशासनाच्यावतीने सहायक रचनाकार करुणा बांगर यांनी काही महत्वपूर्ण कारणास्तव ठेकेदाराच्या बाजूने मोगम उत्तर देऊन वेळ मारून नेली आहे. त्यामुळे या कामांची चौकशी होणार ही बाब लक्षात येताच करुणा बांगर यांनी आपली बदली अन्य ठिकाणी करून घेतल्याचे बोलले जात आहे. या कामात मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार झाल्याचे स्वतः सत्तेतील नगरसेवकच बोलू लागल्याने यामध्ये काहीतरी तथ्य असणार, अशी कुजबुज वेगाने सुरू झाली आहे.




## निवडक



### जनतेच्या पैशाची वारेमाप उधळपट्टी

**माथेरान :** अनेक पर्यटक हे खासकरून पायी भटकंती करण्यासाठी माथेरानमध्ये येत असतात. परंतु, काही महत्त्वाच्या पॉईंट्स वरील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे. त्यामुळे आपण रस्त्यावरून चालत आहोत की एखाद्या नाल्यातून जात आहोत, असा प्रश्न पर्यटकांना पडत आहे. मुंबई पुण्यापासून अगदी जवळचे स्थळ म्हणून माथेरानमध्ये बाराही महिने पर्यटकांची रेलचेल सुरू असते. शनिवार आणि रविवारच्या दिवशी तर याठिकाणी यात्रेचे स्वरूप प्राप्त होते. परंतु, प्रशासन आणि संबंधित लोकप्रतिनिधींनी याकडे कानाडोळा केल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. महत्त्वाचे म्हणजे रस्त्यांच्या सुरक्षेसाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. मर्जीतील ठेकेदारांना कामे देऊन रस्त्यांची अक्षरशः धूळधाण झाली असून, पावसाळी बंधारे उत्तम प्रकारे करण्याऐवजी नको त्या ठिकाणी टाकण्यात आले असून, ही सर्व धरठोक कामे करून बिले प्राप्त केली जात आहेत. त्यामुळे जनतेच्या पैशाची नाहक उधळपट्टी करणे बंद करून आतातरी या गावाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### पोस्टात ज्येष्ठांसाठी स्वतंत्र काऊंटर

**नवीन पनवेल :** येथील पोस्ट कार्यालयात ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र काउंटर सुरू करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते आदित्य अशोक जानोरकर यांनी पोस्टमास्टर त्यांच्याकडे निवेदन देऊन केली होती. त्यानुसार पोस्ट कार्यालयाने ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र काउंटर सुरू केले आहे. नवीन पनवेल पोस्ट कार्यालयामध्ये जवळपास दहा काउंटर असूनही निम्म्याहून अधिक काउंटर बंद असल्याबाबत आदित्य जानोरकर यांनी तक्रार केली होती. त्यामुळे अनेक नागरिकांना गर्दीत उभे राहावे लागते आणि त्यांची गैरसोय होत होती. जानोरकर यांनी याबाबत अधिकाऱ्यांसोबत पत्र व्यवहार केला. त्यानुसार या पत्राची दखल घेत ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र काउंटर सुरू करण्यात आला आहे. तसेच, इतर बंद अवस्थेत असलेले काउंटर देखील सुरू करण्याची मागणी त्यांनी केली आहे. आणि पोस्ट बँकेला एक काउंटर आणि मल्टीपर्पज साठी एक काउंटर द्यावा जेणेकरून गर्दीच्या वेळेस सामान्य नागरिकांसाठी एक अतिरिक्त काउंटर सुरू ठेवता येईल, असे आदित्य जानोरकर यांनी म्हटले आहे.

### रानभाजी स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

अलिबाग : महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी यांच्यावतीने ''उत्सव रानभाज्यांचा जागर वसुंधरेचा'' या उपक्रमांतर्गत दिवेआगर येथे रानभाजी पदार्थ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत परिसरातील १६ महिलांनी उत्स्फू सहभाग नोंदवत पारंपरिक रानभाज्यांपासून विविध पौष्टिक व स्वादिष्ट पदार्थ सादर केले. परीक्षकांनी चव, पौष्टिकता, पारंपरिकता, मांडणी आणि सादरीकरण या निकषांवर परीक्षण करून विजेत्यांची निवड केली. कांदा-लसूण न वापरता तयार करण्यात आलेल्या पारंपरिक रानभाजी पदार्थाला प्रथम क्रमांक मिळाला. विजेत्यांसह सर्व सहभागी महिलांचा बक्षिसे व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. जिल्हा व्यवस्थापक शैलेश मराठे यांनी रानभाज्यांचे औषधी गुणधर्म, पारंपरिक खाद्यसंस्कृतीचे जतन आणि महिलांमार्फत शासनाच्या योजनांचा प्रभावी प्रसार करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

### मोबाईल विक्री वाहनधारकांच्या प्रश्नावर चर्चा

**पनवेल :** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेअंतर्गत व्यवसाय करणाऱ्या मोबाईल विक्री वाहनधारकांच्या प्रश्नावर युवासेनेच्या शिष्टमंडळाने पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या चर्चे नंतर संबंधित प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा निघेपर्यंत मोबाईल विक्री वाहनधारकांवरील कारवाईला तात्पुरती स्थगिती देण्याच्या सूचना करण्यात आल्याची माहिती युवासेनेतर्फे देण्यात आली. विश्वजीत बारणे यांच्या मार्गदर्शनाखाली व पराग मोहिते यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने महापौरांची भेट घेतली. यावेळी अभिनय सोमण, जय कुष्टे, प्रेम ठाकूर, ओंकार वेदांत, जयेश विसावे, ॲड. तुषार चौधरी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. तसेच, या बैठकीत मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेअंतर्गत व्यवसाय करणाऱ्या ३७ हून अधिक मोबाईल विक्री वाहनधारकांच्या अडचणी महापौरांसमोर मांडण्यात आल्या. महापालिकेकडून कारवाई होत असल्याने अनेक लघु उद्योजकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाल्याचे सांगत, लाभार्थ्यांसाठी अधिकृत व्यवसायाची जागा निश्चित करून कायमस्वरूपी धोरण तयार करण्याची मागणी युवासेनेने केली.

**औद्योगिक क्षेत्राविरोधात शेतकऱ्यांचा संताप** | **पूरस्थितीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान**

# रासायनिक सांडपाण्यामुळे शेतीची बरबादी?

**| चणेरा | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यात गेल्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मात्र, या नैसर्गिक आपत्तीबरोबरच धाटाव औद्योगिक क्षेत्रातून कथितरित्या सोडण्यात आलेले रासायनिक सांडपाणीही पूराच्या पाण्यासोबत शेतांमध्ये शिरल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. त्यामुळे नुकतीच केलेली भात पेरणी मोठ्या प्रमाणात खराब झाल्याने खारापटीसह तालुक्यातील अनेक गावांतील शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे.



पावसाळ्याच्या सुरुवातीलाच शेतकऱ्यांनी मोठा खर्च करून भात पेरणी केली होती. मात्र, पूर ओसरल्यानंतर अनेक शेतांमधील भाताची रोपे पिवळी पडलेली, कुजलेली तसेच वाळलेली दिसून येत आहेत. काही ठिकाणी उगवण झालेली रोपे पूर्णपणे नष्ट झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. त्यामुळे आधीच वाढलेल्या शेतीखर्चात आणखी भर पडणार असून, पुन्हा पेरणी करण्यासाठी मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागणार आहे. स्थानिक शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, दरवर्षी मुसळधार पाऊस आणि पूरस्थितीचा फायदा घेत धाटाव औद्योगिक क्षेत्रातील काही उद्योगांकडून रासायनिक सांडपाणी कुंडलिका नदीत सोडले जाते. हे दूषित पाणी पूराच्या प्रवाहासोबत शेतांमध्ये येत असल्याने जमिनीची सुपीकता कमी होण्याबरोबरच पिकांचे मोठे नुकसान होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. यापूर्वीही अशा प्रकारच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या, मात्र ठोस कारवाई झाली नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

पूर ओसरल्यानंतर अनेक शेतांमध्ये दिसून आलेल्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित विभागाने तातडीने घटनास्थळी भेट देऊन शेतातील आणि नदीतील पाण्याचे नमुने तपासावेत, नुकसानीचे पंचनामे करावेत तसेच या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी उद्योगांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे. याशिवाय नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत, दुबार पेरणीसाठी विशेष अनुदान, बियाणे आणि खतांचे मोफत वाटप तसेच शेतीचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी शासनाने विशेष पॅकेज जाहीर करावे, अशीही मागणी शेतकरी संघटनांनी केली आहे.

# सरकारी दयेचा नवा डोस

सरकारने शेतकऱ्यांची थकलेली वीजबिले माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. कर्जमाफीसाठी ३६ हजार ५०० कोटी रुपये लागणार होते. वीजबिलमाफीसाठी ४८ हजार कोटी रुपये लागतील. साडेसात हॉर्सपॉवरपर्यंतच्या वीजपंपांसाठीची जितकी म्हणून थकलेली बिले असतील ती आता सरकार भरेल. यापूर्वी २०२४ च्या अर्थसंकल्पामध्ये शेतकऱ्यांना फुकट वीज देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. तेव्हा विधानसभा निवडणुका तोंडावर होत्या. लोकसभेत दणकून पराभव झाला होता. त्यामुळे मतदारांवर सवलतींची खैरात करण्यात आली. लाडकी बहीण योजना ही त्याच काळात जन्माला आली. या खैरातीला काही प्रमाणात मतदार भुलले आणि महायुतीचा विक्रमी विजय झाला. तेव्हा दिलेले शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन पूर्ण करण्यात महायुती टाळाटाळ करीत होती. त्यासाठी शेतकरी नेत्यांना आंदोलन करावे लागले. मग एका वर्षाच्या विलंबाने परवा कर्जमाफी जाहीर झाली. पण त्यातील अटीशर्ती इतक्या गुंतागुंतीच्या आहेत की नेमक्या कोणाला याचा फायदा होणार आहे याचा सहजी अंदाज येणे कठीण. गेल्या कर्जमाफीचा फायदा घेतलेल्यांना यावेळी ५० हजारांपर्यंतच माफी मिळेल असे आधी जाहीर करण्यात आले. मग चाव्या फिरल्या. आता हा लाभ दोन लाख रुपये करण्यात आला आहे. वीज फुकट देतानाच २०२४ मध्ये वीजबिलांची थकबाकीही सरकार भरेल असे आश्वासन उडत उडत देण्यात आले होते. ते आता पूर्ण करण्यात आले आहे असे बहुदा फडणवीस सांगतील. ते खोटे नाही. पण यामध्येही काही अटीशर्ती आहेत की काय हे तपासावे लागेल. त्यानंतरच सरकारच्या धोरणाचे स्वागत करता येईल. कर्जमाफी योजनेमध्ये अशाच अटींमुळे शेतकऱ्यांना त्याचा पुरेसा लाभ मिळणार नाही अशी अनेकांची तक्रार आहे. राजू शेट्टी यांनीही तशी टीका केली आहे. या स्थितीत सरकारच्या प्रत्येक धोरणाकडे व घोषणेकडे सावधपणे पाहणे व त्यात नेम की काय मेख आहे हे पाहणे गरजेचे आहे. लाडकी बहीण योजनाही सुरुवातील मते मिळवेपर्यंत सरसकट राबवली गेली. सरकारच्या म्हणजेच लोकांच्या खिशातून हजारो कोटी रुपये वायफळ उधळले गेले. तेच पैसे घेऊन लोकांनी महायुतीला मतदान केले आणि तेही या भ्रष्टाचारात सामील झाले. आता कर्जमाफी व वीजबिलमाफीमध्येही काय भानगड आहे हे त्यांची अंमलबजावणी सुरु झाली की कळेलच.

## दुटप्पी धोरणाचा नमुना

एकीकडे आपल्याकडे पैसे नाहीत असे सरकार कबूल करते. दुसरीकडे अशा हजारो कोटींच्या योजना आणते यात मोठा विरोधाभास आहे. लाडकी बहीण योजनेने अर्थ खात्याच्या कंठाशी प्राण आले. तरीही हा फास सोडवण्याची हिंमत सरकारमध्ये नाही. कर्जमाफीच्या संदर्भातही सरकारचे हेच झाले आहे. राजकीय कारणांसाठी सर्व राजकीय पक्ष शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याची आश्वासने देतात. पण यामुळे शेतकऱ्यांना भिकाऱ्यांची अवकळा येते. सरकारच्या दयेवर अवलंबून असलेले प्राणी अशी त्यांची ओळख बनते. एकीकडे शेती स्वावलंबी करण्याच्या बाता केल्या जात असताना दुसरीकडे शेतकरी अधिकाधिक सरकारवर कसा अवलंबून राहील हे पाहिले जात आहे. कर्जमाफी हा तर एक फार्स झाला आहे. दर काही वर्षांनी हे कर्ज माफ केले जाणार हे शेतकऱ्यांना कळून चुकले आहे. पण यामुळे शेतीची बळकट व्यवस्था उभी राहू शकत नाही. शेतकरी म्हणजे सरकारच्या भिकेवर जगणारा समुदाय अशी स्थिती होते. काल वीजबिलमाफीची घोषणा करीत असतानाच मुख्यमंत्र्यांनी वेगळे वाटतील असे विचार मांडले. कर्जमाफी हा काही अंतिम उपाय असू शकत नाही असे ते म्हणाले. याच फडणवीसांनी पहिल्या कार्यकाळात बराच काळ कर्जमाफीला विरोध केला होता. त्यांना राज्याची आर्थिक स्थिती ठाऊक आहे. तरीही ते उठसूठ अशा माफ्या देत राहतात हे लक्षात घेण्यासारखे आहे. ही केवळ कोण्या राजकीय नेत्याची मजबूरी नाही. हे भाजपचे दुटप्पी व ढोंगी धोरण आहे. पंतप्रधान म्हणून रेवडी संस्कृतीवर टीका करायची आणि लगेच काही दिवसांनी निवडणूक प्रचारात अशा रेवड्या उधळायच्या हे या देशात गेल्या बारा वर्षात वारंवार घडले आहे. कर्जमाफीबाबत टीका करून आपण किती प्रागतिक आहोत असे भासवायचे आणि नंतर कर्जमाफी करून किंवा लाडकी बहीणसारखा तदद्र भ्रष्टाचारी प्रकार आणून निवडणुका जिंकायच्या हेच भाजपचे खरे धोरण आहे.

## माफीचा लाभ नेमका कोणाला

या कोणत्याही माफ्यांचा खरा लाभ नेमका कोणाला होतो हेही एकदा तपासायला हवे. याबाबत सरकारने खरे तर सखोल सर्व्हे करायला हवा. काही अभ्यासकांच्या मते श्रीमंत शेतकरी, काळा पैसा लपवण्यासाठी शेतीत उतरलेले लोक, सरकारी खात्यात दाबून पैसा खाणारे आणि सरकारात ओळखी असणारे लोक अशांनाच या माफ्यांचा सर्वाधिक फायदा होत असतो. प्रामाणिक व गरजू शेतकऱ्यांना काही प्रमाणात याचा लाभ झाला तरी अशा सवलतीमधून त्यांच्या हातात काहीच पडत नाही. कर्जाचा एक बोजा कमी होतो इतकेच. पण यामुळे शेतीत गुंतवायला ना नवीन भांडवल तयार होते ना वीजबिलमाफीसारख्या योजनांमुळे फार बचत होते. कोकणातील बहुतांश शेतकरी या कर्ज प्रकरणापासून दूर असतो. याचे कारण फळबागा सोडल्या तर कोकणात पैसे मिळवून देणारी नगदी पिके नाहीत. भात वगैरे खाण्यापुरते पिकवणाऱ्या गरीब शेतकऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. परिणामी कोकणात कर्ज फेडण्याचे प्रमाणही सर्व महाराष्ट्रात अधिक आहे. हे खुद्द शरद पवार यांनीही एके ठिकाणी मान्य केले होते. उर्वरित महाराष्ट्रात कापूस, सोयाबीन, ऊस, केळी इत्यादी नगदी पिकांसाठी सर्रास कर्जे घेतली जातात. याच भागात पावसाचा लहरीपणा अधिक आहे. अवर्षण आणि अतिवृष्टी हे सातत्याने घडत राहते. मात्र या विपरीत स्थितीत मरण असते ते सामान्य गरीब शेतकऱ्याचे. दोन नंबरचे धंदेवाले आणि शेतीवर पोट अवलंबून नसणारे लोक काहीही जुगाड करून शेती वाढवत नेतात. सरकारी योजनांचे लाभ उपटतात. माफीला पात्र नसूनही ती बरोबर मिळवतात. लाडकी बहीण योजनेत पुरुषांनी देखील पैसे लाटले होते. इतक्या आंधळ्या कारभारात पीठ खाणारी कुत्री भरपूर असणार हे कोणीही शाळकरी मूलदेखील सांगू शकेल. कर्जमाफीमुळे साध्या शेतकऱ्यांना यंदा कर्ज मिळण्यात अडचणी आल्या नसतील. ते चांगले आहे. पण यामुळे त्यांच्या हातात दोन पैसे शिल्लक राहतील असे कमी प्रमाणात घडेल. खते, बियाणे, वाहतूक यांचे खर्च इतके प्रचंड वाढले आहेत की हातातला पैसा पाचोळ्यासारखा उडून जातो. शेतमालाला किफायती भाव मिळण्याच्या बाबत सरकार नुसता बोलघेवडेपणा करते. प्रत्यक्षात गहू व तांदूळ सोडल्यास बाकी पिकांची खरेदीच होत नाही. झाली तरी ती सरकारी हमीभावापेक्षा कमी दराने होते. शिवाय, सरकारी हमीभाव हा जेमतेम खर्च भरून निघेल इतकाच असतो. त्यातून फायदा व्हायला हवा तो मिळतच नाही. मोदी वा फडणवीसांच्या धोरणातून ही स्थिती बदलण्यासाठी काही उपकारक घडत नाही.

---

विचार

# हसीना यांच्या भूमिकेने राजकीय हादरा

***बांगलादेशातील आजची राजकीय परिस्थिती केवळ सत्तासंघर्षाची नाही, तर ती विचारसरणींच्या संघर्षाचीही आहे. एका बाजूला धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची परंपरा आहे, तर दुसऱ्या बाजूला धार्मिक राजकारण अधिक प्रभावी होत आहे. स्वातंत्र्ययुद्धाच्या आदर्शांवर उभा राहिलेला बांगलादेश आज नव्या वैचारिक वळणावर उभा आहे. अशा वेळी शेख हसीना यांचे पुनरागमन या देशाच्या भविष्यासाठी निर्णायक टप्पा ठरू शकतो.***



प्रा. जयसिंग यादव

इतिहासाची एक विलक्षण सवय असते. तो कधीच कोणत्याही नेत्याला कायमचा निरोप देत नाही. एका हाताने तो सत्तेचा मुकुट हिसकावून घेतो, तर दुसऱ्या हाताने पुनरागमनाची आशा जिवंत ठेवतो. कालपर्यंत ज्यांच्या एका शब्दावर संपूर्ण राष्ट्राचे राजकारण फिरत होते, त्याच नेत्याला आज निर्वासिताचे जीवन जगावे लागते आणि निर्वासनात असतानाच तो पुन्हा मायभूमीत परतण्याची घोषणा करतो. दक्षिण आशियाच्या राजकारणात हे दृश्य नवे नाही; पण प्रत्येक वेळी ते तितकेच नाट्यमय असते. बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी 'याच वर्षी मी बांगलादेशमध्ये परतणार' असे जाहीर करताच ढाक्यापासून दिल्लीपर्यंतच्या राजकीय वर्तुळात पुन्हा खळबळ उडाली. एका वाक्याने संपूर्ण राजकीय पट पुन्हा हलू शकतो, याचे हे जिवंत उदाहरण आहे. अलिकडेच एका वाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये हसीना यांनी बांगलादेशमध्ये याच वर्षी परतण्याची घोषणा करून एकाच वेळी अनेक संदेश दिले. सत्ता माणसाला जितके उंच नेते, तितक्याच वेगाने जमिनीवरही आणते. कालपर्यंत सलग चार वेळा पंतप्रधानपद भूषवणाऱ्या, बांगलादेशच्या विकासाचा चेहरा म्हणून गौरवल्या जाणाऱ्या हसीना आज शेकडो गुन्ह्यांना सामोऱ्या जात आहेत. त्यांच्यावर हत्या, भ्रष्टाचार, सत्तेचा गैरवापर आणि मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांचे आरोप आहेत. एका प्रकरणात त्यांना मृत्युदंडाची शिक्षाही सुनावण्यात आल्याचा दावा केला जात आहे. ज्या देशात त्यांनी दशकांपर्यंत निर्विवाद नेतृत्व केले, त्याच देशात आज त्यांचे नाव न्यायालयांच्या नोंदीत आरोपी म्हणून आहे.

इतिहासाची ही क्रूर विडंबना म्हणावी लागेल; मात्र राजकारण हे न्यायालयीन निकालांपेक्षा जनमानसाच्या स्मृतींवर अधिक चालते. जनतेची स्मृती ही नेहमीच द्वंद्वात्मक असते. ती एखाद्या नेत्याच्या चुका विसरत नाही; पण त्याची कामगिरीही सहज पुसून टाकत नाही. हसीना यांच्या नेतृत्वाखाली बांगलादेशने वस्त्रोद्योगात जागतिक स्थान मिळवले, महिलांचे आर्थिक सक्षमीकरण वाढले, पायाभूत सुविधा विस्तारल्या, गरिबीमध्ये घट झाली आणि आर्थिक वाढीचे अनेक विक्रम नोंदवले. दुसरीकडे विरोधकांवरील कारवाई, प्रसारमाध्यमांवरील निर्बंध, निवडणुकांच्या निष्पक्षतेबाबतचे प्रश्न आणि वाढती केंद्रीकृत सत्ता यांमुळे त्यांच्यावर सातत्याने टीकाही झाली. म्हणूनच आज त्यांच्याबद्दलचा जनमताचा कौल सरळ नाही, तर तो आशा आणि अविश्वास यांच्या मधोमध उभा आहे. २०२४ मधील विद्यार्थी आंदोलनाने बांगलादेशचा राजकीय इतिहास बदलला. हजारो तरुण रस्त्यावर उतरले. बेरोजगारी, आरक्षण, प्रशासनातील कथित दडपशाही आणि लोकशाही संस्थांवरील प्रश्न या सगळ्यांनी आंदोलनाला वेग दिला. अखेरीस सत्तेचा अभेद्य किल्ला कोसळला आणि हसीना यांना देश सोडावा लागला. अनेकांना वाटले होते, की हा त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा शेवट आहे; पण दक्षिण आशियाच्या राजकारणात शेवट इतक्या सहज होत नाही. इथे पराभूत नेतेही पुन्हा उभे राहतात, कारण इथले राजकारण संस्थांपेक्षा व्यक्तिमत्त्वांभोवती फिरते.

याच व्यक्तिकेंद्रित राजकारणाचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे अवामी लीग. हा केवळ एक राजकीय पक्ष नाही, तर बांगलादेशच्या स्वातंत्र्यलढ्याशी जोडलेला भावनिक वारसा आहे. राष्ट्रपिता शेख मुजीबुर रहमान यांच्या नेतृत्वाखाली जन्मलेला हा पक्ष आजही त्यांच्या कुटुंबाभोवती फिरतो. त्यामुळे हसीना यांनी पक्षाचे नेतृत्व दुसऱ्याच्या हाती दिले असते, तर तो केवळ संघटनात्मक बदल ठरला नसता, तर मुजीब कुटुंबाच्या राजकीय वारशाच्या अस्तित्वालाच आव्हान ठरला असता. त्यामुळे त्यांनी स्वतःच पुनरागमनाची घोषणा करून हा वारसा अजूनही आपल्या हातात असल्याचा संदेश दिला आहे; पण प्रश्न केवळ अवामी लीगचा नाही. प्रश्न आहे बांगलादेशमधील लोकशाहीचा. एखादा नेता कितीही लोकप्रिय असला, तरी लोकशाहीची ताकद व्यक्तीपेक्षा संस्थांमध्ये असते. न्यायालये स्वतंत्र असली पाहिजेत, निवडणुका विश्वासार्ह असल्या पाहिजेत आणि विरोधी पक्षाला राजकीय अवकाश मिळाला पाहिजे. दुर्दैवाने दक्षिण आशियामध्ये ही तीनही तत्त्वे अनेकदा राजकीय संघर्षात हरवून जातात. सत्तेवर असताना विरोधकांना कमकुवत करण्याचा प्रयत्न करणारे नेतेच सत्तेबाहेर गेल्यावर लोकशाहीची भाषा बोलू लागतात. हा विरोधाभास बांगलादेशमध्येही स्पष्ट दिसतो. भारतासाठीही ही परिस्थिती तितकीच महत्त्वाची आहे. भारत आणि बांगलादेश यांच्यातील संबंध गेल्या दशकात एका नव्या उंचीवर पोहोचले. सीमावादाचा तोडगा, ईशान्य भारतासाठी संपर्कमार्ग, दहशतवादविरोधी सहकार्य, ऊर्जा देवाणघेवाण आणि व्यापारवाढ यामुळे दोन्ही देशांमध्ये विश्वासाचे नवे पर्व सुरू झाले. या प्रक्रियेत हसीना यांची भूमिका महत्त्वाची होती. त्यामुळे त्यांचे राजकीय भवितव्य भारतासाठीही धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे आहे; मात्र भारताने आजवर संयमाची भूमिका घेतली आहे. कारण शेजारी देशांच्या अंतर्गत राजकारणात प्रत्यक्ष हस्तक्षेप केल्यास त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. या संपूर्ण घटनाक्रमात सर्वाधिक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे न्याय आणि सूड यांतील सीमारेषा. एखाद्या नेत्यावर गंभीर आरोप असतील, तर त्यांची निष्पक्ष चौकशी झालीच पाहिजे; पण न्यायव्यवस्था राजकीय सूडाचे साधन बनली, तर लोकशाहीवरील विश्वास डळमळतो. आज हसीना यांच्या समर्थकांचा दावा आहे, की त्यांच्यावरील अनेक खटले हे राजकीय हेतूने प्रेरित आहेत. विरोधक मात्र त्यांना कायद्यापुढे उत्तरदायी ठरवण्याची मागणी करतात. सत्य नेमके कुठे आहे, हे न्यायसंस्थेलाच ठरवावे लागेल. राजकारणातील पुनरागमनाच्या कथा लोकांना अनेकदा आकर्षित करतात. कारण त्या आशेच्या कथा असतात. पराभवानंतर पुन्हा उभे राहण्याच्या कथा असतात; पण प्रत्येक पुनरागमन यशस्वीच होईल, याची शाश्वती नसते.

पाकिस्तानमध्ये नवाज शरीफ परतले; पण राजकीय समीकरणे बदलली होती. इम्रान खान आज तुरुंगात असूनही जनमताचा केंद्रबिंदू आहेत. श्रीलंकेत राजपक्षे घराण्याची ताकद कमी झाली. नेपाळमध्ये नेतृत्व वारंवार बदलते. दक्षिण आशियातील लोकशाही अजूनही व्यक्तींच्या प्रभावातून पूर्णपणे मुक्त झालेली नाही. हसीना यांच्या बाबतीतही हेच सत्य आहे. त्या परततील. त्यांना कदाचित अटकही होईल, न्यायालयीन लढाईही सुरू राहील; पण त्यांच्या एका घोषणेमुळे एवढे स्पष्ट झाले आहे, की त्या अजूनही बांगलादेशच्या राजकारणातील सर्वात प्रभावशाली व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. त्यांच्या अनुपस्थितीतही राजकारण त्यांच्याभोवती फिरते, हेच त्यांच्या राजकीय वजनाचे प्रतीक आहे; परंतु अखेरीस प्रश्न एका व्यक्तीचा नाही, तर एका राष्ट्राच्या राजकीय परिपक्वतेचा आहे. लोकशाहीची खरी ताकद सत्तांतरात नसते, तर सत्तांतरानंतरही संवाद टिकवून ठेवण्यात असते. विरोधकांना संपवणे सोपे असते. त्यांच्याशी स्पर्धा करत लोकशाही मजबूत करणे कठीण असते. बांगलादेश आज या दोन मार्गांच्या फाट्यावर उभा आहे. हसीना यांच्या पुनरागमनाची घोषणा म्हणूनच एका व्यक्तीच्या इच्छेपेक्षा अधिक मोठी आहे. ती इतिहासाशी संवाद साधणारी घोषणा आहे. ती सत्तेच्या क्षणभंगुरतेची आठवण करून देणारी आहे. ती दक्षिण आशियातील लोकशाहीला स्वतःकडे पुन्हा पाहण्यास भाग पाडणारी आहे. उद्या त्या बांगलादेशमध्ये परततील किंवा नाहीत, हा प्रश्न काळ उत्तर देईल; पण त्यांच्या या घोषणेने एक गोष्ट निश्चित केली आहे, ती म्हणजे इतिहासाने अजून त्यांच्यावर पूर्णविराम दिलेला नाही. त्याने फक्त आणखी एक स्वल्पविराम टाकला आहे.

राजकारणात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, ज्यांची उपस्थितीच संपूर्ण राजकीय समीकरणे बदलून टाकते. हसीना या अशाच नेत्यांपैकी एक आहेत. सत्तेवरून हकालपट्टी, शेकडो गुन्हे, मृत्युदंडाची शिक्षा, भारतातील वास्तव्यासारख्या अभूतपूर्व घटनांनंतर आता 'याच वर्षी मी बांगलादेशात परतणार' या त्यांच्या घोषणेने ढाका आणि नवी दिल्ली या दोन्ही राजधान्यांमध्ये राजकीय चर्चांना वेग आला आहे. ही केवळ एका माजी पंतप्रधानाच्या पुनरागमनाची घोषणा नाही, तर बांगलादेशच्या भविष्यातील राजकारण, लोकशाही, भारत-बांगलादेश संबंध आणि दक्षिण आशियातील सामरिक समीकरणांवर परिणाम करू शकणारी घटना आहे.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

---

चर्चा आजची

# निसर्ग वाचविण्याची चळवळ उभारायला हवी

सुयोग आंग्रे

पावसाळा हा केवळ हवामानातील बदल नसून या पृथ्वीवर नवनिर्मितीचे आणि समृद्धीचे प्रत्यक्ष आगमन आहे. भारतीय संस्कृतीत आणि तत्त्वज्ञानात निसर्गाला मानवापासून वेगळे म्हणून कधीच पाहिले गेले नाही, उलट तो एक कुटुंब म्हणून स्वीकारला गेला आहे, परंतु आज पर्यावरणीय संकट, ग्लोबल वॉर्मिंग आणि जलसंकट यासारखी आव्हाने आपल्या दारात उभी आहेत. या आव्हानांचा सामना करण्यासाठी आपल्याला आपल्या दैनंदिन जीवनात काही मूलभूत सुधारणा कराव्या लागतील. समाजाने आपल्या जीवनशैलीचा आणि कार्यशैलीचा भाग म्हणून काही विशेष विनंत्या आणि संकल्प केले तर आपण खूप मोठा बदल घडवून आणू शकतो. सध्या 'एक पेड माँ के नाम' मोहिमेने देशभरात चळवळीचे रूप धारण केले आहे. या मोहिमेंतर्गत समाजातील प्रत्येक कुटुंबाने किमान एक रोप लावण्याची जबाबदारी स्वीकारून त्याचे संवर्धन, पोषण व संरक्षणाचा पवित्र संकल्पही घ्यावा. जंगलतोड आणि जंगलासारखे कॉँक्रीट तयार केल्यामुळे तापमानातही प्रचंड वाढ होत आहे. या विकासाच्या नावाखाली सुरु असलेला पर्यावरणाचा ऱ्हास थांबवला नाही तर पृथ्वी वरील निसर्गाला पण मुकणार आहोत हेमात्र निश्चित. दरवर्षी निसर्गाच्या सानिध्यात जाण्यासाठी शासनचप्रयत्न असतो. आजवर कोटींच्या संख्येत महाराष्ट्रात शासकीय यंत्रणाऐनाच्यामाध्यमातून झाडे लावण्यात आली आहेत. या लावलेल्या झाडांपैकी झाडे जंगली किती याचे ऑडिट करण्याचे धाडस कोण करणार. एक गोष्ट अभिमानानानेसांगावीवाटते. ती म्हणजे या वृक्षारोपणाच्या चळवळीत महाराष्ट्रातील अनेक अध्यात्मिक संप्रदायांनी आपला हातभार लावला. यामध्ये डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या श्री सदस्यांनी उभारलेली वृक्षारोपणाची नव्हे तर वृक्ष संवर्धनाची चळवळ वाखाणण्यायोगीठरली आहे. यात देखील विकास आडवा आला. रस्त्याच्या दुतर्फा वाढवलेलीझालेली देणारीझाडे रस्त्याच्या नूतनीकरणात कत्तल करण्याचे धाडस या शासनानेच केले. त्यांना प्रश्न कोण विचारणार किंइतकीचझाडे लावून ती जगवण्याची हिंमत दाखवावी. रस्त्यांच्या रुंदीकरणात झाडांची कत्तल केली जाते. पण झाड लावून ती जगवण्याचे धाडस कोणी करताना दिसत नाही. झाडांसोबतच जीवनाचा दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे पाणी. पाण्याशिवाय या सृष्टीचा वेग थांबेल, म्हणूनच 'पाणी असेल तर उद्या आहे' अशी भावना आपल्या समाजात नेहमीच रुजली आहे, परंतु आधुनिक सुखसोयी आणि बेफिकीरपणामुळे आपण आपल्या जलस्रोतांकडे घोर दुर्लक्ष केले आहे. आज आपले पारंपारिक तलाव कोरडे पडले आहेत, विहिरी कचऱ्याने भरल्या आहेत आणि नद्यांची पाणी पातळी कमी होत आहे. भूगर्भातील पाण्याच्या अवाजवी शोषणामुळे जलसंकट अधिक गडद होत आहे. हा गंभीर प्रश्न केवळ सरकारी धोरणांनी सुटू शकत नाही; व्यापक लोकसहभागाची नितांत गरज आहे. आपण पुढे येऊन आपले तलाव, तलाव, अमृत तलाव, प्राचीन विहिरी आणि इतर सर्व पारंपारिक जलस्रोतांच्या संवर्धन आणि स्वच्छतेकडे लक्ष दिले पाहिजे. यासोबतच पावसाळ्यात आकाशातून पडणारे आणि वाया जाणारे अमर्याद पाणी वाचवणे हे आपले कर्तव्य असले पाहिजे. घरे, शाळा, ग्रामपंचायती आणि विविध व्यावसायिक व सामाजिक संस्थांमध्ये पावसाचे पाणी साठवण्याची यंत्रणा उभी करून ती व्यापक मोहीम राबवायची आहे. पावसाचे पाणी वाचवून ते थेट जमिनीत गेल्यावर भूजल पातळी पुन्हा वाढेल आणि भावी पिढ्यांना जलसंकटाला सामोरे जावे लागणार नाही. गेल्या काही दशकांमध्ये रासायनिक खते, युरिया आणि कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे आपल्या सुपीक जमिनीचे आरोग्य बिघडले आहे. जमिनीतील नैसर्गिक चैतन्य नष्ट होत असून दूषित अन्न खाल्ल्याने आपण विविध गंभीर आजारांना बळी पडत आहोत. सेंद्रिय आणि नैसर्गिक शेतीला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन द्यायचे आहे. सेंद्रिय शेती म्हणजे निसर्ग नियमानुसार शेती करणे. जेव्हा शेतकरी या पारंपरिक आणि वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करतात तेव्हा आपल्या जमिनीचे आरोग्य तर सुधारेलच पण धान्यही शुद्ध आणि पौष्टिक होईल. हा बदल आपल्या कुटुंबांना, आपल्या समाजाला आणि संपूर्ण देशाला निरोगी जीवन देईल आणि आपली कृषी व्यवस्था अधिक समृद्ध, शाश्वत आणि नवीन शक्ती देईल. पावसाळा हा आनंद आणि नवीन जीवन घेऊन येतो, तर आरोग्य आणि स्वच्छतेशी संबंधित अनेक मोठी आव्हानेही घेऊन येतो. या दिवसांमध्ये थोडीशी निष्काळजीपणा देखील जलजन्य आणि संसर्गजन्य रोगांना जन्म देते. त्यामुळे, आपण एकेरी वापराचे प्लास्टिक वापरणे पूर्णपणे बंद केले पाहिजे आणि पाण्याचा प्रवाह सुरळीतपणे चालू राहण्यासाठी नाल्यांची नियमित स्वच्छता सुनिश्चित केली पाहिजे. विजेच्या धक्क्याने शेकडो निष्पाप लोक आणि मोकाट जनावरांचा अकाली मृत्यू होतो. वीज पडण्याच्या घटनांचा अंदाज बांधता येत नाही, मात्र जनजागृतीअभावी लोक अपघाताला बळी पडतात. तसेच अतिवृष्टी किंवा अतिवृष्टीमुळे नद्या, कालवे, धरणे आणि इतर स्थानिक जलाशयांच्या पाण्याची पातळी अचानक खूप वेगाने वाढते. या सर्व नैसर्गिक आव्हानांना आणि आपत्तींना प्रभावीपणे तोंड देण्यासाठी सरकार आणि प्रशासनाने भूस्तरावर व्यापक आणि ठोस तयारी केली असली, तरी त्या समाजातील प्रत्येक नागरिक जोपर्यंत स्वत: सजग, सतर्क आणि शिस्तबद्ध होत नाही तोपर्यंत कोणतीही प्रशासकीय यंत्रणा पूर्णपणे प्रभावी ठरू शकत नाही, हे आपण नेहमी लक्षात ठेवले पाहिजे. जेव्हा आपण आपली पृथ्वी केवळ उपभोगाची वस्तू मानतो तेव्हा निसर्गाचा समतोल पूर्णपणे ढासळतो. अवकाळी पाऊस, अतिदुष्काळ, भयंकर पूर आणि असह्य उष्णतेच्या लाटा आज आपण जगभर पाहत आहोत, हे निसर्गाचा समतोल पुनर्संचयित करण्याचा एक असाध्य प्रयत्न आहे. आपल्या भावी पिढ्यांना सुरक्षित, सुंदर आणि राहण्यायोग्य पृथ्वी हवी असेल तर आपण आपल्या सवयी आणि विचार बदलले पाहिजेत. स्वतः बदललात तरच जगाला बदलण्याची संधी आपल्याला मिळू शकते. खरेतर आज शहाणे होऊन वृक्षलागवड आणि संवर्धनाची गरज निर्माण झाली आहे. नुसते वाढदिवसानिमित्त फोटो काढून मिरवण्याचा भूमिकेत न राहता लोकप्रतिनिधींनी देखील निसर्ग वाचविण्यासाठीचीचळवळ उभी करून पृथ्वी वाचविण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

---

लोकसंसद

## लोणावळ्याच्या चिक्कीला आणि रेणुका तांबुलला जीआय टॅग !

केंद्र सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाअंतर्गत येणाऱ्या चेन्नई येथील उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागातर्फे देशभरातील उत्पादनांना भौगोलिक मानांकन दिला जातो. दोन दशकांपूर्वी देशातील पहिला जीआय टॅग सुप्रसिद्ध दार्जिलिंग चहाला देण्यात आल्यानंतर आतापर्यंत देशातील ८२२ विविध उत्पादनांना जीआय टॅग देण्यात आला आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ५४ उत्पादनांचा समावेश असून नुकतेच लोणावळ्याची जगप्रसिद्ध 'लोणावळा चिक्की' आणि माहूरच्या रेणुका मातेच्या गडावरील पारंपारिक 'रेणुका तांबुल' (विडा) यांना अधिकृत भौगोलिक मानांकन मिळाले आहे. गेली अनेक दशके लोणावळ्याची चिक्की हा पर्यटकांच्या आकर्षणाचा एक भाग झाला आहे. तर महाराष्ट्राच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी माहूर येथील श्री रेणुका मातेचा तांबूल हा एक अत्यंत प्रसिद्ध धार्मिक आणि पारंपारिक प्रसाद मानला जातो. पुरणपोळीच्या मुख्य नैवेद्यानंतर देवीला हा तांबूल अर्पण केला जातो. बऱ्याचवेळा बाजारात मूळ उत्पादनांच्या नावाखाली बनावट वस्तू विकून ग्राहकांची फसवणूक केली जाते आणि स्थानिक उत्पादकांच्या हक्कांवर गदा येते. परंतु या जीआय टॅगमुळे आता या दोन्ही उत्पादनांना कायदेशीर संरक्षण लाभले आहे. महाराष्ट्रातील कोकणातील हापूस आंबा, नागपूरची संत्री, नाशिकची द्राक्षे, महाबळेश्वरची स्ट्रॉबेरी, लासलगावचा कांदा, भिवापूरची मिरची, तसेच कोल्हापुरी चप्पल, पैठणी साडी, पुणेरी पगडी, सोलापुरी चादर अशा अनेक उत्पादनांत आता 'लोणावळा चिक्की' आणि 'रेणुका तांबुल'ची भर पडल्याने स्थानिक उत्पादकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

---

दिनविशेष

# डॉ. मंगला नारळीकर : मंगलमय व्यक्तिमत्त्व!

ज्येष्ठ गणितज्ञ डॉ. मंगला नारळीकर यांचा १७ जुलै हा तिसरा स्मृतिदिन. दोन वर्षापूर्वी कॅन्सरशी झुंज देत वयाच्या ऐंशीव्या वर्षी त्यांचे पुण्यात निधन झाले होते. त्यांचे नाव ऐकताच प्रसिद्ध खगोलभौतिकशास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक जयंत नारळीकर यांचे नाव डोळ्यासमोर येते. मंगला या त्यांच्या पत्नी होत. तथापि, डॉ. मंगला यांचीही वेगळी ओळख होती. गणिताच्या क्षेत्रातील त्यांचे योगदान मोठे आहे. मंगला नारळीकर या स्वतः खूप उच्च दर्जाच्या गणितज्ञ होत्या हे फार कमी लोकांना माहीत असेल. पारंपारिक भारतीय कुटुंबात जन्मलेल्या मंगला यांनी शाळेत असताना दोन प्रतिष्ठित शिष्यवृत्ती मिळविल्या होत्या. त्या आपला मोकळा वेळ वाचन आणि चित्रकला यात घालवत असत. पूर्वाश्रमातील मंगला राजवाडे यांचा जन्म १७ मे १९४३ रोजी झाला. १९६२ मध्ये त्यांनी मुंबई विद्यापीठातून बी.ए.ची पदवी मिळवली. त्यानंतर १९६४ मध्ये त्यांनी एम. ए. (गणित) केले. त्यावेळी त्या या परीक्षेत विद्यापीठातून पहिल्या आल्या होत्या. तत्कालीन कुलपतींकडून त्यांना सुवर्णपदकही मिळाले होते. १९६४ ते १९६६ पर्यंत, त्यांनी प्रथम सहाय्यक संशोधक म्हणून आणि नंतर स्कूल ऑफ मॅथेमॅटिक्स, इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, मुंबई येथे सहयोगी संशोधक म्हणून काम केले. १९६७ ते १९६९ पर्यंत त्यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या पदवीधर शाळेत गणित शिकवले. १९६५ मध्ये मंगला राजवाडे यांनी गणितज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांच्याशी लग्न केले. संस्कृत पंडित सुमती नारळीकर या त्यांच्या सासू होत्या, तर बनारस हिंदू विद्यापीठातील गणिताचे माजी प्राध्यापक विष्णू वामन नारळीकर हे मंगलाबाईंचे सासरे होते. त्यांचे पति जयंत नारळीकर संशोधनासंदर्भात जगभर फिरत असत. मंगला त्यांच्यासोबत असायच्या. अशीच एक भेट केंब्रिजला होती. येथे ते सहा वर्षे राहिले. इथेच त्यांना दोन मुली झाल्या. दोघेही परतले तेव्हा मंगला २९ वर्षांच्या होत्या. केंब्रिजमध्ये केल्याप्रमाणे घरगुती जीवनात स्वतःला पूर्णपणे बुडवून घेण्याचा पर्याय त्यांच्याकडे होता, परंतु असे करण्याऐवजी त्यांनी गणितात पीएच.डी करण्याचा निर्णय घेतला. त्याचवेळी जयंतरावांचे वृद्ध आई-वडीलही त्यांच्यासोबत राहण्यास आले.मंगला यांचा दिवस पहाटे चार वाजता सुरू व्हायचा आणि मध्यरात्रीपर्यंत चालायचा. त्यांचा एक नित्यक्रम झाला होता, ज्यामध्ये मुलांना शाळेसाठी तयार करणे, सासू-सासऱ्यांची काळजी घेणे, स्वयंपाक करणे आणि बॉम्बे युनिव्हर्सिटीमध्ये अर्धवेळ शिकवणे तसेच त्यांचे पीएच.डी. चे संशोधन यांचा समावेश होता. त्यांना पीएच.डी.ची पदवी मिळेपर्यंत त्या गीता, गिरिजा आणि लीलावती या तीन मुलींची आई झाल्या होत्या. या तिन्ही मुली विज्ञान क्षेत्रात काम करत आहेत, हे नमूद करणे महत्त्वाचे आहे. मंगलाताई मुळे जयंत नारळीकर यांना घर, संसार अशा गोष्टींची चिंता करावी लागली नाही आणि ते खूप काम करू शकले. त्यांना देशाचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान पद्मविभूषणही देण्यात आला. मंगला नारळीकर यांना, त्यांच्या वाट्याला किती श्रेय मिळाले ते यावरून समजू शकते की तुम्ही आणि आम्ही ९० टक्के त्यांचे नावही ऐकले नसेल. ङमला माहित होते की गणित हा पुरुषप्रधान विषय आहे, पण मुली गणितात कमकुवत असतात हा लोकप्रिय समज मी स्वीकारू शकत नाही. मुलींच्या गणिताच्या ज्ञानाबद्दल केलेले विनोद मला समजले नाहीत कारण मी माझ्या विद्यापीठाच्या अंतिम परीक्षांसह माझ्या सर्व परीक्षांमध्ये अव्वल आले आहे.फ एका मुलाखतीत हे सांगणाऱ्या मंगला त्यांच्या असाधारण आयुष्याबाबत अतिशय नम्र होत्या. एके ठिकाणी त्यांनी लिहिले आहे, माझी कथा कदाचित माझ्या पिढीतील अनेक स्त्रियांच्या जीवनाची प्रातिनिधिक आहे ज्या उच्च शिक्षित आहेत परंतु ज्यांनी त्यांच्या वैयक्तिक करिअरवर घरगुती जबाबदाऱ्या टाकल्या आहेत. अशा या मंगलमय व्यक्तिमत्वाला विनम्र आदरांजली !

**– विजय कोष्टी, सांगली**

# रामदास बोटीचा अखेरचा प्रवास...



श्रीरंग घरत

महाराष्ट्राच्या आणि देशाच्या जलवाहतुकीच्या इतिहासातील सर्वात भीषण दुर्घटनांपैकी एक म्हणून नोंद झालेल्या रामदास बोट दुर्घटनेला १७ जुलै २०२६ रोजी ७९ वर्षे पूर्ण होत आहेत.

या दुर्घटनेत मानी-भुते, अलिबाग येथील पांडुरंग पोसु घरत म्हणजेच माझे वडील यांचेही निधन झाले होते, ही ज्वलंत घटना आहे.

ही दुर्घटना केवळ एक अपघात नव्हती, तर अलिबाग, मुरूड, म्हसळा, रोहा, श्रीवर्धन, महाड, माणगाव, पोलादपूर, दापोली, वेंगुर्ला, रत्नागिरी, परळगाव, लालबाग, गिरणगाव पट्टा आणि गिरगाव येथील हजारो कुटुंबांच्या आयुष्यात दुःखाचा डोंगर कोसळवणारी घटना होती.

रेवस धक्क्यापासून अवघ्या चार किलोमीटर अंतरावर काशाच्या खडकावर आदळून रामदास बोट समुद्रात बुडाली. त्या काळी अलिबाग हे छोटे शहर होते. दोन बाजूंना समुद्र, तिसऱ्या बाजूला रेवदंडा-साळावची खाडी आणि चौथ्या बाजूला धरमतरची खाडी असल्याने वाहतुकीसाठी होडी किंवा तर यांचाच आधार होता. मुंबईला जाण्यासाठी प्रथम बस, नंतर होडी किंवा तर आणि पुन्हा बस अथवा रेल्वे असा प्रदीर्घ प्रवास करावा लागत असे. अलिबागपासून सुमारे १५ मैलांवरील रेवस बंदरातून मुंबईसाठी नियमित जलवाहतूक सुरू होती. त्यामुळे रामदास बोट ही कोकणवासीयांसाठी जीवनवाहिनीच ठरली होती. १७ जुलै १९४७ हा गटारी अमावास्येचा दिवस होता. सकाळपासूनच भाऊच्या धक्क्यावर प्रवाशांची मोठी गर्दी झाली होती. प्रत्येकाला दुपारचे जेवण आपल्या कुटुंबासोबत करण्याची घाई होती. सकाळी सुमारे आठच्या सुमारास ७४३ प्रवाशांना घेऊन रामदास बोट मुंबईहून-धरमतरमार्गे रेवसकडे निघाली.

माझे वडील पांडुरंग पोसू घरत हे तोंडलीचे व्यापारी होते. त्यांना त्या दिवशीच आपल्या आयुष्याचा शेवटचा श्वास घ्यावा लागेल, याची कल्पनाही नव्हती. त्या दुर्घटनेनंतर आमचे संपूर्ण कुटुंब उद्‌ध्वस्त झाले. त्यावेळी आजी ५५ वर्षांच्या, आई ३० वर्षांच्या, आत्या १३ वर्षांच्या, बहीण ६ वर्षांची आणि मी अवघा ४ वर्षांचा होतो. आमच्या कुटुंबाचा कर्ता पुरुष निघून गेल्यानंतर संघर्षाशिवाय दुसरे काहीच उरले नाही.

१७ जुलै १९४७ रोजी सकाळी सुमारे आठ वाजता रामदास बोट नेहमीप्रमाणे मुंबई बंदरातून धरमतरमार्गे रेवसच्या बंदराकडे निघाली. पावसाळ्याचे दिवस असल्याने समुद्र खवळलेला होता. धक्क्यावर तिसऱ्या क्रमांकाचा वादळाचा इशारा देणारा ध्वज फडकत होता. मात्र अशा परिस्थितीतही यापूर्वी अनेकवेळा प्रवास झाल्यामुळे प्रवाशांच्या मनात फारशी भीती नव्हती.

बोट बंदरापासून काही अंतरावर गेल्यानंतर सोसाट्याचा वारा, मुसळधार पाऊस आणि प्रचंड उंच लाटा यामुळे बोट जोराने हेलकावे खाऊ लागली. काही क्षणांतच समुद्रात चहुबाजूंनी फेसाळलेल्या लाटांमुळे किनारा दिसेनासा झाला. वादळाचा वेग वाढत असतानाच बोटीच्या एका भागात पाणी शिरू लागले. प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. त्या काळी बोटीवर बिनतारी संदेश व्यवस्था नसल्यामुळे मुंबईशी संपर्क साधणेही शक्य नव्हते. दरम्यान, भरधाव वेगाने जात असलेली बोट काशाच्या खडकाजवळ पोहोचली. मुसळधार पाऊस आणि दाट धुक्यामुळे कप्तानाला खडकाचा अंदाज आला नाही. क्षणार्धात बोट खडकावर आदळली. त्याचवेळी आलेल्या प्रचंड लाटेने बोटीचा तोल गेला. कप्तान शेख सुलेमान आणि मुख्य अधिकारी आदमभाई यांनी प्रवाशांना शांत राहण्याचे, एका बाजूला गर्दी न करण्याचे आवाहन केले. काही क्षणांतच दुसरी प्रचंड लाट आली आणि रामदास बोट समुद्राच्या तळाशी कायमची विलीन झाली. अनेक प्रवासी बोटीसह समुद्रात बुडाले. काहींनी पोहत जीव वाचविण्याचा प्रयत्न केला; मात्र प्रचंड लाटा आणि समुद्राचा वेग यामुळे त्यांनाही फार काळ तग धरता आला नाही.

दरम्यान, रेवस येथील काही कोळी बांधव मासेमारीसाठी मुंबईकडे निघाले होते. त्यांनी समुद्रावरील बदललेले वातावरण पाहून आपल्या होड्या परत फिरवल्या. थोड्याच वेळात त्यांना समुद्रात तरंगणारे प्रवासी आणि मृतदेह दिसू लागले. क्षणाचाही विलंब न करता त्यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता बचावकार्य सुरू केले. त्यांनी शक्य तितक्या जास्त प्रवाशांना वाचविण्याचा प्रयत्न केला. काही कोळी तर थेट समुद्रात उड्या मारून बुडणाऱ्या प्रवाशांना होड्यांमध्ये चढवत होते. या धाडसी कोळी बांधवांनी सुमारे ७५ प्रवाशांचे प्राण वाचवून त्यांना सुरक्षितपणे रेवस बंदरात आणले. रामदास बोट बुडाल्याची बातमी वाऱ्यासारखी मुंबई आणि कोकणभर पसरली. भाऊच्या धक्क्यावर आणि रेवस बंदरात प्रवाशांच्या नातेवाईकांनी एकच गर्दी केली. आपल्या आप्तस्वकीयांचा शोध घेण्यासाठी प्रत्येकाची धडपड सुरू होती. या दुर्घटनेत ७४३ प्रवाशांपैकी केवळ १६९ जण बचावले, तर शेकडो प्रवाशांना जलसमाधी मिळाली. बोटीवरील कप्तान शेख सुलेमान, मुख्य अधिकारी आदमभाई आणि इतर अनेक कर्मचारीही या दुर्घटनेचे साक्षीदार ठरले. रेवस आणि परिसरातील कोळी बांधवांनी जीवाची पर्वा न करता बचावकार्य केले. रामजी नावाच्या कोळी बांधवांसह त्यांच्या सहकाऱ्यांनी अनेक प्रवाशांचे प्राण वाचवले. मानवी सेवेचे हे उदाहरण आजही कोकणाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदले गेले आहे.

दुर्घटनेनंतर अनेक दिवस समुद्रकिनाऱ्यावर मृतदेह वाहून येत होते. आपल्या नातेवाईकांचे मृतदेह ओळखण्यासाठी लोकांची मोठी गर्दी होत होती. काही मृतदेह ओळख न पटल्याने त्यांच्यावर सामूहिक अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी अलिबागचे माजी नगराध्यक्ष आणि समाजसेवक कै. वि.ना. टिळू यांनी पुढाकार घेत स्वयंसेवकांची फळी उभी केली. त्यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी समुद्रकिनाऱ्यावर सापडलेल्या शेकडो मृतदेहांवर अत्यंत धैर्याने आणि मानवतेच्या भावनेने अंत्यसंस्कार केले. दुर्गंधी, संसर्ग आणि भीषण परिस्थितीची पर्वा न करता त्यांनी केलेली सेवा आजही स्मरणात आहे.

दुर्दैवाने, या दुर्घटनेची शासन आणि संबंधित जहाज कंपनीकडून अपेक्षित गांभीर्याने दखल घेतली नाही. त्यावेळी देश स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर होता. १५ ऑगस्ट १९४७ च्या ऐतिहासिक घडामोडींमध्ये या दुर्घटनेची वेदना मागे पडली.

सन १९३६ मध्ये बांधण्यात आलेली आणि सुमारे ४०६ टन वजनाची रामदास बोट दुसऱ्या महायुद्धाच्या काळातही वापरण्यात आली होती. १७ जुलै १९४७ रोजी रेवसजवळ काशाच्या खडकावर आदळून तिचा अंत झाला. आज या घटनेला अनेक दशके लोटली असली तरी कोकणातील हजारो कुटुंबांच्या स्मरणातून हा काळाकुट्ट दिवस कधीही पुसला जाणार नाही. ज्यांनी आपले वडील, भाऊ, पती, मुलगा किंवा कुटुंबातील आधारस्तंभ गमावला, त्यांच्या जखमा आजही ताज्याच आहेत.

रामदास बोट दुर्घटनेत जलसमाधी लाभलेल्या सर्व प्रवाशांना विनम्र भावपूर्ण श्रद्धांजली.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१७ जुलै

१) श्रीम. सुरेखा अनंत पेढवी आगरसुरे, झिराड १७-७-१९४४
२) श्रीम. सुनंदा मधुकर तळकर अलिबाग, १७-७-१९५२
३) श्रीम. रेखा रमेश शिंपी अलिबाग, १७-७-१९५५
४) श्रीम. अपर्णा अरविंद कोहीरकर अलिबाग, १७-७-१९५४
५) श्री. श्रीकांत नाथोबा नाईक बामणगाव, १७-७-१९६४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते



कै. श्री. मनोरंजन शिवराम माने, स्मरणार्थ, अलिबाग

## स्वयंसहाय्यता संस्थेची सामाजिक बांधिलकी

**उरण :** श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहाय्यता संस्था, उरण यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत अंगणवाडीतील विद्यार्थ्यांसाठी तसेच किशोरवयीन मुलींसाठी आरोग्य व शिक्षणविषयक उपक्रम राबविण्यात आले. अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य म्हणून पाट्या, दप्तर, पेन्सिल तसेच चॉकलेटचे मोफत वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे लहान विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल उत्साह निर्माण झाला. त्यानंतर तू.ह. वाजेकर फुंडे हायस्कूल येथे किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी स्वच्छता व आरोग्य जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात किशोरवयीन मुलींना स्वच्छता, योग्य सवयी, पोषण आणि आरोग्याचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विद्यार्थिनींना कॉटन सॅनेटरी नॅपकिनचे मोफत वाटप करण्यात आले. संस्थेच्या अध्यक्षा संगीता सचिन ढेरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. यावेळी संस्थेच्या सचिव कविता राकेश म्हात्रे, खजिनदार शमायला साबीर सोंडे तसेच अभया म्हात्रे, मीना रावल आणि मीनाक्षी कोळी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. महिलांचे आरोग्य, किशोरवयीन मुलींमध्ये मासिक पाळीबाबत जागरूकता निर्माण करणे तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

## विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी



**। कर्जत । प्रतिनिधी ।**

‘लक्ष्मी नेत्रपेढी’ पनवेल व कर्जतचे सामाजिक कार्यकर्ते विजय हरिश्चंद्रे यांच्या संकल्पनेनुसार, कर्जत महिला मंडळ विद्या विकास मंदिरमधील विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापिका स्नेहा गाढे, श्रद्धा मुंढेकर, अर्चना भुसाळ, सुप्रिया भासे, सुमिता अहिरराव, सारिका साठे व पुजा खरात तसेच लक्ष्मी नेत्र पिढीचे डॉ. अक्षता गायकवाड, शितल गवळे, अपेक्षा दिसले व मैथिली मराठे उपस्थित होते. यावेळी विजय हरिश्चंद्रे यांनी मोबाईल फोनच्या अति वापरामुळे मुलांच्या दृष्टीमध्ये होणारे दुष्परिणाम विशद करत मुलांनी मोबाईलपासून दूर राहण्याचे सांगितले. ही नेत्र तपासणी कार्यक्रम आयोजित करण्यासाठी लक्ष्मी नेत्र पेढी पनवेलचे विनोद पाचघरे तसेच शाळेच्या कार्याध्यक्ष मीना प्रभावळकर यांचे बहुमोल सहकार्य लाभले. या नेत्र तपासणी कार्यक्रमात एकूण चारशे मुलांची नेत्र तपासणी करण्यात आली.

## नाटकातून कृषीविषयक जागरूकता

### रत्नागिरीमधील भाटघर येथे कृषी कन्यांकडून स्तुत्य उपक्रम

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली अंतर्गत ग्रामीण जागृती कार्यानुभव कार्यक्रमातील कृषी कन्या गटाने महाराष्ट्र कृषी दिनानिमित्त भाटघर येथे विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन केले होते. त्यामध्ये नाटकाचे सादरीकरण करण्यात आले. माजी मुख्यमंत्री व हरितक्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांना अभिवादन करत कृषीविषयक जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.



कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले कृषीकन्या गटाने सादर केलेले निर्णय हे एकांकिकेचे सादरीकरण. या नाटकातून तरुण पिढीचे शेतीपासून वाढते दुरावलेपण, बनावट बियाणे, कीटकनाशके व खतांमुळे शेतकऱ्यांची होणारी फसवणूक यावर नाटकाद्वारे प्रकाश टाकण्यात आला. शेती सोडू नका व जमीन विकू नये, स्वतःच्या जमिनीशी नाळ जोडून ठेवा, असा प्रभावी संदेश नाटकातून देण्यात आला. या उपक्रमातून कृषी दिन साजरा करण्याबरोबरच गावकऱ्यांमध्ये शेतीविषयी जागरूकता निर्माण होऊन कृषी संस्कृती जपण्याचा संदेश पोहोचवण्याचा प्रयत्न केला. सुतारवाडी जिल्हा परिषद शाळेतून पारंपरिक दिंडीने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. झाडे लावा व पर्यावरण संवर्धनाचे संदेश देणारे फलक हातात घेऊन विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी केली. यावेळी अंगणवाडीत लहान मुलांशी संवाद साधून शेती व वृक्षांचे महत्त्व पटवून देण्यात आले. सायंकाळी भाटघर गावात जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## प्रगतशील शेतकऱ्यांचा गौरव सोहळा



**। वेणगाव । प्रतिनिधी ।**

रायगड प्रेस क्लबच्या वतीने आणि संलग्न कर्जत प्रेस क्लबच्या माध्यमातून आदर्श शेतकरी पुरस्कार २०२६ वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. हा सोहळा बुधवारी (दि.१५) कर्जत तालुक्यातील दुर्गम मार्गाचीवाडी येथे उत्साहात पार पडला.

यावेळी पाथरज मार्गाचीवाडी येथील प्रगतशील शेतकरी नरदास दामा पारधी तसेच नांदगाव-चाफेवाडी येथील प्रगतशील शेतकरी जगन लक्ष्मण पादिर यांना आदर्श शेतकरी पुरस्कार-२०२६ प्रदान करण्यात आला. शेतीमध्ये नाविन्यपूर्ण प्रयोग राबवत पारंपरिक शेतीला पूरक व्यवसायाची यशस्वी जोड देत प्रगतशील शेतकरी म्हणून वेगळी ओळख निर्माण केल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या वर्षा दोरे-शेळके, पंचायत समिती सदस्या कविता पादिर, आदिवासी समाजाचे अध्यक्ष परशुराम दरवडा, कृषी विस्तार अधिकारी विलास कांबळे, सहाय्यक कृषी अधिकारी गुणवंत पाटील, ज्येष्ठ पत्रकार विजय मांडे, रायगड प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष संजय मोहिते, सचिव दर्वेश पालकर, विभागीय सचिव ॲड. राहुल देशमुख तसेच कर्जत प्रेस क्लबचे अध्यक्ष गणेश पवार उपस्थित होते.

आदिवासी समाजाचे अध्यक्ष परशुराम दरवडा यांनी रायगड प्रेस क्लब व कर्जत प्रेस क्लबच्या या उपक्रमाचे कौतुक करत पत्रकार हा समाजाचा आरसा दाखवणारा लोकशाहीचा चौथा स्तंभ असल्याचे सांगितले. ज्येष्ठ पत्रकार विजय मांडे आणि ॲड. राहुल देशमुख यांनी समाजहितासाठी असे उपक्रम आवश्यक असल्याचे मत मांडले.

कार्यक्रमाच्या शेवटी कृषी विस्तार अधिकारी विलास कांबळे आणि सहाय्यक कृषी अधिकारी गुणवंत पाटील यांनी शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कृषी योजनांची सविस्तर माहिती दिली. पीकविमा, सिंचन, यांत्रिकीकरण, विविध अनुदान योजना तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती अधिक समृद्ध करण्याचे आवाहन त्यांनी केले.

## करिअर संसद शपथविधी सोहळा

**। तळा । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र शासनाच्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथे करिअर संसद शपथविधी सोहळा पार पडला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्रा.डॉ. सचिन बंगाळे यांनी केले. त्यांनी करिअर कट्टा उपक्रमाचे महत्त्व, विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण, व्यक्तिमत्त्व विकास, संवादकौशल्य आणि सामाजिक उत्तरदायित्व वाढविण्यासाठी करिअर संसद उपक्रमाची भूमिका स्पष्ट केली. या मंत्री मंडळात श्रावणी बारटक्के मुख्यमंत्री, उत्कर्ष चव्हाण नियोजन मंत्री, नम्रता चव्हाण कायदे व शिस्तपालन मंत्री, रिया अडसुळे माहिती व प्रसारण मंत्री, रिद्धी पाटील उद्योजकता विकास मंत्री, रतिका धाडवे रोजगार व स्वयंरोजगार मंत्री, सोनाली जंगम कौशल्य विकास मंत्री, रोहन आचार्य संसदीय कामकाज मंत्री, स्नेहा अधिकारी महिला व बालकल्याण मंत्री, तर फातिमा फटाकरे सदस्य म्हणून शपथ घेत पदभार स्वीकारला. यानंतर सर्व पदाधिकाऱ्यांनी वर्षभर विविध शैक्षणिक, सामाजिक, कौशल्यविकास व नेतृत्वविकास उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याची शपथ घेतली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रे तसेच करिअर कट्टा माहिती पुस्तिका प्रदान करण्यात आल्या.



## निवडक



### विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**कर्जत :** कर्जत तालुक्यातील राजिप प्राथमिक शाळा, वदप येथे टोरेंट एनर्जी स्टोरेज सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेडतर्फे विद्यार्थ्यांना शालेय स्कूल किटचे वाटप करण्यात आले. वदप शाळेत आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण घेता यावे, त्याचबरोबर त्यांच्या शिक्षणाचा दर्जा उंचवावा, त्यांनी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येऊन त्यांना शिकण्यासाठी पूरक शैक्षणिक साहित्य सहज उपलब्ध व्हावे, या सामाजिक जाणिवेतून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी शाळेतील १५९ विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, वह्या, पेन, पेन्सिल, कंपास बॉक्स, पाण्याची बाटली तसेच इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. टोरेंट एनर्जी स्टोरेज सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी ऊर्जा साठवण क्षेत्रात कार्यरत असून, स्थानिक परिसरातील शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक विकासासाठी विविध सामाजिक उत्तरदायित्व फंडाचा वापर करून समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबवत आहे.



### चारसूत्री भात लागवड प्रात्यक्षिक

**तळा :** कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अंतर्गत पाचघर येथील प्रगतशील शेतकरी हयबत नलावडे यांच्या शेतामध्ये चारसूत्री भात लागवड तंत्रज्ञानाचे विशेष प्रात्यक्षिक पार पडले. भात पिकाचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि आधुनिक कृषी पद्धतीचा अवलंब करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या प्रात्यक्षिकाच्या वेळी कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यामध्ये मंडळ कृषी अधिकारी संजय घालमे, सहाय्यक कृषी अधिकारी योगेश कोळी आणि आत्मा तळाचे सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक सचिन लोखंडे उपस्थित होते. त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले आणि प्रात्यक्षिक करून दाखवले. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी सांगितले की, पारंपारिक पद्धतीपेक्षा चारसूत्री भात लागवड पद्धतीचा अवलंब केल्यास पिकाची उत्तम वाढ होते, कीड व रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो आणि उत्पादनात लक्षणीय वाढ होते. या आधुनिक पद्धतीचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आपल्या शेतात वापर करावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.



### पनवेलमध्ये खड्ड्यांचे विघ्न

**खांदा कॉलनी :** गेल्या काही दिवसांपासून पावसाने उसंत घेतली आहे. पावसाच्या तडाख्यानंतर पनवेल परिसरातील रस्त्यांची दुरवस्था समोर आली आहे. पनवेलमधील कच्छी मोहल्ला परिसरात रस्त्यावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले असून दुचाकीस्वारांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. खड्डे चुकवत वाहन चालवण्याची अक्षरशः स्पर्धाच सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. एम.जी. रोडवरील ड्रेनेज लाईनच्या झाकणांलगतही मोठे खड्डे पडले आहेत. हे खड्डे तात्पुरते बुजवण्यासाठी टाकण्यात आलेली मोठी खडी वाहनांच्या चाकाखाली उडून रस्त्यालगतच्या दुकानदारांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक पादचारी आणि वाहनचालक उडणाऱ्या खडीमुळे किरकोळ जखमी झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. पावसाळा अद्याप संपलेला नसताना तात्पुरत्या उपायांऐवजी कायमस्वरूपी डांबरीकरण करून धोकादायक खड्डे त्वरित बुजवावेत, अशी मागणी नागरिकांकडून पनवेल महानगरपालिकेकडे करण्यात येत आहे.

### दररोज १८० मेट्रिक टन कचऱ्याचे संकलन | मनुष्यबळ, यांत्रिक साधनांमध्ये वाढ

## मुंबई मनपाकडून जुहू किनाऱ्यावर स्वच्छता मोहीम

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुसळधार पाऊस आणि त्यामुळे समुद्रात वाहून गेलेला तसेच भरतीच्या लाटांमुळे पुन्हा किनाऱ्यावर येणाऱ्या कचऱ्याचे संकलन आणि विल्हेवाट लावण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने जुहू समुद्र किनाऱ्यावर स्वच्छता मोहीम अधिक तीव्र केली आहे.

महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून जुहू समुद्र किनाऱ्यावरून दररोज सुमारे १८० मेट्रिक टन कचरा हटविण्यात येत आहे. मागील दहा दिवसात सुमारे १ हजार ८०० मेट्रिक टन कचरा हटवून त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली आहे.



ही स्वच्छता मोहीम अधिक तीव्र करून जुहू समुद्रकिनारा स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उप आयुक्त किरण दिघावकर यांनी अतिरिक्त मनुष्यबळ आणि यंत्रसामुग्री तैनात केली आहे.

यंदा जुलै महिन्याच्या सुरुवातीच्या काळात एक हजार मिलिमीटरपेक्षा अधिक पावसाची नोंद झाल्याने लहान नाले आणि नैसर्गिक जलवाहिन्यांमधील तरंगता कचरा अरबी समुद्रात वाहून गेला होता. भरतीच्या लाटांमुळे हाच कचरा आता पुन्हा किनाऱ्यावर येत आहे. त्यामुळे स्वच्छता व्यवस्थेवर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे. मात्र अशा परिस्थितीतही घनकचरा व्यवस्थापन विभागाद्वारे अतिरिक्त यंत्रणा उभी करून किनारा स्वच्छतेवर भर दिला जात आहे.

जुहू समुद्रकिनाऱ्यावर सध्या दररोज जवळपास ३५० मेट्रिक टन कचरा किनाऱ्यावर वाहून येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका सातत्याने समुद्रकिनारा स्वच्छतेची मोहीम राबवत आहे. दररोज सुमारे १८० मेट्रिक टन कचरा हटविण्यात येत आहे. मागील दहा दिवसांतच समुद्र किनाऱ्यावरून सुमारे १ हजार ८०० मेट्रिक टन कचरा हटवून त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली आहे.

आव्हानात्मक हवामानातही समुद्र किनारा स्वच्छ, सुरक्षित आणि नागरिकांसाठी खुला ठेवण्यासाठी महानगरपालिकेने मनुष्यबळ आणि यंत्रसामग्री मोठ्या प्रमाणावर तैनात केली आहे.

### कचरा हटविण्याच्या कामाला वेग

यंदाच्या पावसाळ्यात कचऱ्याचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढल्याने महानगरपालिकेने नेहमीच्या यंत्रणेसोबत अतिरिक्त स्वरुपात १ बीच क्लिनिंग मशिन, २ बॉबकॅट्स, ५ डंपर्स, १ जेसीबी, २ ट्रॅक्टर ट्रॉली, २ पोकलेन मशिन्स तसेच दोन सत्रांमध्ये कार्यरत ९० अतिरिक्त स्वच्छता कर्मचारी तैनात केले आहेत. त्यामुळे कचरा हटविण्याच्या कामाला अधिक वेग मिळाला आहे.

# शार्लोट लेक रस्त्याची दुरवस्था

## • दगड मातीतून घोड्यांची ये-जा • पर्यटकांना पायी चालताना अडथळे

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान येथे आठ दिवसात २००० मिली पावसाची नोंद झाली आहे. या पावसामुळे माथेरान या पर्यटन स्थळावरील सर्वात गजबलेला रस्ता असलेला शार्लोट लेक रस्ता प्रचंड खराब झाला आहे. लेक येथून एको पॉईंटकडे येणारा रस्ता पर्यटकांना पायी चालत जाण्याच्या लायकीचा राहिलेला नाही. त्यामुळे पर्यटकांना घोड्यावर बसवून प्रवास करणे म्हणजे अपघाताला निमंत्रण देण्यासारखे असल्याचे अश्वपालक सांगत आहेत.

माथेरान शहरात आजही अनेक रस्ते हे दगड मातीचे आहेत. त्या रस्त्यांची दरवर्षी दगड मातीने दुरुस्त केले जातात. दगड मातीच्या रस्त्यावरून घोडे ये-जा करीत असतात. त्यावेळी बरेचदा घोड्यांवर पर्यटक सवारी करीत असतात. त्यामुळे खराब रस्त्याने प्रवास केला जात असताना घोडे यांचे पाय घसरून घोड्यांना अपघात झाले आहेत. तर घोड्यावरून पर्यटक पडल्याने त्यांना देखील अपघात झाले आहेत. मागील महिन्यात साधारण दहा पर्यटक हे घोड्यावरून पडले असून घोड्यांचे पाय घसरून ही सर्व अपघात झाले आहेत. त्यामुळे माथेरानमधील लाल मातीचे रस्ते दरवर्षी दुरुस्त करण्याची आवश्यकता होती. मात्र, तरी देखील माथेरान नगरपरिषदकडून अनेक रस्त्यांची दुरुस्तीची कामे झालेली नाहीत. त्यामुळे पर्यटकांना घोड्यावरून प्रवास करताना



अश्वपालक सतत भीतीच्या छायेत असतात.

सर्वाधिक पर्यटक घोड्यावरून प्रवास करीत असलेल्या माथेरानमधील एको पॉईंट ते शार्लोट लेक असा प्रवास करीत असतात. या रस्त्याने सर्वसामान्य पर्यटक आणि स्थानिक यांना चालण्यास चांगला रस्ता नाही. त्या ठिकाणी रस्त्यावर किमान दीड ते दोन फुटाचे खड्डे पडले आहेत. तर काही भागात चार पाच फुटाचे दगड जमिनीवर डोके काढलेले दिसून येत आहेत. अशा रस्त्याने तेथून जाणारे पर्यटक हे रस्त्याच्या बाजूला असलेल्या पाणी वाहून नेणाऱ्या गटाराचे भीतीवरून चालण्याचा प्रयत्न करतात. तर रस्ता दुरुस्त केला नसल्याने रस्त्यावरून घोडे चालवले जात असताना अपघात होण्याची भीती वाढली आहे. यावर्षी पावसाळ्याचे तीन महिने जाण्याचे बाकी आहेत. त्यामुळे पावसाळ संपेपर्यंत पर्यटकांना घोड्यावर बसवून नेताना कसरत करावी लागणार आहे. त्याबाबत अश्वपालक माथेरान नगरपरिषदेच्या कामाबद्दल नाराजी व्यक्त करीत आहेत. तर घोड्यावरून प्रवास करणारे पर्यटक यांच्याकडून देखील नाराजी व्यक्त केली जात आहे.

> पर्यटकांसाठी हा रस्ता अपघात होण्याची सुरुवात आहे वाटत. आम्हाला धड रस्त्याने चालता येत नाही तर घोडे कसे चालणार.
> -सलमान पटेल, पर्यटक सायन मुंबई.

> रस्ता पाहून पर्यटक घोड्यावरून प्रवास करण्यासाठी बसायला घाबरतात, त्यामुळे आमच्या पोटापाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. -सैफ शेख, अश्वपालक

> पालिका रस्त्याची दुरुस्ती करीत नसल्याने पर्यटकांना घोड्यावर बसवणे हे अपघाताला निमंत्रण देण्यासारखे आहे.
> -शुभम नाईकडे, अश्वपालक

# फूटपाथवर पडलेल्या फांद्या तशाच

| खांदा कॉलनी | प्रतिनिधी|



मागील आठवड्यात झालेल्या मुसळधार पाऊस आणि जोरदार वाऱ्यामुळे पनवेल शहरातील अनेक झाडे मुळासकट उन्मळून रस्त्यावर कोसळली. काही ठिकाणी झाडे चारचाकी वाहनांवर पडल्याने वाहनधारकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. अनेक ठिकाणी धोकादायक ठरलेल्या झाडांच्या फांद्या पनवेल महानगरपालिकेने तातडीने कापल्या. मात्र, कापलेल्या झाडांची आणि फांद्यांची विल्हेवाट लावण्याकडे पालिकेने दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

शहरातील अनेक रस्ते, फूटपाथ आणि सार्वजनिक ठिकाणी कापलेल्या फांद्या तसेच झाडे अनेक दिवसांपासून पडून आहेत. त्यामुळे वाळलेल्या पानांचा मोठ्या प्रमाणात कचरा साचत असून परिसराचे विद्रूपीकरण होत आहे. फूटपाथ अडवल्याने पादचाऱ्यांनाही त्रास सहन करावा लागत आहे.

एकीकडे मस्वच्छ सुंदर सर्वे क्षणफमध्ये चांगली कामगिरी करण्याचा दावा करणाऱ्या पालिकेची ही दयनीय परिस्थिती नागरिकांच्या नाराजीचे कारण ठरत आहे. धोकादायक फांद्या कापल्या, पण त्या उचलणार कधी? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. संबंधित विभागाने तातडीने कापलेल्या झाडांची विल्हेवाट लावून शहर स्वच्छ करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## पाथरज परिसरात लावणी सुरू

**नेरळ :** कर्जत तालुक्यात पाथरज परिसरात पाण्याची ठिकाणे असलेल्या शेतीमध्ये भाताची रोपांची लावणी सुरू झाली आहे. यावर्षी भाताचे कोठार असलेला कर्जत तालुका पावसाच्या लहरीपणामुळे संकटात आला आहे. भाताची रोपे बहुसंख्य ठिकाणी जून महिन्याचे अखेरीस आणि जुलै महिन्याच्या सुरुवातच आठवड्यात झालेल्या पावसामुळे जमिनीबाहेर आलीच नाही. मात्र, तालुक्यातील प्रगत शेतकरी मोहन शिंगटे यांनी भाताची रोपे मोटारद्वारे पाणी घालून जगवली आहेत.आता ती रोपे चांगली तयार झाली असून भाताच्या रोपांची लागवड देखील सुरू करण्यात आली आहे.

# धावत्या इनोव्हा कारवर लोखंडी खांब कोसळला

| पनवेल | ग्रामीण | प्रतिनिधी |

पनवेल-जेएनपीटी मार्गावरील सुरू असलेल्या कामादरम्यान बुधवारी धावत्या इनोव्हा कारवर लोखंडी बॅरिकेडचा खांब कोसळल्याने मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. या घटनेत बदलापूर येथील अनिल धर्माधिकारी यांच्या इनोव्हा कारचे मोठे नुकसान झाले असून, सुदैवाने वाहनातील सर्वजण सुखरूप बचावले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पनवेल-जेएनपीटी मार्गावर उड्डाणपूल व रस्त्याच्या कामासाठी क्रेनच्या सहाय्याने लोखंडी बॅरिकेडचा भाग उचलण्यात येत होता. त्याचवेळी तोल गेल्याने लोखंडी खांब अचानक निसटून खाली आला आणि रस्त्यावरून जात असलेल्या इनोव्हा कारवर आदळला. धडकेमुळे कारच्या छतासह पुढील भागाचे नुकसान झाले. मात्र, काही क्षणांच्या फरकाने मोठी जीवितहानी टळली आहे.

घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणा व पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अपघातग्रस्त वाहन रस्त्याच्या बाजूला हलवून वाहतूक सुरळीत करण्यात आली. या घटनेमुळे काही काळ पनवेल-जेएनपीटी मार्गावर वाहतुकीची कोंडी



झाली होती.

या अपघातानंतर सुरू असलेल्या कामांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. काम सुरू असताना पुरेशा सुरक्षाव्यवस्था, वाहतूक नियंत्रण आणि क्रेनद्वारे उचलण्यात येणाऱ्या साहित्याची योग्य काळजी घेतली जात आहे का, असा सवाल वाहनचालकांकडून उपस्थित केला जात आहे.

पनवेल-जेएनपीटी मार्गावर सुरू असलेल्या कामांदरम्यान यापूर्वीही अशा स्वरूपाच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे कामे करताना सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करून वाहनचालक व नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## पाऊस गायब झाल्याने शेतकरी चिंतेत

| आगरदांडा | प्रतिनिधी|

मुरूड तालुक्यात ३३०० हेक्टर भात लागवडीचे क्षेत्र असुन यंदा शेतकऱ्यांनी जया, सुवर्णा, रुपाली,कर्जत, चिंटू, वाडा, कोलम, शुभांगी, आदी जातीच्या मोठ्या प्रमाणावर भाताची लागवड केली आहे. भात हे प्रमुख पीक असल्याने शेतकरी मोठ्या आशेने शेती करत आहेत. परंतु, गेल्या सात दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे तालुक्यातील शेतकरी चिंतेत सापडले आहेत. ग्रामीण भागातील बहुतांश शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह हा भात शेतीवर अवलंबून आहे. सुरुवातीच्या पावसानंतर अनेक शेतकऱ्यांनी खरीप पिकांची पेरणी पूर्ण केली होती. तालुक्यात १५३९ मिमी पाऊस सात दिवसांपुर्वी पडला होता त्यानंतर पावसाने अचानक उघडीप दिल्याने राब वाढीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भात राबाना सध्या पावसाची नितांत गरज आहे. पाऊस न झाल्यास राब सुकण्याचा धोका होऊ शकतो यामुळे शेतकऱ्यांना दुबार पेरणीचे संकटही ओढवू शकते. याकाळजीने शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसले असून लवकरच चांगला पाऊस पडावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मुनवलीत स्मार्टकार्ड शिबिराचे आयोजन

| सोगाव | प्रतिनिधी |



अलिबाग तालुक्यातील मुनवली येथे सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांच्या वतीने एसटी बसमध्ये महिला, अमृत ज्येष्ठ नागरिक यांना सवलतीच्या दरात प्रवास करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या महिला सन्मान योजना व अमृत ज्येष्ठ नागरिक योजनांच्या स्मार्टकार्ड शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांनी आयोजित केलेल्या या शिबिराचा अनेक महिलांनी व अमृत ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या प्रमाणात लाभ घेत अल्पदरात आपले स्मार्टकार्ड बनवून घेण्यात आले.

या शिबिरामुळे गरीब व सर्वसामान्य महिला व अमृत ज्येष्ठ नागरिक यांचा वेळेसह होणारे शारीरिक व आर्थिक नुकसान टळले आहे, याबद्दल महिलांनी व ज्येष्ठ नागरिकांनी सचिन घाडी यांचे विशेष आभार मानले.

## वासांबे मोहोपाडा हद्दीत मतदार यादी विशेष पुनरीक्षण मोहिमेला सुरुवात

| रसायनी | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या वासांबे मोहोपाडाग्रुपग्रामपंचायतीच्याहद्दीत मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या सूचनेनुसार मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम राबवण्यात येत आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी आणि मतदार यादीतील त्रुटी दूर करून मतदारांची नोंदणी करण्यासाठी हा महत्त्वाचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

या मोहिमेचे वेळापत्रक प्रशासनाने जाहीर केले असून, त्यानुसार घरोघरी जाऊन माहिती संकलित केली जाणार आहे. यासाठी शाळा, मंदिर, शासकीय कार्यालये येथे एसआयआर कार्यक्रम सुरू आहे. यानंतर ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रकाशित केली जाईल. या यादीवर ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नागरिक आपले दावे आणि हरकती नोंदवू शकतील,ज्यांचे निराकरण ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत केले जाईल. या प्रक्रियेनंतर ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादीचे प्रकाशन करण्यात येणार आहे.

वासांबे ग्रामपंचायतीच्या सरपंच उमा मुंढे यांनी या मोहिमेचे महत्त्व अधोरेखित करत परिसरातील सर्व नागरिकांना आपल्या मतदानाची पात्रता तपासण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांनी अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळ voters.eci.gov.in किंवा ECINET ॲपचा वापर करावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# २२ गाव बचाव संघर्ष समितीकडून आगरी समाज भवनासाठी देणगी

| अलिबाग | प्रतिनिधी |



आगरी समाज संस्था, अलिबागसाठी आजचा दिवस अत्यंत आनंदाचा आणि अभिमानाचा ठरला. २२ गाव बचाव संघर्ष समिती, खारेपाट विभाग यांच्या वतीने संस्थेच्या महत्त्वाकांक्षी आगरी समाज भवन उभारणीसाठी रु. ५१,००० (रुपये एकावन्न हजार) इमारत निधीचा धनादेश प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास भुवनेश्वर मंदिर ट्रस्टचे सचिव नरेंद्र पाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी अर्जुन गावंड यांनी २२ गाव बचाव संघर्ष समितीच्या स्थापनेमागील उद्देश आणि तिच्या कार्याचा आढावा घेतला. सेझ प्रकल्पाला विरोध करण्यासाठी स्थापन झालेल्या या समितीने आपल्या उद्दिष्टात यश मिळवल्यानंतर संस्थेच्या खात्यात शिल्लक असलेला निधी समाजोपयोगी कार्यासाठी वापरण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार खारेपाट विभागातील चार नोंदणीकृत व कार्यक्षम संस्थांना निधी वाटप करण्याचे ठरवल्याचे सांगितले. तसेच आगरी समाज संस्थेला वाडगाव येथे आगरी समाज भवन उभारणीसाठी रु. ५१,००० चा धनादेश प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास अनंत म्हात्रे, राजेंद्र पाटील, उदय म्हात्रे, मिलिंद धोदरे, मनोहर पाटील, डॉ. जगन्नाथ पाटील, श्री प्रल्हाद पाटील, दिपक पाटील, खारेपाट विभागातील २२ गावांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## माणगाव पोलिसांचा मोठा दणका | सोशल मीडियावरील बुकिंग रडारवर

# देवकुंड दुर्घटनेनंतर २५ जणांवर गुन्हे

| माणगाव | प्रतिनिधी |

भिरा येथील देवकुंड धबधब्यावर दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर माणगाव पोलिसांनी कठोर कारवाईचा बडगा उचलला आहे. या प्रकरणात एकूण २५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यात मृत पर्यटकांसोबत आलेले सहकारी, स्थानिक गाईड तसेच पर्यटकांकडून पैसे घेऊन बुकिंग करणाऱ्या व्यक्तींचा समावेश असल्याची माहिती माणगावचे पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी सोमवारी (दि.१३) आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली. या कारवाईमुळे परिसरातील बेकायदेशीर गाईड तसेच बुकिंग घेणाऱ्या व्यक्तींचे धाबे दणाणले आहेत.



पत्रकार परिषदेत बोलताना संजय बांगर यांनी, देवकुंडसह प्रतिबंधित पर्यटन स्थळांवर पर्यटकांना नेण्यासाठी नेमके कोण-कोण बुकिंग घेत आहेत, सोशल मीडियाद्वारे पर्यटकांशी संपर्क साधून त्यांना कोण आकर्षित करत आहे, याचा सखोल तपास सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच फेसबुक, व्हॉट्सॲप, मोबाईल कॉल, ई-मेल इत्यादी माध्यमांतून पर्यटकांना आमिष दाखवून बेकायदेशीर बुकिंग करणाऱ्यांची गय न करता लवकरच त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, देवकुंड, सिक्रेट पॉईंट, ताम्हिणी घाट आणि कुंभे धबधबा या पर्यटनस्थळांवर सध्या प्रतिबंधात्मक आदेश लागू आहेत. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीने या ठिकाणांसाठी बुकिंग करू नये आणि नागरिकांनीही या परिसरात जाणे टाळावे. बंदी आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या पर्यटकांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही. तसेच, या दुर्घटनेस कारणीभूत ठरणाऱ्या प्रत्येक दोषींवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल. या दुर्घटनेनंतरही काही पर्यटक गटांची सोशल मीडियावर बुकिंग सुरू असल्याची खात्रीलायक माहिती पोलिसांना मिळाली असून, अशा सर्व ग्रुपवर पोलिसांचे बारकाईने लक्ष आहे. प्रतिबंधित परिसराच्या सुमारे एक किलोमीटरच्या परिघात आढळणारे पर्यटक, स्थानिक गाईड किंवा संशयित व्यक्तींवर तात्काळ कारवाई केली जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### बुकिंग रॅकेटवर गंभीर प्रश्नचिन्ह

प्रतिबंधित पर्यटन स्थळांवरील सुरक्षा, बंदी आदेशांची प्रभावी अंमलबजावणी, बेकायदेशीर पर्यटन व्यवसाय आणि सोशल मीडियाद्वारे चालणाऱ्या बुकिंग रॅकेटवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या पार्श्वभूमीवर माणगाव पोलिसांनी तपासाची व्याप्ती वाढवली असून, बेकायदेशीर पर्यटन साखळीतील प्रत्येक घटकाचा शोध घेत कठोर कारवाई करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. प्रशासनानेही नागरिकांना पावसाळ्यात बंदी आदेशांचे काटेकोर पालन करण्याचे आणि जीव धोक्यात घालणाऱ्या पर्यटनाला बळी न पडण्याचे आवाहन केले आहे.

## निवडक

### रेवदंडा बसस्थानकात वृक्षारोपण

**रेवदंडा :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त हरित पर्यावरणाचा संदेश देण्यासाठी राज्यभर आयोजित करण्यात आलेल्या वृक्षारोपण अभियानांतर्गत रेवदंडा बसस्थानकात उत्साहात वृक्षारोपण करण्यात आले. रा. प. अलिबाग आगार, रायगड विभाग, पेण यांच्या वतीने आयोजित या उपक्रमाचे नियोजन रेवदंडा बसस्थानक नियंत्रक देवराज राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी अभय आपटे यांना विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित राहण्याचे आमंत्रण देण्यात आले होते. कार्यक्रमा दरम्यान बसस्थानक नियंत्रक देवराज राऊत व अभय आपटे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यावेळी एसटी महामंडळातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### ‘पेणकरांच्या आरोग्याशी खेळ थांबवा’

**पेण :** पेण शहरात दर पावसाळ्यात गढूळ, अशुद्ध आणि दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठ्याची समस्या कायम असून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते इंजि. जीवन शंकर पाटील यांनी केला आहे. नागरिकांना शुद्ध व पिण्यायोग्य पाणी देता येत नसेल, तर संपूर्ण शहराची पाणीपट्टी माफ करावी किंवा त्यामध्ये सवलत द्यावी, अशी मागणी त्यांनी नगरपरिषदेकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, अनेक वर्षांपासून नागरिकांना दूषित पाणीपुरवठ्याचा सामना करावा लागत असून आंदोलने, निवेदने आणि सातत्याने तक्रारी करूनही या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत आहे. विशेषतः ६ जुलैपासून सुरू झालेल्या पावसाळ्यात नळातून गढूळ व दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याने लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि गर्भवती महिलांसह सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. नियमित पाणीपट्टी आकारूनही दर्जेदार सेवा मिळत नसल्याने हा नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचा भंग असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. पाणी शुद्धीकरण केंद्र, जलवाहिन्या आणि वितरण व्यवस्थेची उच्चस्तरीय तांत्रिक चौकशी करून दोष दूर करावेत, पाण्याची नियमित प्रयोगशाळा तपासणी करून अहवाल सार्वजनिक करावेत आणि भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होणार नाही, यासाठी कायमस्वरूपी कृती आराखडा जाहीर करावा, अशी मागणी पाटील यांनी केली आहे.

### ‘नुकसानीचे तातडीने पंचनामे करा’

**रसायनी :** मागील आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कर्जत, खालापूर तालुक्यातील शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. शेत जमीन, भाताची रोपे वाहून गेली आहेत. फळ बागांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत. त्याबाबतचा अहवाल तत्काळ शासनाला पाठविण्याचे आदेश मावळचे खा. श्रीरंग बारणे यांनी अधिकाऱ्यांना दिले. खा. बारणे यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा प्रशासकीय इमारत खालापूर येथे बुधवारी आढावा घेतला. कृषी, सार्वजनिक बांधकाम विभाग, वैद्यकीय, आरोग्य, महावितरण सर्व विभागांची बैठक घेतली. उपविभागीय अधिकारी कर्जत खालापूर प्रकाश सकपाळ, खालापूर तहसीलदार अभय चव्हाण, कर्जत तहसीलदार धनंजय जाधव, कर्जत नगरपरिषद मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, खोपोली नगरपरिषद मुख्याधिकारी पंकज पाटील, खालापूर नगरपंचायत मुख्याधिकारी कोमल कराळे, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, खालापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन पवार, पोलीस निरीक्षक संजय बांगर, गट विकास अधिकारी खालापूर संदिप कराळ, सार्वजनिक बांधकाम विभागगाचे उपविभागीय उप अभियंता संदेश पाटील, मोरबे नवी मुंबईचे कार्यकारी अभियंता संतोष उनवणे, तालुका आरोग्य अधिकारी कल्याणी इंगोले, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सविता काळेल, एमआयडीसी पातळगंगा अग्निशमन दलाचे स्टेशन अधिकारी आशिष मोरे, खालापूर नगरपंचायत नगराध्यक्षा रेश्मा मोडवे, विजा पाटील, संदेश पाटील, प्रमुख रेश्मा आंग्रे, मोतीराम ठोंबरे, उमेश गायकवाड, रोहित विचारे व सबंधित अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कामोठे पोलिसांकडून मद्य जप्त

**पनवेल :** कामोठे पोलिसांनी मोठा खांदा गावात छापा टाकून २१ हजार पाचशे रुपयांचे मद्य जप्त केले. मोरेश्वर मीनानाथ भगत (वय ३८) याने तो रोहत असलेल्या घरासमोरील गल्लीत २१ हजार पाचशे रुपये किमतीचे मद्य बाळगल्या प्रकरणी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy for Furniture store Manager, location- Zirad, Qualification Graduation, MBA Experience- 2-4 years in Retail Contact- 9823585321
- EDII द्वारा उदया प्रकल्प अंतर्गत उदया महिला उद्योजिका असोशिएनद्वारा अलिबाग येथे ‘उदया बाजार’ स्टोअर्स करीता अनुभवी रिटेल स्टोअर्स मॅनेजर (महिला) तसेच सेल्स गर्ल पाहिजेत संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक संपर्क - ७७७५८०२४९७ ईमेल- pasb-c@ediindia.org
- गिरीष एंटरप्रायजेस, अलिबाग आवश्यक पदे : ऑफिस कामसाठी १ मुलगी (किमान १२ वी उत्तीर्ण) साईटवरील कामासाठी २ हेल्पर मुले (शिक्षणाची अट नाही) टू-व्हिलर चालवता येणे आवश्यक स्थानिक उमेदवारांना प्राधान्य ऑफिस वेळ : सकाळी ९:०० ते सायंकाळी ६:०० इच्छुक उमेदवारांनी ८२३७३१६२१८ ह्या नंबर वर आपला रिझ्युम व्हाट्सअप करावा.
- अलिबागपासून जवळच असलेल्या फार्महाऊसवर राहण्यासाठी जोडप अथवा पुरुष कामगार हवा आहे. त्वरीत संपर्क साधा. संपर्क क्रमांक - ९८२२९३८४४४.
- शुभमुहुर्त विवाहमंडळ अलिबाग शाखेत सर्व जातीय वधूवरांची नावनोंदणी सुरु. ४६ शाखा, वेबसाईट, ॲप्लीकेशन नावनोंदणीसाठी - ९२२६७६६१२९.
- जन्मकुंडली-हस्तरेखा-टॅरोकार्ड-अंकशास्त्र यावरुन ज्योतिषविषयक मार्गदर्शन व उपाय श्री म्हात्रे- ९२२६७६६१२९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

अर्जदाराचे वकील ॲड. चैतन्य सुरेश पाटील

## जाहीर नोटीस

अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात
दिवाणी चौकशी अर्ज क्र. २०७/२०२५

**१. श्रीमती. संगीता अशोक भामरे**
वय : ५० वर्षे, धंदा - गृहिणी,
**२. श्री. सुरज अशोक भामरे**
वय : ३२ वर्षे, धंदा नोकरी,
**३. श्री. आकाश अशोक भामरे**
वय : २९ वर्षे, धंदा- नोकरी,
**४. कु. श्वेता अशोक भामरे** अर्जदार
वय : २७ वर्षे, धंदा नोकरी,
सर्व राहणार - तळकर नगर,
बापदेव मंदिरच्या मागे,
रामनाथ-अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड
विरुध्द
कोणीही नाही सामनेवाला

१.अर्जदार क्र. १ हि कै. अशोक नथ्थू भामरे यांची पत्नी आहे व अर्जदार क्र. २ व ३ हे अशोक नथ्थू भामरे यांचे मुलगे आहेत. अर्जदार क्र. ४ ही अशोक नथ्थू भामरे यांची मुलगी आहे. कै. अशोक नथ्थू भामरे हे दिनांक १३/०४/२०१६ रोजी मयत झालेले आहेत. कै. अशोक नथ्थू भामरे यांना अर्जदार यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाही. अर्जदार हे कै. अशोक नथ्थू भामरे यांचे मृत्यु पश्चात कायदेशीर वारस आहेत असे जाहीर करून तसा वारस दाखला मिळण्याकरिता मा. न्यायालयात चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

तरी अर्जदार यांच्या हक्कांबाबत कोणालाही व्यक्तीशः हरकत घ्यावयाची असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याचे आत किंवा दिनांक १९.०८.२०२६ रोजीपर्यंत वर नमूद मा. न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती द्यावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, वर नमूद कालावधी संपण्याच्या आधी योग्य त्या हरकती घेतल्या नाही तर हे न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्कांबद्दल कोणाचीही योग्य त्या हरकती नाही असे समजून त्यांना वारस दाखला देण्यात येईल.

सदरची नोटीस आज दिनांक १५ माहे ०७ २०२६ रोजी आमच्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**कनिष्ठ लिपिक** — **दिवाणी न्यायालय व स्तर अलिबाग-रायगड**
**कोर्टाचा शिक्का**
**अधिक्षक** — **दिवाणी न्यायालय व स्तर अलिबाग - रायगड**

---

**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग**
**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड**
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा रेवदंडाचे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ०५.०६.२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या नंतर दिनांक २९.०६.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. खेळया ताया वारगुडा यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक १३.११.२०२४ पर्यंतची रक्कम रुपये २,२९,८३७/- व दिनांक ०१.०४.२०२४ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १२.५० टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून ग्रुप ग्रामपंचायत रामराज हद्दीतील श्री. खेळया ताया वारगुडा यांच्या नावे असलेली मिळकत क्र ६२३ ब येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबागच्या दिनांक १३-११-२०२४ पर्यंतची रक्कम रुपये २,२९,८३७/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री. खेळया ताया वारगुडा**
ग्रुप ग्रामपंचायत रामराज हद्दीतील श्री. खेळया ताया वारगुडा यांच्या नावे असलेली मिळकत क्र. ६२३ ब क्षेत्र ३३.८३ चौ.मी.घर

स्थळ : अलिबाग
दिनांक : १६.०७.२०२६
**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

---

**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग**
**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड**
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पोयनाडचे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक १२.०१.२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक ०८.०६.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार सौ. कविता राजेंद्र पाटील यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक ०६.११.२०२४ पर्यंतची रक्कम रुपये ३,७९,८८५/- व दिनांक ०१.०४.२०२४ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज ११ टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून ग्रुप ग्रामपंचायत कुसुंबळे ता. अलिबाग मधील सौ. कविता राजेंद्र पाटील व श्री. राजेंद्र वल्लभ पाटील यांच्या नावे असलेली मिळकत ५६ ब येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबागच्या दिनांक ०६-११-२०२४ पर्यंतची रक्कम रुपये ३,७९,८८५/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- सौ. कविता राजेंद्र पाटील**
ग्रुप ग्रामपंचायत कुसुंबळे ता.अलिबाग मधील सौ.कविता राजेंद्र पाटील व श्री. राजेंद्र वल्लभ पाटील यांच्या नावे असलेली मिळकत ५६ ब क्षेत्र ३६४ चौ.फु. हे घर

स्थळ : अलिबाग
दिनांक : १६.०७.२०२६
**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

---

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली सामाईक मिळकत हि त्या मिळकतीचे विद्यमान मालक १. श्रीमती रूपाली राम म्हात्रे २. श्री. रोशन राम म्हात्रे ३. सौ. रसिका कवेश म्हात्रे ४ सौ. रूणाली नवनीत म्हात्रे सर्व राहणार-मु.भुते पो.थळ, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्याकडुन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तशी बोलणी श्री.नंदकुमार चंद्रकांत म्हात्रे राहणार मु. खुटारी पो. रोहिनजन तळोजा जि. रायगड व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदि. कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील ७ (सात) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| भुते ता. अलिबाग | २२/७ | ०-३२-१० <br> पो. ख ०-००-५० <br> एकुण क्षेत्र ०-३२-६० | १.३७ |

वर नमुद मिळकतीपैकी १. श्रीमती रूपाली राम म्हात्रे २. श्री. रोशन राम म्हात्रे ३. सौ. रसिका कवेश म्हात्रे ४. सौ रूणाली नवनीत म्हात्रे सर्व राहणार मु. भुते पो. थळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे हिश्श्याचे क्षेत्र ०-१५-८० हे. आर., पो. ख ०-००-५० हे. आर. आकार ०.६७ रू.पै. ही मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

अलिबाग,
दिनांक- १७/०७/२०२६
सही /-
**ॲड. पुनम अजित म्हात्रे**
जिल्हा न्यायालय-रायगड,
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबाईल नं ९७६४२१४०१०

---

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

---

IIFL FINANCE
**CIN: L67100MH1995PLC093797**
**Regd. Office:** IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

## सोन्याचा दागिन्यांचा लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा सार्वजनिक लिलाव **दिनांक १८.०८.२०२६** रोजी **सकाळी १०.००** वाजल्यापासून जिल्हा केंद्र **मुंबई – नवी मुंबई पनवेल उरण नाका, आयआयएफएल फायनान्स लिमिटेड, ग्राउंड फ्लोअर, क्राउन इम्पिरियल प्लाझा, पनवेल उरण नाका सर्कल, फिश मार्केटच्या जवळ, पनवेल –** 410206 येथे होणार आहे. स्थान किंवा तारखेतील कोणताही बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे प्रदर्शित केला जाईल. कोणत्याही कारणास्तव येथे उल्लेखित तारखेस लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर आयआयएफएलला त्याच अटी व शर्तींवर कोणत्याही पुढील तारखेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा हक्क आरक्षित आहे. ग्राहकाचा मृत्यू झाला, तर त्या लिलावाशी संबंधित सर्व अटीं नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारसाला लागू होतील.

**गोल्ड लोन खाता क्रमांक :** GL41561040, GL38314498, GL51068114, GL40724615, GL40012379, GL40351155, GL40336123, GL40363801, GL48328131, GL46418367, GL43573245, GL41997540, GL44528485, GL36306556, GL36313696, GL37068637, GL40686749, GL37402289, GL38127626, GL38547221, GL39640314, GL39662407, GL39972712, GL40139776, GL40339968, GL36465355, GL38944918, GL38013441, GL38031264, GL38621530, GL38888414, GL39946935, GL40061022, GL48479368, GL40423678, GL34486678, GL34502797, GL37942678, GL38503314, GL39669440, GL46031008, GL44245700, GL43185031, GL47193965, GL47817452, GL46775410, GL45475421, GL40043050, GL40175302, GL45739306, GL44820857, GL48936117, GL40098209, GL45461759, GL48780374, GL47557924, GL44247342, GL43188095, GL40133973, GL47810810, GL46774455, GL45476217, GL40748465, GL43187175, GL46773118, GL47195386, GL44244873, GL40346927, GL45739120, GL40401483, GL48221493, GL47812324, GL45475647, GL40401307, GL40421394, GL34946729, GL34491079, GL34504076, GL38259597, GL34491624, GL34504692, GL35150310, GL35912660, GL40359340, GL37871463, GL37814941, GL37991945, GL39286529, GL38297549, GL38328618, GL38327650, GL40988363, GL39188543, GL39211366, GL39313249, GL39295759, GL19426202, GL36104503, GL36123193, GL37246314, GL37614895, GL37519244, GL36827937, GL38806511, GL38955957, GL39376840, GL37381190, GL39150184, GL38729798, GL37843964, GL36899547, GL38609974, GL37329275, GL40304784, GL38338018, GL44148971, GL26911244, GL32523726, GL32848868, GL32857611, GL38187819, GL41057129, GL38230293, GL36009778, GL43488437, GL38162633, GL38207884, GL41908057, GL38790768, GL39048432, GL39923569, GL39953283, GL42884959, GL39937117, GL42777974, GL40327551, GL43011073, GL42480742, GL43100357, GL39939622, GL40292422, GL39953295, GL42282646, GL43053781, GL42377496, GL42981186, GL42480724, GL42718551, GL40700599, GL40688876, GL40705133, GL33709839, GL33688140, GL35495654, GL35508928, GL36937046, GL36673040, GL36498150, GL39227157, GL37812978, GL38141268, GL38334512, GL44220243, GL38713242, GL38732787, GL43975233, GL46746313, GL42707361, GL45998581, GL45104710, GL47332327, GL39494564, GL40049693, GL39517446, GL39540072, GL48584028, GL39562166.

लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

**तारीख : १७.०७.२०२६**
**स्थळ: रायगड (एमएच)**
**स्वाक्षरीकर्ता/–**
**अधिकृत स्वाक्षरीकर्ता**
**आयआयएफएल फायनान्स लिमिटेड**

---

IIFL FINANCE
**CIN: L67100MH1995PLC093797**
**Regd. Office:** IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

## सोन्याचा दागिन्यांचा लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा सार्वजनिक लिलाव **दिनांक १८.०८.२०२६** रोजी **सकाळी १०.००** वाजल्यापासून जिल्हा केंद्र **नागोठणे–मोनालिसा कॉम्प्लेक्स – शांती नगर नागोठणे, बाजार पेठ रोड, कोकणे हॉस्पिटल समोर, ता. रोहा, जि–रायगड पिन 412106,** येथे होणार आहे. स्थान किंवा तारखेतील कोणताही बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे प्रदर्शित केला जाईल. कोणत्याही कारणास्तव येथे उल्लेखित तारखेस लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर आयआयएफएलला त्याच अटी व शर्तींवर कोणत्याही पुढील तारखेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा हक्क आरक्षित आहे. ग्राहकाचा मृत्यू झाला, तर त्या लिलावाशी संबंधित सर्व अटीं नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारसाला लागू होतील.

**गोल्ड लोन खाता क्रमांक :** GL35254900, GL36635629, GL37596943, GL37580077, GL37704381, GL37686277, GL39155416, GL39177446, GL39598380, GL39655417, GL46799741, GL42937724, GL39654756, GL48292978, GL39626536, GL42406370, GL44454814, GL42407107, GL46800930, GL42936870, GL39819342, GL44453237, GL39784512, GL48293779, GL35741891, GL38174210, GL41938473, GL34251504, GL34276499, GL34269467, GL36559547, GL36627141, GL36845170, GL37503040, GL41043477, GL40504490, GL37614344, GL38034932, GL38415729, GL40978521, GL38204361, GL38333863, GL42428619, GL43703246, GL46516307, GL42125852, GL42718489, GL45055459, GL47778981, GL39469931, GL39703761, GL39420379, GL45943208, GL43641057, GL42737389, GL44691036, GL41736106, GL39951347, GL39939065, GL40352043, GL43818595, GL41881854, GL37295266, GL45577729, GL40263940, GL42412779, GL42813350, GL49101211, GL43889644, GL41477238, GL42389343, GL35562519, GL39133723, GL39356313, GL39327676, GL39604868, GL39657981, GL35126803, GL35119483, GL38787105, GL45931155, GL39960783, GL43020653, GL40389954, GL38724391, GL44404473, GL38045001, GL44009618, GL36463103, GL36466266, GL42841007, GL42747424, GL46544539, GL39233454, GL45125254, GL38438550, GL42672910, GL42746366, GL45125285, GL38760178, GL40376951, GL48223710, GL35364309, GL40383211, GL42244687, GL44051758.

लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

**तारीख : १७.०७.२०२६**
**स्थळ: रायगड**
**स्वाक्षरीकर्ता/–**
**अधिकृत स्वाक्षरीकर्ता**
**आयआयएफएल फायनान्स लिमिटेड**

---

**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग**
**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड**
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पोयनाडचे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ०८.०६.२०२६ रोजी निर्गमित केली. व त्यापाठोपाठ दिनांक ०९.०७.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. दीपक रामचंद्र थळे यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक १३.०१.२०२५ पर्यंतची रक्कम रुपये ८१,४५८/- व दिनांक ०१.०४.२०२४ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज ११ टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून ग्रुप ग्रामपंचायत शहापूर ता. अलिबाग हद्दीतील श्री. दीपक रामचंद्र थळे यांच्या नावे असलेली मिळकत १३१ ब येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबागच्या दिनांक १३-०१-२०२५ पर्यंतची रक्कम रुपये ८१,४५८/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री. दीपक रामचंद्र थळे**
ग्रुप ग्रामपंचायत शहापूर ता.अलिबाग मधील श्री. दीपक रामचंद्र थळे यांच्या नावे असलेली मिळकत १३१ ब क्षेत्र १७.०० चौ.मी. हे घर

स्थळ : अलिबाग
दिनांक : १६.०७.२०२६
**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

---

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-खानाव, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद वर्णनाचे जमीन मिळकती पैकी क्षेत्र ०-०५-०० हे. आर सौ. ज्योती रमेश बेलोस्कर रा. नवेनगर कुरुळ, पो.कुरुळ, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची असून, सदर जमिन मिळकत माझे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असून, तशा आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलां दरम्यान झालेला आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| खानाव, ता. अलिबाग, जि. रायगड | ८४/३ | ०-८१-०० <br> पो.ख. ०-११-०० <br> एकूण क्षेत्र ०-९२-०० | ६.३७ |

सदर वर नमूद जमिन मिळकतीपैकी ज्योती रमेश बेलोस्कर यांचे मालकीचे ०-०५-०० हे. आर आकार ०.३९ रु. पैसे जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदर जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबध व अन्य कोणताही बोजा, साठेकरार, ताबा, कब्जा, कुळव्यवहार, चार्ज, पोटगी हक्क, बक्षिस भाडेपट्टा, फरोक्कखत, जाण्या-येण्याचे मार्ग लिज, दावा वगैरे अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ चौदा दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : १६/०७/२०२६
सही-
**(ॲड. वैभव वसंत पाटील)**
रा. नवेदर बेली, ता. अलिबाग
जि. रायगड, मो ९८५०२६१००८
खरेदीदाराचे वकील

---

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक सुधाकर सदाशिव पाटील उर्फ मिसाळ यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/ संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/ विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मिळकतीचे वर्णन )**

नोंदणीकृत जिल्हा रायगड व उप-जिल्हा खालापुर, यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-निंबोडे, तालुका-खालापुर, जिल्हा रायगड येथे स्थित गट क्रमांक व उपविभाग १४/२, एकूण क्षेत्र ०१.३४.८० (हे.आर.चौ.मी.) आकार १५ रु.७५ पै. धारक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग आणि खालील प्रमाणे सीमाबद्धः
उत्तरेस आणि त्या दिशेने : गट क्रमांक व उपविभाग ३४/२
दक्षिणेस आणि त्या दिशेने : गट क्रमांक व उपविभाग १४/१ आणि १४/३
पूर्वेस आणि त्या दिशेने : गट क्रमांक व उपविभाग ३४/२ आणि ६५/१
पश्चिमेस आणि त्या दिशेने : गट क्रमांक व उपविभाग १६/१२ आणि १६/१४
ठिकाण: खालापुर
दिनांक : १७/०७/२०२६
**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही-**
**विक्रांत झुंजारराव**

---

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे बागमळा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक विष्णू श्रीकांत निकम यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे बागमळा, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| बागमळा ता. अलिबाग | १२१/९ | ०-१२-९० <br> पो.ख. ०-०३-३० <br> एकुण ०-१६-२० | ०.३३ |

दिनांक : १७/०७/२०२६
अशिलांची सही
**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट जे. एस. एम कॉलेज
जवळ, अलिबाग- रायगड मोबा. ९७६७०१०९०२

---

**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग**
**विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड**
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सूचना**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा रेवदंडाचे विशेष वसूली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ०५.०६.२०२६ रोजी निर्गमित केली व त्या नंतर दिनांक २५.०६.२०२६ रोजी जप्ती सूचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. सुशील सुरेश सुर्वे यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सूचनेत नमूद केलेली दिनांक १३.०१.२०२५ पर्यंतची रक्कम रुपये १५,३०,२७२/- व दिनांक ०१.०४.२०२४ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसुलीच्या तारखेपर्यंत त्यावरील व्याज १०.५० टक्के दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकाराने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती मिळकत जप्त केली आहे.

न्यायनिर्णित ऋणकोनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ उपनियम ११ (डी ११-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून मौजे रेवदंडा ता. अलिबाग हद्दीतील श्री. सुरेश भास्कर सुर्वे यांच्या नावे असलेली भुमापन व उपविभाग क्र.६०/२२ व ग्रुप ग्रामपंचायत रेवदंडा हद्दीतील मिळकत क्र.८०५ अ येथील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबागच्या दिनांक १३-०१-२०२५ पर्यंतची रक्कम रुपये १५,३०,२७२/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री. सुशील सुरेश सुर्वे**
**मौजे रेवदंडा** ता.अलिबाग हद्दीतील श्री. सुरेश भास्कर सुर्वे यांच्या नावे असलेली भुमापन व उपविभाग क्र ६०/२२ क्षेत्र ०-७६-०० हे आर व ग्रुप ग्रामपंचायत रेवदंडा हद्दीतील मिळकत क्र. ८०५ अ क्षेत्र १६.३५ चौ.मी. दुकान गाळा

स्थळ : अलिबाग
दिनांक : १६.०७.२०२६
**श्री के. के. राऊत**
विशेष वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक निर्मला पांडुरंग आगिवले यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे गोरठण बु.तालुका खालापूर जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| २३/२ | क्षेत्र ०-४१-२० हे आर पॉ, पोट खराब क्षेत्र ०-०३-१० हे आर पॉ एकुण क्षेत्र ०-४४-३० हे आर पॉ | ८-४४ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाना-पावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी- विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक १७/०७/२०२६
वकील **ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका
कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

खरेदीदारातर्फे वकील **ॲड. निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका
कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

---

## जाहीर नोटीस

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक श्री. रामचंद्र बापु लदगे यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

| गावाचे नाव | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मौजे वडवलीतर्फे वरेडी,ता.कर्जत, जि.रायगड | ६९/१५ | ०.१५.०० | ०.१२ |

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक: १७/०७/२०२६
**ॲड. उमेश आनंद भगत**
अधिवक्ता
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड
मो. नं. ९०४९४८६८०५

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे चोंढी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ५०, एकुण क्षेत्र १६-२०-०० आर. चौ.मीटर, आकार १६२.०० रू. पैसे या बिनशेती मिळकतीवरील ग्रुप ग्राम पंचायत किहीम हद्दीत खालील वर्णनाचे व्यापारी गाळे आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविलेले आहेत. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे

| मालमत्ता क्र. | क्षेत्र | मालकांची नावे |
|---|---|---|
| १५७०/ब/२ | २१३.९ चौ.फुट | नितीन मोंगीया व दिप्ती मोंगीया |
| १५७०/ब/३ | १९.८७ चौ. मीटर | नितीन मोंगीया व दिप्ती मोंगीया |
| १५७०/ब/४ | २१४ चौ.फुट | आशिम मोंगीया |
| १५७०/ब/१३ | २१४ चौ. फुट | सुरिंदर मोंगीया व नीना मोंगीया |

सदरहू व्यापारी गाळे निर्वेध असल्याचा भरवसा व्यापारी गाळ्याचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू व्यापारी गाळ्यांवर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास व्यापारी गाळे निर्वेध आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १६/०७/२०२६
**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो.,
ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर,
ब्राम्हण आळी, अलिबाग,
ता. अलिबाग जि. रायगड.

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, आमचे अशिल यांनी विद्यमान मालक श्री. दिनेश नारायण साळुंखे रा. सी.-०६, कमळ, बी.ए. आर. सी. कॉलनी, अनुशक्ती नगर, मुंबई, मुंबई उपनगर, महाराष्ट्र पिन नं. ४०००९४ यांसकडुन खालील नमुद केलेली मिळकत कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| १. | वरसोली, ता.अलिबाग, जि. रायगड. | ८/३ | ०-२५-१० <br> पो.ख.०-०३-०० <br> एकुण ०-२८-१० | ५.२५ |

पैकी खाते क्रमांक १०५७५, क्षेत्र ०-०१-५० हे. आर., आकार ०.३१ रु.पै.या मिळकतीबाबत.

वर वर्णन केलेली मिळकत निर्वेध व बोजारहित असलेबाबत विद्यमान मालकाचे म्हणणे आहे. तरीही वर नमुद मिळकतीत कोणाचाही हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, चार्ज, पोटगी, मृत्यूपत्र, वहिवाट व अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध असल्यास, अगर सदर मिळकती संदर्भात कोणत्याही न्यायालयात वाद प्रलंबित असल्यास अथवा अन्य कोणताही दंगदावा असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमुद मिळकत निर्वेध आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेकरीता खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वास कळावे.

अलिबाग
ता. १६/०७/२०२६
**ॲड. सुरज रमेश म्हात्रे**
रा. भुते, पो. थळ,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं.९६३७६६५९५७

# चिरनेर हायस्कूल रस्त्याची दुरवस्था

## संबंधित प्रशासन, लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

चिरनेर गावातील हायस्कूल ते कातळपाडा या मुख्य अंतर्गत रहदारीच्या महत्त्वपूर्ण मार्गाची दुरवस्था झाली आहे. या मार्गावरील मुळपाड्यात जाण्याच्या श्री महागणपती प्रवेशद्वारची स्वागत कमान ते हजरत खलिल शहा बाबा मस्जिदपर्यंतच्या रस्त्याची जुलैच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसाच्या पूरपरिस्थितीमुळे ही दुरवस्था झाली असून, हा रस्ता उखडून संपूर्ण खडी बाहेर आली आहे. तसेच, रस्त्याच्या एका बाजूची साईड पट्टी देखील वाहून गेली आहे. त्यामुळे या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वाहन चालक व पादचाऱ्यांना मोठ्या कसरतीचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, या रस्त्याच्या गंभीर प्रश्नाकडे एखादा अपघात होण्याआधी संबंधित प्रशासन व लोकप्रतिनिधी लक्ष देणार का? असा सवाल येथील नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

गेल्या कित्येक वर्षांत चिरनेर हायस्कूल ते कातळपाडा या रस्त्याची ठोस अशी दुरुस्ती करण्यात आली नसल्यामुळे हा रस्ता कित्येक वर्षांपासून नादुरुस्त झालेला आहे. यंदा पहिल्याच पावसात या रस्त्यावर खड्डे पडले असून, रस्त्याची खडी बाहेर आल्याने वाहन चालकांची डोकेदुखी वाढली आहे. त्यामुळे या मार्गावर अपघात होण्याची भीती वर्तवली जात आहे. त्याचबरोबर या रस्त्यावर अंदाजे १५ ते २० फूट उंचीचा पुल असून, पुलाचे लोखंडी रेलिंगही तुटून पडले आहेत. तसेच, या पुलालगतचा काही भाग खचल्यामुळे पुलावरचा प्रवास धोकादायक व असुरक्षित झाला आहे. त्यामुळे वाहन चालकांना असुरक्षिततेचा सामना करावा लागत आहे. या रस्त्यावरून गणेश भक्तांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. हा रस्ता परगावातील गणेश भक्त, शाळा कॉलेजचे विद्यार्थी, कामगार वर्ग, शेतकरी आणि सामान्य नागरिकांसह गुराढोरांसाठी महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे या रस्त्याची पाऊस पडण्याआधीच दुरुस्ती झाली असती, तर या जुलैच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसात अशी दुरवस्था झाली नसती. अशा प्रतिक्रिया येथील नागरिकांमधून उमटत आहेत. तसेच, या रस्त्याच्या गंभीर प्रश्नाकडे संबंधित प्रशासन व लोकप्रतिनिधी लक्ष देणार का? असा सवाल येथील नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, या नादुरुस्त रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी देखील केली जात आहे.

> "हा रस्ता गणेशभक्त व नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असून, हा रस्ता काही ठिकाणी अरुंद आहे. त्यामुळे ज्या-ज्या ठिकाणी रस्त्याचे रुंदीकरण करणे आवश्यक आहे, अशा ठिकाणचे वॉल कंपाऊंड थोडे सरकविण्यासाठी संबंधित मालकांना विश्वासात घेऊन रस्त्याची अडचण त्यांना समजावली जाणार आहे. जेणेकरून या रस्त्याचे कायमचे रुंदीकरण करता येईल."
> – भास्कर मोकल, सरपंच, चिरनेर

## निवडक



### भाकरवड येथील मंदिराचा जीर्णोद्धार

**भाकरवड** : अलिबाग तालुक्यातील भाकरवड गावातील कुलदैवत नूतन मंदिराचा जीर्णोद्धार व प्राणप्रतिष्ठा शनिवारी (दि.११) करण्यात आली. या निमित्ताने विविध धार्मिक व अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंदिराची वास्तुशांती, कुलदेवतांचा महाअभिषेक, कलश पूजन, गणपती पूजन, नंदी श्राद्ध, योगिनी मंडळ नवग्रह पूजा, ईशान्य कलश स्थापना, ६४ भैरव असे आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन श्रीमान ओंकार आणि त्यांच्या सहकारी वर्गाच्या माध्यमातून करण्यात आले. त्यानंतर तिनफाटा येथून वाद्यांच्या सुमधुर आवाजात वाजत गाजत मिरवणूक काढून आनंद उत्सव साजरा करण्यात आला. तसेच, सायंकाळी मरीआई हरिपाठ मंडळ भाकरवड यांचे, तर रात्री मरीआई प्रसादिक सेवा भजन मंडळ भाकरवड यांचे भजन पार पडले. हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी पाटील कुटुंब व महिला वर्गाचे मोलाचे सहकार्य लाभले.



• (छायाचित्र : नंदकुमार मरवडे)

### विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**खांब** : रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित चिल्हे येथील श्रमिक विद्यालयात दि.१४ जुलै रोजी साई फाऊंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई व नाईटिंगल चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई यांच्यावतीने शैक्षणिक साहित्य वाटप व मोफत ए.आय.एज्युकेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी साई फाऊंडेशन चॅरिटेबल ट्रस्ट मुंबईचे चेअरमन डॉ. असिफ कासकर, मुख्याध्यापक दिपक जगताप, तज्ज्ञ मार्गदर्शक संदेश गमरे, निर्मला नारायण, निता मॅडम, रोहित बांगर, रोहित टावरे, महेश तुपकर, दत्ता सानप, नरेश गायकर, हेमंत मालुसरे, मनोज थिटे, विष्णू भोईर, संतोष थिटे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप व पुढील कालावधीत विद्यार्थी वर्गासाठी घेण्यात येणाऱ्या मोफत एआय प्रशिक्षण शिक्षणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



### आयुष्मान भारत, आभा कार्ड शिबीर

**कोर्लई** : अदानी फाऊंडेशन दिघी पोर्ट लिमिटेड यांच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत श्रीवर्धन तालुक्यातील आदगाव ग्रामपंचायतीत मोफत आयुष्मान भारत कार्ड व आभा कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये गावातील वृद्ध व प्रौढ नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. शिबिरादरम्यान एकूण ४२ आयुष्मान भारत कार्ड, तसेच ९ आभा कार्ड तयार करण्यात आले. या उपक्रमामुळे पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या आरोग्य योजनांचा लाभ घेणे अधिक सुलभ होणार आहे. अदानी फाऊंडेशनच्या अरुंधती पिळणकर व सिद्धाली सुर्वे, तसेच आशा सेविका आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य अधिकारी यांनी उत्तम प्रकारे आयोजन करुन सक्रिय सहभाग घेत नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य केले. यावेळी अदानी फाऊंडेशनचे अवधूत पाटील यांनी, अशा समाजोपयोगी उपक्रमांमध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होऊन शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

### लहान मुलांना वस्तूंचे वाटप

**सुतारवाडी** : सामाजिक कार्यकर्ते संजय मुंबरे यांनी खा. सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ. जी.आर. राजे स्कूलमधील विद्यार्थ्यांना विविध प्रकारची २५ खेळणी दिली. सरपंच सुरेश जाधव, उपसरपंच कविता तटकरे, सूर्यकांत दळवी, दिलीप जांभळे, चिंतामण दळवी, सुरेंद्र भिंगारे, श्रीधर साठे, स्कूल कमिटी सदस्य नागेश दळवी, अरुणा शिर्के आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी स्कूलचे विश्वस्थ डॉ. रमेश राजे यांनी पाठविलेला शुभ संदेशाचे वाचन मुख्याध्यापक हरिश्चंद्र महाडिक यांनी केले. शाळेच्या शिक्षिका कविता भालेराव, शितल सानप तसेच मावशी सानिका मोरे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.



# स्कॉलरशिप अभ्यास वर्गाला सुरुवात



**| उरण | प्रतिनिधी |**

स्कॉलरशिप परीक्षेच्या उज्ज्वल निकालाची परंपरा असलेल्या साई ट्रस्ट जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राथमिक आणि माध्यमिक विद्यालयात इयत्ता चौथी आणि इयत्ता सातवीच्या स्कॉलरशिप अभ्यास वर्गाचे उद्‌घाटन साई मंगळवारी (दि.१४) ट्रस्टचे अध्यक्ष नरसू पाटील यांच्या हस्ते करण्यात आले

यावेळी शाळेचे प्रशासकीय अधिकारी रमाकांत गावंड, माध्यमिक विभाग मराठी माध्यमाचे मुख्याध्यापक गिरीश पाटील, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक भूषण जाधव, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक अंकुश जोगळे, बालोद्यान विभागाच्या मुख्याध्यापिका वैशाली बोरचटे आणि इयत्ता चौथी व सातवीचे स्कॉलरशिप विषय शिक्षक उपस्थित होते. हा स्कॉलरशिप अभ्यास वर्ग शाळेच्या वेळा व्यतिरिक्त १ तास अगोदर येऊन शिक्षक स्वतःचा जादा वेळ देऊन घेणार आहेत. अशाच प्रकारे इयत्ता दहावीचे इंग्रजी आणि मराठी माध्यमाचे शिक्षक अभ्यास वर्ग शाळेच्या वेळा व्यतिरिक्त १ तास अगोदर येऊन घेत आहेत. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये प्रचंड उत्साह आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील यांनी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रमा शिवाय पर्याय नाही, असे सांगताना स्कॉलरशिप मिळवण्यासाठी ध्येयवेडे व्हा, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

## कळंबोलीत रस्त्यांच्या विकासकामांना प्रारंभ

**कळंबोली** : परिसरातील अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या विविध काँक्रीट रस्त्यांच्या विकासकामांचे भूमिपूजन गुरुवारी (दि.१६) पनवेल पालिकेच्यावतीने संपन्न झाले. या विकासकामांमुळे परिसरातील वाहतूक अधिक सुरक्षित, सुलभ आणि गतिमान होणार आहे. या अंतर्गत हिंदुस्तान बँक चौक ते सरोवर सोसायटी व साईनगर सोसायटी या मुख्य मार्गाच्या काँक्रीटीकरणासह जोसेफ गल्ली, जय अपार्टमेंट गल्ली, मच्छी मार्केट गल्ली आणि पल्लवी गल्ली येथील रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाच्या कामांचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी उपमहापौर प्रमिला पाटील यांच्यासह नगरसेवक, अन्य मान्यवर, पदाधिकारी व स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# डोंगराळ भागात झाडांची लागवड

**| कर्जत | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील डोंगराळ परिसरात पर्यावरण संवर्धनासाठी रायगड हॉस्पिटल आणि तासगावकर ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य वृक्ष लागवड उपक्रम राबविण्यात आला. संपूर्ण डोंगर परिसराचे १०० टक्के वनीकरण करण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणावर मातीची धूप होत असल्याने पर्यावरणाचे संतुलन बिघडण्याची शक्यता निर्माण होत होती. ही धूप रोखण्यासाठी आणि परिसर हिरवागार करण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.वृक्ष लागवडीत ताम्हण, शिसव, चिंच, कुडा, करंज, बेहडा, पेरू, बांबू, बीटी, आवळा तसेच कोंकोरेस यांसारख्या विविध प्रजातींच्या झाडांचा समावेश करण्यात आला. या विविधतेमुळे परिसरात जैवविविधता वाढीस लागणार असून, दीर्घकालीन पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होणार आहे. डोंगराच्या उतारावर नियोजनबद्ध पद्धतीने झाडे लावल्याने मातीची धूप कमी होणार असून पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होईल. त्यामुळे भूजल पातळी सुधारण्यासही हातभार लागणार आहे. याशिवाय, या झाडांमुळे पक्षी व वन्यजीवांसाठी सुरक्षित अधिवास निर्माण होणार असून परिसरात नैसर्गिक समृद्धी वाढणार आहे.या उपक्रमात लावलेल्या झाडांचे संगोपन करण्यासाठी स्थानिक स्तरावर नियोजन करण्यात आले असून, नियमित पाणीपुरवठा व संरक्षणाची जबाबदारीही निश्चित करण्यात आली आहे.

## चांद्रयान–३ मोहिमेचा माहिती फलक

**| पनवेल | प्रतिनिधी |**

भारताच्या ऐतिहासिक चांद्रयान–३ मोहिमेला तीन वर्षे झाल्यानिमित्त करंजाडे येथील सेक्टर–५ ए परिसरात राष्ट्र प्रथम फाऊंडेशनच्यावतीने चांद्रयान–३ मोहिमेची माहिती देणाऱ्या फलकाचे अनावरण करण्यात आले. भारतीय अंतराळ संशोधन संस्थाच्या या अभिमानास्पद कामगिरीची माहिती नवीन पिढीपर्यंत पोहोचावी आणि विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, तंत्रज्ञान व संशोधनाबाबत उत्सुकता निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. दि.१४ जुलै २०२३ रोजी श्रीहरीकोटा येथील सतीश धवन स्पेस सेंटरमधून चांद्रयान–३ अवकाशात ड्रोपावले होते. त्यानंतर भारताने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वीपणे उतरणारा जगातील पहिला देश होण्याचा ऐतिहासिक मान मिळवला. या मोहिमेची माहिती विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना मिळावी, यासाठी राष्ट्र प्रथम फाऊंडेशनच्या माध्यमातून माहिती फलक उभारण्यात आला. यावेळी उपस्थितांनी सांगितले की, चांद्रयान–३ हे केवळ भारताच्या अंतराळ क्षेत्रातील यश नसून प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण आहे. या मोहिमेमुळे देशातील तरुणांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनाची आवड आणि नवकल्पनांची प्रेरणा निर्माण झाली आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना भविष्यात विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात योगदान देण्यासाठी प्रोत्साहन मिळेल.

## २३ वर्षीय युवक बेपत्ता

**पनवेल** : तालुक्यातील रोडपाली येथील सागर समीन हुसेन (२३) हा घरातून बाहेर पडला. त्यानंतर तो परत आलाच नाही. त्याची उंची सुमारे ५ फूट ८ इंच, बांधा मध्यम, रंग सावळा, चेहरा गोल, केस काळे व भुवया दाट आहेत. त्याच्या उजव्या हातावर इंग्रजीमध्ये सी अक्षराचा टॅटू असून, डाव्या हातावर कोरियन भाषेतील काही शब्द गोंदलेले आहेत. घरातून बाहेर पडताना त्याने पिवळ्या रंगाचा टी–शर्ट आणि काळ्या रंगाची फुल पॅन्ट परिधान केली होती.



# रायगडमध्ये उद्योजकतेचे नवे पर्व



**| माणगाव | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता, नवोपक्रम आणि स्टार्टअप संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी माणगावचे डी. जी. तटकरे महाविद्यालय आणि वायफाय फाऊंडेशन इन्क्युबेशन एनपीओ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे महाविद्यालयात उद्योजकता, नवोपक्रम आणि स्टार्टअप उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्यात येणार असून, उद्योग–अकादमिक सहकार्याला नवी दिशा मिळणार आहे.

स्वर्गीय आमदार अशोक साबळे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे या उद्देशाने संस्थेची स्थापना केली. संस्थेचे अध्यक्ष मा. ॲड. राजीव साबळे यांच्या नेतृत्वाखाली संस्था शिक्षण, संशोधन, नवोपक्रम आणि विद्यार्थी विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहे. सामंजस्य कराराअंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी, माजी विद्यार्थी, संशोधक तसेच रायगड जिल्ह्यातील इतर महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना स्टार्टअप इन्क्युबेशन, उद्योजकता विकास, उद्योग तज्ज्ञांचे मार्गदर्शन, कौशल्य विकास, करिअर मार्गदर्शन, इंटर्नशिप, बौद्धिक संपदा हक्क व पेटंट सहाय्य, कंपनी नोंदणी, व्यवसाय आराखडा तयार करणे, गुंतवणूकदार जोडणी, निधी उभारणी आणि शासकीय योजनांविषयी मार्गदर्शन अशा विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

# नवी मुंबईत रंगणार 'झूम' जल्लोष



**| पनवेल | प्रतिनिधी |**

नवी मुंबईत यंदा कला, संस्कृती आणि सामाजिक बांधिलकीचा अनोखा संगम अनुभवायला मिळणार आहे. "झूम २०२६" या डान्स शोसह इंडिया प्राईड अवॉर्डस या प्रेरणादायी पुरस्कार सोहळ्याची घोषणा करण्यात आली असून, या दोन्ही उपक्रमांबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. दि. २२ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात येणारा झूम हा केवळ नृत्याचा कार्यक्रम नसून, समाजाला सकारात्मक संदेश देणारा आणि कला व समाजसेवा यांची सांगड घालणारा उपक्रम असल्याचे आयोजकांनी सांगितले. या कार्यक्रमाचे मुख्य आयोजन डेनीप्रीत कौर यांच्या नेतृत्वाखाली होत असून, विविध डान्स अकॅडमी, कलाकार आणि नवोदितांना मोठे व्यासपीठ मिळणार आहे. त्याचबरोबर इंडिया प्राईड अवॉर्डसच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, उद्योग, कला, क्रीडा, समाजसेवा, महिला सक्षमीकरण, युवा नेतृत्व अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात येणार आहे.

## कोमल भोईर यांना मानद डॉक्टरेट

**| पनवेल | प्रतिनिधी |**

समाजातील गरजू, वंचित आणि दुर्बल घटकांच्या सेवेसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या कोमल भोईर यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत "व्हिजनरी डॉक्टरेट ऑनर इन सोशल वर्क" हा प्रतिष्ठेचा मानद डॉक्टरेट सन्मान प्रदान करण्यात आला आहे. विविध सामाजिक उपक्रमांद्वारे मानवतेची सेवा, समाजाप्रती असलेली निष्ठा आणि लोककल्याणासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची नोंद घेऊन हा सन्मान बहाल करण्यात आला आहे. कोमल मोहनिश भोईर यांनी अनेक वर्षांपासून गरजू कुटुंबांना मदतीचा हात देणे, पूरग्रस्तांना मदत, दिव्यांगांना व्हीलचेअर वाटप, आर्थिकदृष्ट्या दुर्बल मुलांना शैक्षणिक सहाय्य, महिलांसाठी आरोग्य जनजागृती उपक्रम, तसेच विविध सामाजिक कार्यातून समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे. समाजहितासाठी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेत त्यांना हा मानाचा सन्मान प्रदान करण्यात आला आहे.



## अपघातातील जखमीचा मृत्यू

**| पनवेल | प्रतिनिधी |**

रामदुलारे गुप्ता हे तळोजा परिसरातील रिद्धी सिद्धी सोसायटीत सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत होते. ते वडापाव खरेदी करण्यासाठी गेले होते. त्याचवेळी मोटारीने वडापावच्या हातगाडीला जोरदार धडक दिली. त्यामुळे कढईतील गरम तेल त्यांच्या अंगावर उडाल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती तळोजा पोलिसांनी दिली. या प्रकरणात विद्यार्थी अरफात साबीर पटेल याला अटक केली होती.

## विनोद मोरे यांच्या कार्याचा सन्मान | समाजमाध्यमांतून शुभेच्छांचा वर्षाव

# अंधारात उजेड घेऊन धावणारा देवदूत

**| माणगाव | प्रतिनिधी |**

एखादा कर्मचारी कार्यालयीन वेळ संपली की आपले कर्तव्य संपल्याचे मानतो. पण काही माणसे अशी असतात की त्यांच्यासाठी घड्याळाचे काटे, दिवस–रात्र, पाऊस–वारा किंवा स्वतःचा थकवा यांना काहीच महत्त्व नसते. जनतेच्या चेहऱ्यावरचा दिलासा आणि अंधारात बुडालेल्या घरात पुन्हा उजेड पाहण्याचे समाधान हेच त्यांच्या कामाचे खरे बक्षीस असते. माणगाव शहरातील नाणोरे येथील महावितरण कर्मचारी विनोद मोरे यांनी आपल्या संपूर्ण सेवाकाळात याच सेवाभावाचे जिवंत उदाहरण घालून दिले आहे. त्यांच्या गौरव करणाऱ्या शेकडो शुभेच्छा आणि कृतज्ञतेच्या संदेशांनी समाजमाध्यमे भरून गेली आहेत. अनेकांनी त्यांना "कर्तव्याचा खरा योद्धा", "जनतेचा आधारवड" आणि "अंधारात उजेड घेऊन धावणारा देवदूत" अशा शब्दांत अभिवादन केले आहे.



वीजपुरवठा खंडित होणे म्हणजे केवळ दिवे बंद होणे नव्हे; तर एखाद्या घरातील आजारी व्यक्तीची चिंता, अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची अडचण, शेतकऱ्यांच्या मोटारी बंद पडणे, लहान मुलांचा त्रास आणि व्यापाऱ्यांचे नुकसान. अशा प्रत्येक संकटाच्या क्षणी नागरिकांचा एक फोन आला की, विनोद मोरे क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी पोहोचत असत. मुसळधार पावसात, काळ्याकुट्ट अंधारात, वादळी वाऱ्यांमध्ये किंवा मध्यरात्रीही त्यांनी कधीही कर्तव्यापासून पाऊल मागे घेतले नाही. अनेकदा विशेषतः पावसामुळे पुरपरीस्थितीत आपल्या जीवाला धोका असतानाही त्यांनी खांबावर चढून, तुटलेल्या तारा दुरुस्त करून आणि बिघाड शोधून वीजपुरवठा सुरळीत केला. त्यांच्या चेहऱ्यावर कधीही तक्रारीचा भाव नव्हता. घराघरात पुन्हा लागलेला दिवा हेच त्यांच्या मेहनतीचे सर्वात मोठे पारितोषिक होते.

आज सामाजिक माध्यमांवर त्यांच्या कार्याचा होत असलेला गौरव हा केवळ एका कर्मचाऱ्याच्या सेवेचा सन्मान नाही; तर निस्वार्थ लोकसेवा, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठेच्या मूल्यांचा गौरव आहे. आजच्या स्वार्थी आणि स्पर्धेच्या युगात प्रामाणिकपणा, सेवाभाव आणि कर्तव्यनिष्ठा हीच खरी संपत्ती असल्याचे विनोद मोरे यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले. त्यांनी असंख्य घरांमध्ये उजेड दिला, पण त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे त्यांनी हजारो नागरिकांच्या मनात विश्वास, आपुलकी आणि माणुसकीचा दिवा कायमचा प्रज्वलित केला.

# स्त्री शक्तीच्या पाठपुराव्याला यश

**| पनवेल | प्रतिनिधी |**

कळंबोली सेक्टर–५ ई मधील ओंकार ओनर्स असोसिएशन परिसरात उघड्यावर पडून असलेली धोकादायक वीज केबल अखेर जमिनीत टाकण्यात आली आहे. स्त्री शक्ती फाऊंडेशन व विजया कदम यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे महिनाभर रखडलेले हे काम पूर्ण झाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. महावितरणने सुमारे महिनाभरापूर्वी या परिसरात नवीन वीज केबल टाकली होती. मात्र, ही केबल जमिनीत पुरण्याऐवजी रस्त्यावरच उघडी ठेवण्यात आली होती. त्यामुळे नागरिकांना ये–जा करताना मोठा अडथळा निर्माण होत होता. त्यातच उंदरांनी केबल कुरतडल्याने पावसाळ्यात वीज प्रवाहामुळे अपघात होण्याचा धोका निर्माण झाला होता. या गंभीर समस्येबाबत रहिवाशांनी महावितरणकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याची नाराजी व्यक्त केली जात होती. दरम्यान, येथील रहिवासी गणेश रणदिवे यांनी ही बाब विजया कदम यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर त्यांनी स्थानिक वीज कर्मचारी तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सलग आठ दिवस सातत्याने पाठपुरावा केला.



## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाच्या कामांना गती येईल. ज्येष्ठांचा सल्ला ध्यानी घ्यावा. अतिआत्मविश्वास टाळायला हवा.
- **वृषभ** : महत्त्वाचे निर्णय घाईने घेऊ नये. कलाकारांना उत्तम संधी लाभतील. वाढता खर्च कमी करावा.
- **मिथुन** : कामाचं योग्य नियोजन करावं. शारीरिक तक्रारींची वेळीच दखल घ्या. वाहन सौख्य लाभेल.
- **कर्क** : जुनी येणी रखडतील. महत्त्वाचे करार तुर्तास करू नयेत. शिक्षण, क्रीडा क्षेत्रात संधी लाभतील.
- **सिंह** : कौटुंबिक वाद-विवाद संभवतात. भागीदारी व्यवसायात काळजी घ्यावी. मानसिक ताण राहील.
- **कन्या** : अंगभूत कला-गुणांना वाव मिळेल. विद्यार्थ्यांची अपेक्षित प्रगती होईल. धनलाभाचे योग आहेत.
- **तूळ** : परिश्रम आणि सातत्य कामी येईल. जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.
- **वृश्चिक** : मनाजोग्या संधी लाभतील. आर्थिक स्थिती उत्तम राहील. धार्मिक कार्याचं समाधान लाभेल.
- **धनु** : इतरांच्या वादात मध्यस्थी नको. नोकरीत सहकाऱ्यांशी जमवून घ्या. बेरोजेगारांना दिलासा मिळेल.
- **मकर** : खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. प्रतिकूलतेतून मार्ग निघेल. नव्या विचारांना चालना मिळेल.
- **कुंभ** : थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. प्रवासाचे बेत लांबणीवर टाकावे. प्रक्रिया उद्योगात संधी लाभतील.
- **मीन** : आत्मविश्वास वाढवणाऱ्या घटना घडतील. हितशत्रूंवर मात कराल. घराच्या कामाकडे लक्ष द्यावं.

स्टाईल स्टेटमेंट

## फॅशन मिक्स अँड मॅचची

फॅशनविश्वात सतत बदल होत असतात. एखादा पेहराव काही काळानंतर आउटडेटेड होतो. वॉर्डरॉबमध्ये पडून रहातो. मग नव्या कपड्यांच्या खरेदीची लगबग सुरू होते. नवा लूक मिळवण्याच्या धडपडीत बराच खर्च होऊन बसतो. पण मिक्स अँड मॅचचं तंत्र अवगत केलं तर तुम्ही जुन्या कपड्यांमध्येच ट्रेंडी दिसू शकता.

✻ वेगवेगळ्या प्रिंट्सचे कपडे तुम्ही कॅरी करू शकता. प्रिंट्सवर प्रिंट्स चांगल्या दिसत नाहीत असा सर्वसाधारण समज आहे. मात्र प्रत्यक्षात तुम्ही प्रिंटेड बॉटमवर प्रिंटेड कुर्ता किंवा टॉप घालू शकता. इतकंच नाही तर एकाच पद्धतीच्या प्रिंट्स एकत्र कॅरी करू शकता. पण या प्रिंट्सचं बॅलन्सिंग तुम्हाला जमलं पाहिजे. उदाहरणार्थ टॉपवर मोठे, बटबटीत प्रिंट्स असतील तर बॉटमवरचे प्रिंट्स छोटे किंवा सौम्य असावेत. आता पोल्का डॉटवाला टॉप आणि स्कर्ट घालायचा असेल तर टॉपवरचे डॉट्स छोटे आणि स्कर्टवरचे मोठे असं कॉम्बिनेशन करता येईल. (क्रमश:)

## १७ जुलै

दिन विशेष

**२०१२** : ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्त्या मृणाल गोरे यांचा मृत्यू.
**२०१३** : ज्येष्ठ स्त्रीवादी लेखिका माधवी देसाई यांच्यावर शहापूर येथे अंत्यसंस्कार.
**२०१७** : उपराष्ट्रपतीपदासाठी एनडीएकडून व्यंकय्या नायडूंची उमेदवारी घोषित.
**२०१८** : जागतिक अर्थव्यवस्थेवर मंदीचे सावट असून पुढील वर्ष संपण्याआधी जगाला मंदीला सामोरे जावे लागेल, असा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा अंदाज.

सफर देशांची

## इथे नांदतात स्थलांतरित पक्षी

मॉरिटानिया हा उत्तर-पश्चिम आफ्रिकेतला देश आहे. 'नौआकचॉट' ही या देशाची राजधानी. हे शहर अटलांटिक महासागराच्या किनारी वसलं आहे. या देशाचा बराचसा भूभाग सपाट आणि वाळवंटी आहे. मॉरिटानियामध्ये मुबलक नैसर्गिक साधनसंपत्ती आढळते. पण इथले लोक गरीब आहेत. इथली बरीच मोठी लोकसंख्या उदरनिर्वाहासाठी शेती आणि पशुपालनावर अवलंबून आहे. अल्जेरिया, माली आणि सेनेगल हे याचे शेजारी देश आहेत. अरबी ही मॉरिटानियाची प्रमुख भाषा. या देशात लोह मोठ्या प्रमाणावर आढळतं. २००१ मध्ये इथे खनिज तेलाचा शोध लागला. या देशाला ७५४ किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. या देशात दोन राष्ट्रीय उद्यानं आहेत. 'बँक डि आर्ग्युइन' हे इथलं सर्वात मोठं राष्ट्रीय उद्यान आहे. फ्लेमिंगोंसह अनेक स्थलांतरित पक्षी इथे येत असतात. . उत्तर युरोप, सायबेरिया आणि ग्रीनलँडमधून येणारे पक्षी काही काळ इथे रहातात. म्हणूनच या राष्ट्रीय उद्यानाचा समावेश युनेस्कोने जागतिक वारसा यादीत केला आहे. फुटबॉल हा या देशातला लोकप्रिय खेळ आहे. १९६० मध्ये या देशाला स्वातंत्र्य मिळालं. मॉरिटानियावर एकेकाळी फ्रान्सचं राज्य होतं.

### पंचांग

**शुक्रवार, १७ जुलै २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८, आषाढ शु. ३/४, चंद्रराशी : सिंह, नक्षत्र : मघा, योग : व्यतिपात, सूर्योदय ६.१२ सूर्यास्त ७.१७

### फॉरवर्ड्स

**बहुत ख़्याल ऱखते हैं वो अपनें दिल क़ा...**

**इधर नहीं लगता तो उधर लगा लेते हैं...!**

आरोग्यमंत्र

## रातआंधळेपणा

डोळ्याच्या अंतभार्गात रेटीना किंवा दृष्टिपटल असते. त्यात काही वैशिष्ट्यपूर्ण पेशी असतात. या पेशींना 'कोन व रॉड' असे म्हणतात. त्यापैकी कोन हे उजेडातील दृष्टीसाठी तसेच वस्तूचा आकार, रंग याचे ज्ञान होण्यासाठी आवश्यक असतात. रॉड हे अंधारातील दृष्टीसाठी आवश्यक



असतात. रॉडमध्ये होडोप्सीन नावाचे रंगद्रव्य असते. याची निर्मिती जीवनसत्त्व 'अ' पासून होत असते. उजेडात होडोप्सीनचे रूपांतर जीवनसत्त्व 'अ' मध्ये, तर अंधारात जीवनसत्त्व 'अ' चे रूपांतर होडोप्सीनमध्ये होते. अंधारात दिसण्यासाठी होडोप्सीन निर्माण होणे महत्त्वाचे आहे. जीवनसत्त्व 'अ'च्या अभावामुळे होडोस्पीनची निर्मिती कमी प्रमाणात होते व साहजिकच अंधारातील दृष्टीवर विपरीत परिणाम होतो. जीवनसत्त्व 'अ'चा अभाव विशेषेकरून सहा वर्षांपर्यंतच्या मुलांमध्ये जास्त प्रमाणात आढळून येतो. अशी मुले सायंकाळी चाचपडत चालतात. आवाजाचा कानोसा घेऊन चालायचा प्रयत्न करतात व वस्तूंना अडखळून पडतात. यालाच 'रातांधळेपणा' असे म्हणतात. रातांधळेपणा येणे ही जीवनसत्त्व 'अ'च्या अभावामुळे होणाऱ्या दुष्परिणामाची फक्त सुरुवात असते. जीवनसत्त्व 'अ'चा पुरवठा न झाल्यास डोळ्यातील आवरण कोरडे पडून त्यावर व्रण पडतो. शेवटी डोळ्यात फूल वा टीक पडू शकते. अत्यंत गंभीर स्वरूपाच्या आजारात डोळा पूर्णपणे खराब होऊन अंधत्व येते.

### फिटनेस फंडा

उद्यापासून व्यायाम सुरू करू असं म्हणणाऱ्यांचा उद्या कधीच येत नाही. सकाळी उठून जीममध्ये जाणं तुमच्यासाठी खूप मोठं आव्हान आहे का? सकाळी मस्त ताणून द्यायची, आराम करायचा असं तुम्हाला वाटत असेल तर लवकर जागे व्हा. सकाळी उठून व्यायामाला सुरूवात करा.

✻ सोशल मीडियावर काही वेळ घालवल्याशिवाय झोप येत नसेल तर तुम्हाला ही सवय बदलायला हवी. सोशल मीडियामुळे तुमचं वजन कमी होणार नाही. मात्र जीममध्ये घाम गाळल्यामुळे तुम्ही नक्कीच फिट व्हाल. (क्रमश:)

करिअरवाटा

## समोरच्याशी बोलताना...

जगाने आपल्यावर विश्वास ठेवावा असं वाटत असल्यास आधी आपला स्वत:वर दृढविश्वास असायला हवा. तो व्यक्त करण्याचे योग्य मार्ग अवलंबायला हवे. उदाहरणार्थ तुम्ही कशाप्रकारे हस्तांदोलन करता यावरुनही तो व्यक्त होत असतो. तुम्ही केलेल्या हस्तांदोलनातून



समोरच्या व्यक्तीला एक प्रकारचा विश्वास मिळणं गरजेचं असतं. त्यादृष्टीने योग्य पध्दतीनं हस्तांदोलन कसं करावं, हे जाणून घ्यायला हवं. हस्तांदोलन करताना तुमचा हात एकदम सैल नसावा किंवा तुम्ही समोरच्या व्यक्तीचा हात फार जोरात दाबता कामा नये. या दोन्ही बाबी तुमच्याविषयी समोरच्या व्यक्तिच्या मनात प्रतिकूल भावना निर्माण करणाऱ्या ठरु शकतात. ताठ उभं राहणं किंवा खुर्चीत ताठ बसणं याही बाबी महत्त्वाच्या आहेत. कारण यातूनही आत्मविश्वास प्रतित होत असतो. समोरच्या माणसाशी बोलताना अकारण हात-पाय हलवू नये. यातून तुमच्यावर काही ताण आहे, असा अर्थ निघतो. समोरच्या व्यक्तिशी संवाद साधताना भरभर बोलू नये. तुम्ही काय बोलत आहात नीट कळायला हवं. अर्थात अगदी सावकाशही बोलू नये. कारण या दोन्ही गोष्टीतून तुमच्यात आत्मविश्वास कमी असल्याचं प्रतित होतं.

खेचाखेची

## पहिली तंदूर भट्टी

**बंडू** : मास्तर, आपल्या गावात पहिली तंदूर भट्टी कोणत्या ढाब्यावर लावली?
**मास्तर**: मला कसं माहित असेल?
**बंडू**: तुम्हाला पहिली तंदूर भट्टी माहित नाही, तर आम्हाला देशातली पहिली अणुभट्टी कुठे लागली, हे का विचारता?
**मास्तर** : अरे गाढवा, मी काय रोज ढाब्यावर जातो का? मला कसं माहित असेल?
**बंडू** : मग आम्ही काय दररोज अणुभट्टीवर जातो का शेकोटी शेकोटी खेळायला?

### वेगळं काही

चीनमधल्या वुहान शहरातल्या एक लाँड्रीने एक चिप बसवायचं ठरवलं. यामुळे चादर किंवा कोणताही कपडा कधी धुतला हे त्यांना कळू शकतं. टॉवेल आणि गाद्यांमध्येही ही चिप बसवण्यात आली आहे. ही चिप कपड्याच्या कडेला बसवली जाते. त्यावर क्यूआर कोड आहे. हा कोड मोबाईलद्वारे स्कॅन करता येतो. यानंतर सगळी माहिती मोबाईलवर झळकते. ही चिप वॉटरप्रूफ आहेच शिवाय ती उच्च तापमानातही काम करते. कपडे धुतल्यानंतरही चिप खराब होत नाही. संबंधित लाँड्री विविध हॉटेल्स तसंच हॉस्टेल्सना सेवा देते. त्यामुळे कोणती चादर कधी धुतली हे जाणून घेणं त्यांना आवश्यक असतं. चीनमध्ये सध्या या चिपची चर्चा सुरू आहे.

गेट रेडी

## पार्टीमध्ये उठून दिसायचंय?

समारंभासाठी तयार होताना हातात वेळ कमी असेल तर काही फंडे अजमावता येतात. उदाहरणार्थ नेलपेंट लवकर सुकवायचं असेल तर भांड्यात बर्फ घालून त्यात हात बुडवून ठेवावे. त्यामुळे न फिसकटता नेलपेंट लवकर सेट होतं. फाउंडेशन लावताना ड्रेसच्या नेक लाईनवर डाग पडतात. यावर उपाय म्हणून या ठिकाणी थोडसं शेव्हिंग क्रीम चोळावं. डाग लगेच निघून जातात. सध्या निसर्गाशी साधर्म्य साधणाऱ्या ज्वेलरीचा ट्रेंड आहे. त्यामुळे तयार होताना तुम्हीही अशा ज्वेलरीचा पर्याय समोर ठेवू शकता. इअररिंगमध्ये लीफ ड्रॉप एअररिंग्ज ट्रेंडमध्ये आहे. एलिगंट लूक देणाऱ्या कफ बॅगल्सही तुम्ही घालू



शकता. याला मॅच करणारी लीफ रिंग कोणत्याही आउटफिटवर खुलून दिसते. त्यामुळे तुम्ही अशा अंगठीची निवड करु शकता. प्रत्येक समारंभासाठी नवे कपडे घेण्यापेक्षा वापरात नसणाऱ्या साड्यांचे ड्रेस शिवून त्यावर हेवी वर्क असणारे दुपट्टे घेतले तर तुम्हाला वेगळाच लूक मिळून जातो. कोणत्याही टॉप किंवा चोलीवर हेवी लेहंगा घालण्यापेक्षा तो शर्टसोबत मॅच केल्यास वेगळा लूक मिळतोच शिवाय तुम्ही पार्टीमध्ये उठून दिसता.

## सुडोकू १२८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ६ | | ९ | २ | ३ | | १ |
| | ८ | | | | ७ | | | ९ |
| २ | | | | ८ | | | | ५ |
| ३ | ५ | | | | | ८ | | ६ |
| ६ | | | | ५ | | | | ७ |
| ८ | | ९ | | | | | २ | ४ |
| ९ | | | | ४ | | | | ३ |
| १ | | | ६ | | | | ४ | |
| ४ | | ५ | ८ | ३ | | ७ | | |

**टीप -**
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १२७ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ९ | ३ | ४ | ५ | १ | ७ | २ | ६ |
| ५ | ७ | ६ | २ | ९ | ८ | ४ | १ | ३ |
| १ | २ | ४ | ६ | ७ | ३ | ९ | ८ | ५ |
| ६ | ८ | ९ | ५ | ३ | २ | १ | ४ | ७ |
| ७ | १ | २ | ९ | ४ | ६ | ५ | ३ | ८ |
| ३ | ४ | ५ | ८ | १ | ७ | ६ | ९ | २ |
| २ | ६ | १ | ७ | ८ | ४ | ३ | ५ | ९ |
| ९ | ३ | ७ | १ | २ | ५ | ८ | ६ | ४ |
| ४ | ५ | ८ | ३ | ६ | ९ | २ | ७ | १ |

## शब्दकोडे क्रमांक १२८



**आडवे शब्द :-**
१) भारताचे पहिले पंतप्रधान
९) पाप वाईट कृत्ये जाळण्याचा सण
१०) पराभव
११) दारुचा एक प्रकार
१२) कोलकाताचे विमानतळ
१४) आयुष्य
१६) सर्पाच्या मस्तकातील मणि
१७) खोड, दुर्गुण
२०) पाणी उकळताना होणारा आवाज
२२) भिवविण्यासाठी मोठ्याने केलेली गर्जना
२४) ठेकेदार
२५) जा-ये असणे, राबता
२७) मंत्रीमंडळ
२८) बाजार
२९) गोमाता
३०) पुष्कळ
३१) आठवणी (हिं )
३२) नवग्रहातील शेवटचे दोन ग्रह
३४) शरीर
३५) तादाम्य, एकरूप
३८) खेकसणारा, तोंडाळ
४०) नृत्य करणारा शंकर
४३) पाकळी, सैन्याचा भाग
४५) ब्राह्मण
४६) सततची हालचाल
४८) ताजमहालचा दगड
५१) उगाच
५२) गळणारा
५३) जेमेतेम
५५) पुष्कळ
५७) शहर, गाव
५९) लोकमत
६१) माझा
६३) ग्रहण करणे, जाणणे
६४) साधणारा, साधना करणारा
६५) सर्वस्व
६८) तालीम करणारा मल्ल
७०) पर्वत
७१) सिंह
७२) तोटी
७३) संभाळ, रक्षण

**उभे शब्द :-**
१) शिक्षक
२) तृष्णा
३) पैठणीतील सोन्याचा धागा
४) युद्धातील एक घोषणा
५) खरकट्याचा ढीग
६) भयाने थरथरणे
७) गोंधळून जाणे
८) घरातील खोली (इं )
९) यज्ञ
१३) वाघसिंहाची गर्जना
१५) बारा महिन्याचा काळ
१८) रवाळ (तूप)
१९) अस्वास्थ्य आजार
२१) काढलेली सुट्टी
२३) अफूचे बी
२४) शरीरावरील न दिसणारा मार
२६) काहीही करून
३०) अत्तराचा बोळा
३२) पौर्णिमा
३३) नुकसान, तोटा
३४) नेत्रांजन
३६) मनाला आलेला थकवा
३७) राजसभा, वरिष्ठ न्यायालय,
३९) पिठाची गिरणी
४१) अत्यंत तिखट मसालेभात
४२) रांग
४४) चटकन
४५) च्या शिवाय
४७) प्रिय, नवरा
४८) संयुक्त विचार
४९) घर(हिं )
५०) वसुमती, वसुंधरा
५१) वीस ही संख्या
५४) पाणकोंबडा
५६) रक्षण करणारे सशस्त्र शिपाई
५८) आकाश
५९) प्रजा
६०) वांतीपूर्वीची स्थिती
६२) चिंतन
६३) चेहरा, मुख
६४) शोभणारा
६६) नंतर
६७) नवरा
६९) नम्र, वाकलेला

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रा | वा | चा | रं | क | हो | णे | | नि | वा | र | क | | ख | ग |
| स | ट | | ज | ळ | का | | मी | रा | | वा | स | मा | र | णे |
| ग | | त | न | | र | स | | का | पा | | दा | | व | श |
| र | ब | र | | पा | | म | क | र | | घो | र | प | ड | |
| बा | ट | | का | ल | ह | र | ण | | आ | ड | | ळ | | सं |
| | ब | ळ | क | ट | | स | ख | ल | | न | गा | स | न | ग |
| पा | टी | | वी | | अ | | र | व | र | व | णे | | व | ण |
| रा | त | वा | | अ | व | नि | | क | च | रा | | म | जा | क |
| वा | | र | जा | चा | ग | ज | क | र | णे | | अं | दा | ज | |
| र | ज | क | | न | त | | स | | | सा | ग | र | | ख |
| | प | री | क्ष | क | | प | र | त | प | र | त | | आ | वा |
| बा | त | | मा | | ना | र | | ग | य | | पं | क | ज | |
| प | प | ई | | ज | का | त | दा | र | | पा | ग | ल | | प्र |
| जा | | श्व | स | न | | वे | स | | ग | व | त | | वी | णा |
| दे | व | र | | न | व | ल | | अं | ज | न | | श | र | म |

## फिफा फुटबॉल वर्ल्डकप

# अर्जेंटिना अंतिम फेरीत



इंग्लंडला 2-1 हरवले



मेस्सीचे दोन पास, फर्नांडिज-मार्टिनेजचे गोल

**। अटलांटा । वृत्तसंस्था ।**

फुटबॉल विश्वचषकात अर्जेंटिनाने पुन्हा एकदा सिद्ध केले की त्याला गतविजेता का म्हटले जाते. अटलांटा येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या उपांत्य फेरीत संघाने शेवटच्या ७ मिनिटांत दोन गोल करून इंग्लंडला २-१ ने हरवले. या विजयासह अर्जेंटिना सलग दुसऱ्यांदा विश्वचषक अंतिम फेरीत पोहोचला.

उपांत्य फेरीच्या सामन्याच्या ८५व्या मिनिटापर्यंत इंग्लंड १-० ने आघाडीवर होता. अँथनी गॉर्डनच्या गोलमुळे संघ अंतिम फेरीकडे वाटचाल करत असल्याचे दिसत होते. पण यानंतर लिओनेल मेस्सीने सामन्याचे चित्रच बदलले. त्याच्या शॉर्ट कॉर्नरवर एन्झो फर्नांडेझने २५ यार्डवरून शानदार गोल करून स्कोअर १-१ केला. त्यानंतर इंजुरी टाइमच्या दुसऱ्या मिनिटात मेस्सीच्या अचूक क्रॉसवर बदली खेळाडू लॉटारो मार्टिनेझने हेडरने गोल करून विजय मिळवून दिला.

सामन्याच्या सुरुवातीपासूनच हे स्पष्ट झाले होते की हा सामना केवळ फुटबॉलचा नाही. तिसऱ्याच मिनिटात इंग्लंडच्या इलियट अँडरसनवर टॅकल केल्यानंतर दोन्ही संघांचे खेळाडू समोरासमोर आले. रेफरी इस्माईल एलफाथ यांना मध्यस्थी करावी लागली. संपूर्ण पहिल्या हाफमध्ये खेळाडू अनेकदा भिडले आणि फाऊलची संख्या खूप जास्त होती.५५व्या मिनिटाला इंग्लंडने सामन्यातील पहिला गोल केला. हॅरी केनच्या लांब पासवर अर्जेंटिनाचा बचाव पूर्णपणे क्लिअरन्स करू शकला नाही. डेक्लन राईसने चेंडू मॉर्गन रोजर्सला दिला. रोजर्सने उजव्या बाजूने अचूक क्रॉस टाकला, ज्यावर अँथनी गॉर्डनने बॉक्समधून सहज गोल केला. हा स्पर्धेतील गॉर्डनचा पहिला गोल होता आणि इंग्लंड १-० ने आघाडीवर होता.

गोल खाल्ल्यानंतर अर्जेंटिनाने आक्रमक खेळायला सुरुवात केली. संघाला ८६व्या मिनिटाला कॉर्नर मिळाला. लिओनेल मेस्सीने शॉर्ट कॉर्नर खेळून चेंडू एन्झो फर्नांडिजला दिला. फर्नांडिजने सुमारे २५ यार्ड अंतरावरून शॉट मारला. चेंडू खेळाडूंच्या मधून जात थेट जाळ्यात घुसला. या गोलमुळे स्कोअर १-१ असा बरोबरीत आला. इंजरी टाइममध्ये मेस्सीने पुन्हा कमाल केली. त्याने उजव्या बाजूने चेंडू बॉक्समध्ये पाठवला. बदली स्ट्रायकर लॉटारो मार्टिनेझ बचावपटूंना मागे टाकून शानदार हेडरद्वारे चेंडू गोलमध्येपोहोचवला. अर्जेंटिनाने पाच मिनिटांत सामना फिरवत २-१ अशी आघाडी घेतली.

### सलग दुसऱ्या विश्वचषक अंतिम फेरीत स्कालोनी

अर्जेंटिनाच्या प्रशिक्षक लिओनेल स्कालोनी सलग दुसऱ्या विश्वचषक अंतिम फेरीत पोहोचणारे इतिहासातील सातवे प्रशिक्षक बनले. त्यांच्यापूर्वी ही कामगिरी फक्त विटोरियो पोझो, हेल्मुट शॉन, मारिओ जागालो, कार्लोस बिलार्डो, फ्रांझ बेकेनबाऊर आणि डिडिएर डेशां यांनी केली होती.

### अर्जेंटिना पहिल्यांदाच सलग दोनदा अंतिम फेरीत

२०२२ मध्ये चॅम्पियन बनल्यानंतर अर्जेंटिनाने २०२६ मध्येही अंतिम फेरीत स्थान मिळवले. संघ इतिहासात पहिल्यांदाच सलग दोन विश्वचषक अंतिम सामने खेळेल. अर्जेंटिनाने विश्वचषक इतिहासात आपला सहावा उपांत्य सामना खेळला आणि प्रत्येक वेळी विजय मिळवला.



### हॅरी केन सर्वाधिक सामने खेळणारा आऊटफिल्ड खेळाडू बनले

अर्जेंटिनाविरुद्ध मैदानात उतरताच हॅरी केनने इंग्लंडसाठी १२१ वा सामना खेळला. त्याने वेन रुनीला मागे टाकून इंग्लंडसाठी सर्वाधिक सामने खेळणारा आऊटफिल्ड खेळाडू बनला. एकूणच, त्याच्या पुढे फक्त गोलकीपर पीटर शिल्टन (१२५ सामने) आहे.

## निवडक

### चेस वर्ल्ड कप स्पर्धेचे स्वरूप बदलले

**पॅरिस** : जगातील सर्वात मोठ्या बुद्धिबळ स्पर्धेचे, फिडे वर्ल्ड कपचे स्वरूप पुढील वर्षापासून पूर्णपणे बदलले जाईल. आता सुरुवातीपासून नॉकआउट सामने होणार नाहीत. आधी सर्व खेळाडू स्विस लीग खेळतील. त्यानंतर फक्त टॉप-१६ खेळाडू नॉकआउटमध्ये पोहोचतील. यामुळे खेळाडूंना अधिक सामने खेळण्याची संधी मिळेल. आतापर्यंत फिडे वर्ल्ड कप पूर्णपणे नॉकआउट फॉरमॅटमध्ये खेळला जात होता. २०२७ पासून त्याची सुरुवात स्विस प्रणालीने होईल. ओपन गटात २२४ आणि महिला गटात १२८ खेळाडू भाग घेतील. ओपन गटातील खेळाडूंना ५६-५६ च्या ४ गटांमध्ये विभागले जाईल. प्रत्येक खेळाडू ९ फेऱ्या खेळेल. त्यानंतर प्रत्येक गटातील टॉप-४ खेळाडू नॉकआउटच्या राउंड ऑफ-१६ मध्ये पोहोचतील. महिला गटात दोन गट असतील आणि प्रत्येक गटातून ८ खेळाडू पुढे जातील. पहिला विश्वचषक सुमारे चार आठवडे चालत असे. अनेक खेळाडू पहिले दोन सामने हरून बाहेर पडत असत, तर काही खेळाडूंना जवळपास एक महिना खेळावे लागत असे. फिडेचे मत आहे की इतकी लांब स्पर्धा खेळाडू आणि आयोजक दोघांसाठीही कठीण झाली होती. नवीन फॉरमॅटमुळे स्पर्धा सुमारे एक आठवडा लहान होईल आणि सर्व खेळाडूंना किमान ९ सामने खेळण्याची संधी मिळेल.स्विस टप्प्यात फास्ट क्लासिकल टाइम कंट्रोल असेल. प्रत्येक खेळाडूला संपूर्ण सामन्यासाठी ४५ मिनिटे मिळतील .

### पोलार्ड मोडणार गेलचा रेकॉर्ड

नवी दिल्ली : जगभरात क्रिकेटच्या अनेक स्पर्धा सुरू आहेत. त्यातच एक एमएलसी लीग सुरू आहे. त्यामध्ये वेस्ट इंडिजचा खेळाडू कायरान पोलार्डने एक नवा विक्रम रचला आहे. त्याने टी २० क्रिकेटमध्ये मोठा रेकॉर्ड केला आहे. त्याने १००० सिक्स मारण्याचा रेकॉर्ड केला आहे. लवकरच तो ख्रिस गेलचा रेकॉर्ड मोडण्याची शक्यता आहे. वेस्ट इंडिजचा माजी खेळाडू असलेल्या कायरान पोलार्डने एक नवा इतिहास रचला आहे. सध्या तो अमेरिकेत सुरू असलेल्या मेजर क्रिकेट लीगमध्ये खेळत आहे. त्याने यामध्ये एक महाविक्रम केला आहे. टी २० क्रिकेटच्या इतिहासात पोलार्डने १००० सिक्स मारण्याचा रेकॉर्ड केला आहे. या स्पर्धेत खेळताना क्रिकेटचा युनिव्हर्स बॉस असलेल्या आक्रमक फलंदाज ख्रिस गेलचा टी २० क्रिकेटचा सर्वाधिक रन्सचा विक्रम मोडीत काढला आहे. पोलार्डने इंटरनॅशनल क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. मेजर क्रिकेट लीगमध्ये खेळताना त्याने ५६ बॉलमध्ये १०० रन्सची खेळी केली आहे. तसेच यामध्ये त्याने टी २० क्रिकेटमध्ये १००० सिक्स देखील पूर्ण केले आहेत. याआधी असा रेकॉर्ड ख्रिस गेलच्या नावावर आहे. ख्रिस गेलने टी २० क्रिकेटमध्ये १०५६ सिक्स मारले आहेत. तर पोलार्डने १००० सिक्स मारत यादीत दुसरे स्थान पटकावले आहे. त्यामुळे लवकरच पोलार्ड ख्रिस गेलचा रेकॉर्ड मोडण्याची शक्यता आहे. तसेच या सामन्यात पोलार्डने ख्रिस गेलचा टी २० क्रिकेटमधील सर्वाधिक रन्सचा विक्रम देखील मोडीत काढला आहे. टी २० क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक रन्स करणारा फलंदाज बनला आहे. माहितीनुसार, निकोलस पूरनने शतक लगावले. पोलार्डने शानदार शतकी खेळी केली.

## वेस्ट इंडिजच्या मदतीसाठी पुढे सरसावले जय शाह

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

क्रिकेट जगतात एक काळ वेस्ट इंडिजने गाजवला आहे. कसोटी क्रिकेटमध्ये दबदबा होता. इतकंच काय तर वनडे वर्ल्डकप स्पर्धेच्या पहिल्या दोन पर्वात जेतेपद मिळवण्याचा मान मिळवला आहे. पण मागच्या काही वर्षात वेस्ट इंडिज क्रिकेटला उतरण लागली आहे. दिग्गज संघ म्हणून ख्याती असलेल्या वेस्ट इंडिजची वाताहत झाली आहे.



वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्ड गेल्या काही वर्षांपासून आर्थिक संकटात आहे. त्यामुळे संघ बांधणी आणि खेळाडूंना मानधन देताना हात आखुडता घ्यावा लागतो. योग्य मानधन मिळत नसल्याने अनेक खेळाडूंनी आपल्या व्यथाही बोलून दाखवल्या आहेत. असं असताना वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्डाने यासाठी आयसीसीकडे गाऱ्हाणं घातलं होतं. आता आयसीसीने वेस्ट इंडिज क्रिकेटच्या मदतीसाठी मोठी घोषणा केली. आयसीसीच्या सर्वसाधारण बैठकीत जय शाह यांच्या अध्यक्षतेखाली मदतीचा निर्णय घेतला गेला आहे. आयसीसीकडून वेस्ट क्रिकेट बोर्डाला १२.८२ मिलियन डॉलर म्हणजेच १२३ कोटी रुपये कर्ज म्हणून दिले जाणार आहे. आयसीसीची वार्षिक सर्वसाधारण बैठक एडिनबर्ग येथे मागच्या आठवड्यात पार पडली. यात वेस्ट इंडिज क्रिकेट बोर्डाला कर्ज देण्यावर एकमत झालं. माहितीनुसार, विंडीज क्रिकेट बोर्डाची आर्थिक स्थिती आणि त्यांनी मदतीचा हात मागितल्याने आयसीसीने हा निर्णय घेतला आहे. सदस्यत्व आणि सदस्य देशांना दिल्या जाणाऱ्या मदतीशी संबंधित महत्त्वपूर्ण बदल करत हा निर्णय घेतला आहे.

## विराट कोहलीच्या निशाण्यावर द्रविडचा महाविक्रम

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीकडे इतिहास रचण्याची मोठी संधी आहे. कोहलीने केवळ ४ धावा केल्यास, तो भारताचा माजी क्रिकेटपटू राहुल द्रविड यांच्या नावावर असलेला एक मोठा विक्रम मोडीत काढेल आणि इंग्लंडच्या भूमीवर सर्वाधिक आंतरराष्ट्रीय धावा करणारा भारतीय फलंदाज बनेल.

भारत आणि इंग्लंड यांच्यात कार्डिफमधील सोफिया गार्डन्स येथे दुसरा एकदिवसीय सामना खेळला जाणार आहे. या मालिकेतील पहिल्यात सामन्यात विजय मिळवून टीम इंडियाने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. त्यामुळे, शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील संघाचे लक्ष्य दुसरा सामना जिंकून मालिका खिशात घालण्याचे असेल. तर, विराट कोहलीचे लक्ष एका मोठ्या विक्रमावर असेल.

इंग्लंडमध्ये तिन्ही आंतरराष्ट्रीय फॉरमॅटमध्ये विराट कोहलीने आतापर्यंत २,६४२ धावा केल्या आहेत. राहुल द्रविड यांच्या नावावर ४६ सामन्यांत २,६४५ धावा आहेत. त्यामुळे कोहलीने दुसऱ्या वनडेत केवळ चार धावा केल्या, तर तो द्रविड यांचा विक्रम मोडून इंग्लंडच्या



भूमीवर सर्वाधिक आंतरराष्ट्रीय धावा करणारा भारतीय खेळाडू बनेल.

इंग्लंडमध्ये कोहलीने कसोटीत १,०९६, एकदिवसीय क्रिकेटमध्ये १,३५४ आणि टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांत १९२ धावा केल्या आहेत.इंग्लंडमध्ये सर्वाधिक आंतरराष्ट्रीय धावा राहुल द्रविड २ हजार ६४५ धावा, विराट कोहली २ हजार ६४२ धावा, सचिन तेंडुलकर २ हजार ६२६ धावा, रोहित शर्मा २ हजार २९८ धावा आहेत.

पहिल्या सामन्यात अपयश, दुसऱ्यात मोठी संधीएजबॅस्टन येथे झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात विराट कोहलीकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती. मात्र, तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना त्याला केवळ ५ धावा करता आल्या.

त्यामुळे आजच्या सामन्यात त्याच्यासमोर केवळ दमदार पुनरागमन करण्याचेच नव्हे, तर भारतीय क्रिकेट इतिहासात आणखी एका मोठ्या विक्रमाची नोंद करण्याची सुवर्णसंधी आहे.

### रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे खेळाडूंची

## एमसीएच्या चाचणी शिबिरासाठी निवड

**। अलिबाग । क्रीडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे तीन युवा खेळाडू कौस्तुभ म्हात्रे (पेण) तेवीस वर्षाखालील मुलांच्या गटात, अमेय पाटील (उरण) एकोणीस वर्षाखालील मुलांच्या गटात व कुमारी रोशनी पारधी(महाड) हिची महाराष्ट्राच्या महिलांच्या वरिष्ठ संघाच्या निवड चाचणी कॅम्पसाठी निवड करण्यात आली आहे.



रायगडच्या तिन्ही गुणवान खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाच्या काम गिरीच्या जोरावर महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या निवड चाचणी शिबिरासाठी स्थान मिळवले आहे. निवड चाचणी शिबिर पुणे येथे होणार असून सदरच्या शिबिरातून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची निवड महाराष्ट्राच्या मुख्य संघात केली जाणार आहे.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील सचिव प्रदीप नाईक यांच्या सह सर्व पदाधिकारी, सदस्य व क्रिकेट प्रेमी लोकांनी रायगडच्या तिन्ही खेळाडूंचे अभिनंदन केले असून भविष्यात त्यांनी महाराष्ट्राच्या संघात स्थान मिळवून रायगड जिल्ह्याचे नाव अभिमानाने उज्ज्वल करावे अशी आशा व्यक्त केली आहे.गेल्या काही काळापासून

रायगड जिल्ह्यातील खेळाडूंची निवड महाराष्ट्राच्या संघात होत असल्याने जिल्ह्यातील युवा खेळाडूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

### बुमराह मुंबई इंडियन्सचा कर्णधार बनणार?

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह मुंबई इंडियन्सचा पुढील कर्णधार बनू शकतो. हार्दिक पंड्या आणि संघात असलेला एक माजी भारतीय कर्णधार ट्रेड होऊ शकतो. मुख्य प्रशिक्षक महेला जयवर्धने यांच्यासह कोचिंग स्टाफमध्येही बदल होऊ शकतो.या सर्व मुद्द्यांवर अंतिम निर्णय पुढील आठवड्यात इंग्लंडमध्ये होणाऱ्या आढावा बैठकीत घेतला जाऊ शकतो. या बैठकीत अंबानी कुटुंब आणि फ्रँचायझीचे वरिष्ठ अधिकारी सहभागी होतील.

## इंग्लंड-फ्रान्स तिसऱ्या क्रमांकासाठी मैदानात

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

गेल्या महिन्याभरापासून सुरू असलेल्या फिफा वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेचा थरार आता अखेरच्या टप्प्यात आला आहे. आता या स्पेन आणि अर्जेंटिना संघात अंतिम सामना १९ जुलैच्या रात्री खेळवला जाईल. पण असे असले तरी उपांत्य फेरीत पराभूत झालेले फ्रान्स आणि इंग्लंड यांनाही आणखी एक सामना खेळायचा आहे. त्यांना तिसरा क्रमांक मिळवण्यासाठी एक सामना खेळायचा आहे.

फ्रान्स आणि इंग्लंड संघात होणारा हा तिसऱ्या क्रमांकाचा सामना १८ जुलैच्या रात्री म्हणजेच भारतीय प्रमाणवेळेनुसार १९ जुलैची सुरुवात झाल्यानंतर सुरू होणार आहे. या सामन्यात विजय मिळवणारा संघ तिसऱ्या क्रमांकावर राहिल, पराभूत होणारा संघ चौथ्या क्रमांकावर राहिला. दरम्यान, लोकप्रियतेच्या तुलनेत सर्वात आघाडीवर असलेली फिफा वर्ल्डकप स्पर्धा बक्षीस रकमेच्या तुलनेतही बरीच आघाडीवर आहे.

## झिम्बाब्वेविरुद्ध मालिका गाजवण्यासाठी वैभव सज्ज

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

वैभव सूर्यवंशीचे टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पदार्पण संस्मरणीय ठरले नाही. त्याने इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांमध्ये आपल्या फलंदाजीचे कौशल्य दाखवले, पण त्याला आपला एकही डाव टिकवता आला नाही. त्याने इंग्लंडविरुद्धच्या तीन टी-२० सामन्यांमध्ये अनुक्रमे १४, १३ आणि १५ धावा केल्या.

आता वैभवला पुन्हा मैदान गाजवण्याची संधी मिळणार आहे आणि तो ती संधी अजिबात वाया घालवायची नाही म्हणून आतापासूनच सरावाला लागला



आहे. या संदर्भातील वैभवचा एक व्हिडिओ आता जोरदार व्हायरल होत आहे.

इंग्लंडच्या या दौऱ्यानंतर, वैभव सूर्यवंशी झिम्बाब्वेविरुद्धच्या टी-२० मालिकेत खेळताना दिसणार आहे, जिथे तो तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळेल. इंग्लंडमधील ०-४ अशा निराशाजनक पराभवानंतर, वैभव प्रतिष्ठित टेनिस स्पर्धा, विम्बल्डन पाहताना दिसला, जिथे तो अभिषेक शर्मा, संजू सॅमसन आणि युवराज सिंग यांच्यासोबत उपस्थित होता. यावेळी बेबी बॉसच्या लूकची खूपच चर्चा रंगली. वैभवचे स्टायलिश फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होताना दिसले. आता यानंतर तो लगेचच कामाला लागला आहे. वैभव सूर्यवंशीचे नागपूरमधील राजस्थान संघाच्या हाय परफॉर्मन्स सेंटरमध्ये विशेष स्वागत करण्यात आले. व्हिडिओमध्ये, संघाचे खेळाडू आणि सपोर्ट स्टाफ दोन रांगांमध्ये उभे राहून मानवंदना देत आहेत.

राजस्थानने या व्हिडिओला बॅक टू वर्क असे कॅप्शन दिले आहे, ज्याचा अर्थ असा आहे की मैदानावर कठोर परिश्रम आणि तयारीचा हंगाम पुन्हा सुरू झाला आहे. हा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. असे मानले जाते की, वैभव इंग्लंड दौऱ्यानंतर राजस्थानच्या हाय परफॉर्मन्स सेंटरमध्ये दाखल झाला आहे, जिथे तो आगामी मालिकेसाठी जोरदार सराव करेल.

### गिल दुसऱ्या स्थानावर | रोहित, विराट टॉप-५ मध्ये

## वनडे अष्टपैलू क्रमवारीत अक्षर टॉप-१० मध्ये

**। नवी दिली । वृत्तसंस्था ।**

आयसीसीने १५ जुलै रोजी एकदिवसीय क्रमवारी जाहीर केली. यामध्ये भारतीय अष्टपैलू अक्षर पटेलने तीन स्थानांची झेप घेत नववे स्थान पटकावले. शुभमन गिल दुसऱ्या स्थानावर कायम आहे आणि नंबर-१ फलंदाज बनण्यापासून फक्त ११ रेटिंग गुण दूर आहे. तर, इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात स्वस्तात बाद होऊनही रोहित शर्मा आणि विराट कोहली टॉप-५ फलंदाजांमध्ये कायम आहेत.

अक्षर फलंदाजांच्या क्रमवारीत १८ स्थानांची झेप घेत ७३व्या तर गोलंदाजांमध्ये दोन स्थानांच्या सुधारणेसह ४२व्या आणि अष्टपैलू क्रमवारीत तीन स्थानांनी वर चढून ९व्या स्थानावर पोहोचला.२१३ रेटिंग गुणांसह तो त्याच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम क्रमवारीत आहे. यापूर्वी, ७ जुलै रोजी जाहीर झालेल्या क्रमवारीत



तो १२व्या स्थानावर पोहोचला होता. या यादीत अफगाणिस्तानचा अजमतुल्लाह ओमरझाई ३१६ गुणांसह अव्वल स्थानावर आहे. तर, सामना जिंकण्यात महत्त्वाची भूमिका बजावणारा वॉशिंग्टन सुंदर फलंदाजांच्या क्रमवारीत १७७व्या आणि अष्टपैलू क्रमवारीत ५५व्या स्थानावर पोहोचला आहे.

कर्णधार शुभमन गिलची खेळी भारताच्या विजयाचा पाया ठरली. या कामगिरीमुळे त्याला १२ रेटिंग गुण मिळाले आणि तो ८०३ गुणांसह एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर कायम आहे. आता तो अव्वल स्थानावर असलेल्या न्यूझीलंडच्या डॅरिल मिचेलपेक्षा फक्त ११ रेटिंग गुण मागे आहे. तर, पहिल्या एकदिवसीय सामन्यात स्वस्तात बाद होऊनही विराट कोहली तिसऱ्या आणि रोहित शर्मा चौथ्या स्थानावर कायम आहेत.वनडे गोलंदाजांच्या क्रमवारीत कुलदीप यादव एक स्थान घसरून आठव्या क्रमांकावर आला.

## वनडे , टी-२० विश्वचषक नव्या फॉरमॅटमध्ये

■ **वनडेत सुपर-७ द्वारे सेमीफायनलिस्ट**

■ **टी-२० मध्ये सुपर-१० ने ठरणार**

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

आयसीसीने पुरुष एकदिवसीय आणि टी-२० विश्वचषकाच्या फॉरमॅटमध्ये बदलांना मंजुरी दिली आहे. एकदिवसीय विश्वचषकात १४ संघांसह नवीन थ्री-स्टेज फॉरमॅट लागू होईल, ज्यात पहिल्यांदाच 'सुपर ७' फेरी स्पर्धेचे मुख्य आकर्षण असेल.तर, टी-२० विश्वचषकात ' सुपर ८' ऐवजी 'सुपर १०' स्टेज खेळली जाईल आणि उपांत्य फेरीत पोहोचण्यासाठी नवीन एलिमिनेटर सामने देखील जोडले गेले आहेत.

याव्यतिरिक्त, २०२८ च्या टी-२० विश्वचषकासाठी नवीन पात्रता रचना तयार करण्यात आली आहे. एडिनबर्ग येथे झालेल्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर बुधवारी नवीन रचनेची अधिकृत घोषणा करण्यात आली.

वनडे वर्ल्ड कपमध्ये सहभागी होणाऱ्या संघांची संख्या १४ राहील, पण त्याचे स्वरूप थ्री-स्टेजमध्ये बदलण्यात आले आहे. नवीन स्वरूपानुसार सर्वात आधी 'सुपर सिरीज' खेळली जाईल. यात रँकिंगमधील शेवटचे तीन संघ राउंड-रॉबिन फॉर्मेटमध्ये एकमेकांविरुद्ध खेळतील आणि अव्वल संघ दुसऱ्या फेरीत पोहोचेल.दुसऱ्या फेरीत ६-६ संघांचे दोन गट असतील, ज्यात एकूण ३० सामने खेळले जातील. दोन्ही गटांमधील अव्वल-३ संघ आणि दोन्ही गटांमधून पुढील सर्वोत्तम संघ तिसऱ्या फेरीत म्हणजेच 'सुपर ७' मध्ये पोहोचेल. सुपर ७ मध्ये सर्व सात संघ एकमेकांविरुद्ध राउंड-रॉबिन फॉर्मेटमध्ये एकूण २१ सामने खेळतील. यानंतर अव्वल-४ संघ उपांत्य फेरीत पोहोचतील, तर विजयी संघ अंतिम सामना खेळतील.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)